म. ग्रं. सं. ठाणें

विषय [illegible]

लेखक गो. मो. कालेलकर

सन १९०३

संग्रहालय क्रमांक [illegible]

पुस्तकाचें नांव गोरपिचंद

१९

८क

॥ श्री ॥

# गोपिचंदनाटक.

हें पुस्तक.

गोविंद मोरोबा कार्लेकर.

यांनीं तयार केलें तें.

बाळकृष्ण लक्ष्मण पाठक यांनीं.

एकंदर हक्कासहीत विकत घेऊन.

मुंबईमध्यें

जगदीश्वर छापखान्यांत छा०

---

शके १८१५ सन १८९३

हें पुस्तक सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें-
रजिष्टर करून सर्व हक्क छापणारानें-
आपलेस्वाधीन-
ठेविले आहेत.

---

किंमत ६ आणे.

# प्रस्तावना.

अलीकडे संगीत नाटकांचा जिकडे तिकडे बराच प्रसार झाला आहे तथापि जुन्या पद्धतीच्या नाटकांवरील लोकांची अभिरुची कमी झाली आहे असें नाहीं. कोल्हापुरकर व सांगलीकर वगैरे नाटक मंडळ्या पौराणीक जुन्या पद्धतींचीं नाटकें अद्याप करीत असतात तेव्हां तशा नाटक मंडळ्यांस व इतर रसिक वाचकांस उपयोगीं पडावें म्हणून हल्लीं आह्मीं हें नाटक प्रसिद्ध केलें आहे.

हें नाटक तयार करण्याचे कामीं आह्मांस मुख्यत्वेंकरून बाजी मोरेश्वर जोशी यानीं चांगली मदत केली त्याबद्दल आह्मीं त्यांचे फार आभारी आहोंत.

गोविंद मोरोबा-
कार्लेकर.

श्रीगणेशायनमः

# गोपिचंद नाटक.

## मंगलाचरण.

स्थळ-रंगभूमि.

पात्रें-

सूत्रधार, विदूषक-गजानन-सरस्वती.



सूत्र० - पद-(चाल- पंचतुंडनररुंड. )

॥ हे करुणाकरभवभयहारक संकटनाशकदयाकरी ॥
॥ मस्तकिगंगाधारणकरुनी. स्मशानींचतूंवासकरी ॥
॥ शुद्धमनानेंस्तवनकरीजो त्यांसीतारकतूंचिहरी ॥ दयावं ॥
॥ तवहूं होउनिभारी अंतीनेसीइंद्रपुरीं ॥ दासतुझाहाना ॥
॥ टककरुनी ॥ सभाजनांचें चित्तहरी ॥ धास्तवतुजलान ॥
॥ मितोंआलों ॥ तवहस्त ममठेवीशिरीं ॥ १ ॥ ध्रु ॥

सूत्र०- कायकरावें मीं आज परमेश्वराचें स्मरण करीत-असतां एकाएकीं हाविचित्र भुतासारखा पोषाख धारण क-रून इकडे येत आहे तरहा कोण असावाबरें.

( इतक्यांत विदुषक येऊन रंगभुमीवर थांकडा तिकडाउ-भाराहातो. )

सूत्र०-( त्याजकडे पाहून ) हे विचित्र पुरुषा हा असा भयंकर-वेष धारण करून त्या रंगभुमीवर भास झालास तरीतुझें नामाभि धान काय आहे तें कथनकर.

विदू०- ( त्याचें बोलणें मनावरन घेतां इकडे तिकडे पाहात मो-ठ्यानें हंसूं लागतो.

सूत्र०- अरे तुला नांव विचारलें तें सांगावयाचें सोडून एवढ्या-मोठ्यानें हंसण्यासारखी मौज कायवाटली.

विदू०- याठिकाणीं निवळ जमीन असतां तुह्मीं मला नाव आण-ण्यास सांगतां ती येईल कशी एवढ्यावरूनच.

सूत्र०- अरे दर्योतील नाव मीं तुला विचारिलीनाहीं तरं तुला-लोक कोणत्या नावानें हांका मारितात.

विदू०- हा आतां समजलों, परंतु आपणास प्रथम लोक कोणत्या नावानें हांक मारितात तें सांगा ह्मणजे मीं आपलें नांव सांगेन

सूत्र०- अरे मला सूत्रधार ह्मणून हांका मारितात.

विदू०- ठीक ठीक. अहो त्यांत २ शब्द आहेत एक सूत्र आणि दुसराधार- आतां सूत्र ह्मणजे सूत आणी धार मिळून एकंदर अर्थ सुताला धार मींतर कधीं पाहिली नाहीं आणि तुह्मीं ह्मण-तां कीं, सुताला धार असते, तेलाला, तुपाला, दुधाला, पाण्या-ला इत्यादिकांना ह्मटलेंतर चालेल परंतु सुताला धार कशी असेल.

सूत्र०- तर आतां आपणास कोणत्या नावानें हांक मारितात.

सूत्र०- अरे मला भागवत असेंही ह्मणतात.

विदू०- ठीक जें सांगतां तें कांहीं विचित्रच सांगतां अहो आमच्या हिकडे त्याचा असा अर्थ होतो कीं, भा ह्मणजे भाकरी ग ह्मणजे गवत मिळून गवताची भाकरी आणि तिज लावत् हा प्रत्यय लावि- ल्यानें गवताची भाकरी करणें असा होतो. नीट नांव सांगाल तर सां गा नाहीं तर मला जाउं द्या.

सूत्र०- अरे एवढी विद्वत्ता कुठे शिकला होतास?

विदू०-अहो आमचें सर्व घराणेंच विद्वान आहे. माझी आई विधवा, आईची आई विधवा, बाप विधवा, बापाची बायको विध- वा त्याचप्रमाणें माझी बायको मॅट्रीक्युलेशन व मीं स्वतः विए एलेल बी पर्यंत विद्वान्. फक्त श्रीचा धडा मात्र येत नाहीं.

सूत्र०- वा वा : खरोखरच विद्वान् आहेस तूं अरे अशा बोलण्यां तकांहीं अर्थ नाहीं. आतां माझें भागवत नांव पडण्याचें कारण मीं भगवंताची लीला वर्णन करितों ह्मणून मला भागवत ह्मणता त आतां तुझें नांव काय?

विदू०-तुम्हाला मीं नांव सांगावें तरी कोणतें. आई एका नावानें- हाक मारते, बाप एका नावानें हांक मारतो. व बायको एका ना- वानें हांक मारते. इतक्या नावांपैकीं तुह्माला कोणतें नांव सांगूं?

सूत्र०-अरे मला त्या नांवाची जरूर नाहीं. तर ज्यावेळेस तूं जन्मला- स त्यावेळेस पाळण्यांत घालतांना तुझें जें नांव ठेविलें असेल तें सांग.

विदू०-ठीक आहे कांहीं शक किती आहेत?

सूत्र०- शक दोन आहेत. एक विक्रम व दुसरा शालिवाहान.

विदू०- आमच्या पोथींत ४ शक आहेत.

सूत्र०- मीतर आजच ऐकतोंकीं; चारशक आहेतम्हणून. बरें ते कोणते.

विदू०- एक विक्रम, शालिवाहन, तिसरा विदूषक तो त्यालाच म्हणतात. आणि चौथा बेलाशक.

सूत्र०- तीन शक समजले पण बेलाशक तो कोण?

विदू०- तो आमच्या आईच्या दुसऱ्या मुलग्याला म्हणतात.

सूत्र०- मिळून तुझें नांव विदूषक.

विदू०- हो माझें नांव विदूषक. बरें सूत्रधार आतां तुम्ही या ठिकाणीं करणार काय तें तर समजूं दे.

सूत्र०- विदुषका मीं त्या ठिकाणीं नाटकाचा प्रयोग करून दाखविणार आहें. तर नाटकपात्रांची सिद्धता करण्याचें काम तुजकडे नेमिलें आहे आंत जाऊन सर्व पात्रांची सिद्धता करण्यास सांग पाहू

विदू०- तें काम माझें, परंतु नाटक कोणचें करणार, व आतां त्या ठिकाणीं प्रथमतः येणार कोण?

सूत्र०- विदुषका मीं त्या ठिकाणीं गोपीचंद नाटकाचा प्रयोग करून दाखविणार आहें. व त्या नाटकांत विघ्नें न येण्याविषयीं प्रथमतः गजाननाचें स्तवन करून नंतर नाटकास सुरवात करूं.

विदू०- काय म्हणतां गजाननाला तुम्हीं येथें आणणार? मग तर काय आपण ब्रह्मदेवाचे बापाचे बापच झालां म्हणावयाचे.

सूत्र०- अरे असें अन्योक्तिपर भाषण मला समजलें नाहीं तर नीट सांगा कायतें.

विदू०- अहो गजानन तर आज चार दिवस झाले ते गमावले.

सूत्र०- अरे असें वेड्या सारखं काय बरळतोस.

विदू०- अहो मी तर वेडाच आहें परंतु तुम्हाला काय म्हणावें. चला माझ्या बरोबर त्याच्या घरीं म्हणजे मी बोलतों हें खरें किंवा खोटें तें समजेल.

सूत्र०- अरे कोठचा गजानन.

विदू०-अहो तुह्मांला गजानन माहीत नाहीं? तो आपल्या नारायणरावाचा चुलता.

सूत्र०-अरे तो नव्हे गजानन, तर कैलासवासी जे भोलानाथ शंकर त्यांचे धाकटे चिरंजीव ज्यांची सोंड लांब आहे ते.

विदू०-हेंच जर मला अगोदर सांगतेत तर इतकी भानगड कशाला हवी होती? बरें तर आतां त्यांना तुह्मीं आणणार ठीक आहे.

सूत्र०- ( गणपतीचें स्तवन करितो. )

पद (चाल- नमन तें गणनायक )

नमितों मीं तुजला गणराया ॥ ध्रु० ॥ शंकरसुत तूं अससी ह्मणुनी ॥ स्तवन तुझें करण्या ॥ १ ॥ नमि० ॥ दासावरि ह्या संकट पडलें ॥ किती अंत बघसी ॥ नमि० ॥ २ ॥ येऊनि त्वांची लवकरि येथें संकट वारिसी ॥ ॥ ३ ॥ ॥ नमि० ॥

साकी.

दासाहें तुझें वचनांचि ऐकुनि आलों मीं त्या ठायां ॥ संकट कथिं मज आतां लौकरि आलों मुक्त कराया ॥ १ ॥

सूत्र०- गजानन महाराज, हा दास आपणास वंदन करीत आहे.

गजा०- वत्सा सूत्रधारा तुज मत कल्याण असो. वत्सा मीं कैलास पर्वतीं पित्याच्या सान्निध असतां तुझी दीनवाणी स्तुती श्रवण करून या रंगभुमीचे ठायीं भास झालों तर दासा असें तुजवर कोणतें संकट प्रास झालें आहे तें कथन कर.

सूत्र०- गजानन महाराज, मीं ह्या ठिकाणीं सभाजनांचें मनरंजन होण्या करितां नाटकास आरंभ केला आहे तर आपणास पाचारण करण्याचें कारण एवढेंच कीं, ह्या नाटकांत विघ्नें येऊं न येत ह्मणून व नाटक पात्रें अज्ञान आहेत तीं सज्ञान होऊन बृहस्पतीवत् भाषणें करतील असा आपला वर असावा.

गजा०- वत्सा सूत्रधारा, माझ्या आशीर्वादें करून तुझ्या नाटकांत विघ्नें येणार नाहींत आतां ब्रह्मकुमारीजी सरस्वती तिचें तूं भावें-करून स्तवन कर म्हणजे ती ह्या ठिकाणीं येऊन तुला चांगला वर देईल-हा माझा पूर्ण आशिर्वाद आहे. आतां मीं स्वस्थानाप्रत-गमन करितों.

सुखीनैव गमन करावें चरणाप्रत वंदन करितों.

( सूत्रधार सरस्वतीचें आराधन करितो. )

पद ( चाल - आस धरुनि प्रभु तवच० )

विधितनये गे पाव मलातूं ॥ लवकर येउनि मुक्त करीतूं ॥ धृ० ॥ सुरगण सर्व ही चरणीं सेविति ॥ आदी माया लावण्यजोती ॥ १ ॥ विधि० ॥ पडला संकटीं भक्त तुझा गे ॥ तारिं मला तूं कृपा करीं गे ॥ विधि० ॥ २ ॥ ॥

अंजनी गीत.

वत्सा तूझें स्तवनचि ऐकुनि ॥ पितयाच्या मीं अंकीं बेसुनी ॥ करुणा शब्दचि पडतां कानीं ॥ धांवत आलें मीं ॥ १ ॥

सूत्र०- सरस्वती मातोश्री, हा आपला दास चरणाप्रत वंदन करीत आहे.

सर०- वत्सा, भागवता, तुजप्रत कल्याण असो. मीं कैलासपर्वतीं पित्याचे अंकावर बसून नारद तुंबरादिकांचे गायनांत निमग्न असतां तुझी दीनवाणी स्तुती श्रवणकरून या रंगभुमीचे ठाईं प्राप्त झालें, आणि येथें पाहातें तों गजानन महाराजांची स्वारी बसली आहे, असें असून तुझें मुख तर म्लान दिसत आहे, असें तुजवर कोणतें संकट प्राप्त झालें आहे तें कथन कर.

सूत्र०- सरस्वती मातोश्री, मीं ह्या ठिकाणीं नाटकास आरंभ केला आहे तरी या नाटकांत नाटकपात्रें अज्ञान आहेत तीं सज्ञान होऊन

जनाचें मनरंजन करतील, एतद्विषयीं आपला पूर्ण वर असा वा इतकीच इच्छा आहे.

सर०- भागवता, माझ्या वराचा महिमा तुला माहित नाहीं काय सांगतें एक.

श्लोक

मूकंकरोतिवाचालंपंगूलंघयतेगिरीन् ॥ यत्कृपात-
महंवंदे, परमानंदमाधवं ॥१॥ ॥

माझ्यावरें करून मुके जे आहेत, ते वाचाल होतात. तसेच पंगू जे आहेत, ते मोठमोठे पर्वत उल्लंघन करितात. तर वत्सा भागवता, तुझीं नाटकपात्रें अज्ञान कशीं राहातील? तीं सज्ञान होऊन कुलगुरू जो बृहस्पती तद्वत् भाषणें करून जनाचें मनरंजन करतील हा माझा पूर्ण आशिर्वाद आहे, आतां मीं स्वस्थानाप्रत गमन करितें.

साकी.

तुझी इच्छा पूर्ण जाहाली ॥ जातें मीं स्वस्थानीं ॥ जे-
व्हां तुजला संकट येइल, तेव्हां स्मरण करोनी ॥ पाचारी
मजला ॥ येइन साह्य करायाला ॥१॥

विदु०- हे मातोश्री मलापण थोडासा वर देतां काय?

सर०- अरे नटा, तुझ्या मुखांतून जीं जीं भाषणें निघतील, तेणेंकरून सर्व जनांस हास्यरस उत्पन्न होईल असा माझा पूर्ण आशिर्वाद आहे.

( असें ह्मणून सरस्वती आपले स्थानाप्रत जाते. )

विदु०- अहो सूत्रधार, तुमच्या ह्मणण्याप्रमाणें सर्व आटोपलें कीं वा नाहीं? कारण आपण मला पात्रांची सिद्धता करण्यास सांगितलीं त्याप्रमाणें सर्व तयारी करून अन्नशुद्धीसुद्धां वाटली. आतां क

क यजमानाची येऊन उदक सोडण्याची वाट पाहात बसलों आ हें, गणपती, सरस्वती, तर दोघेंही उपाशींच गेली. आतां आम्हां स हीं असेंच कुशी खाजवीत, पोट चाळीत, जावें लागतें कीं काय तें एकदां समजलें म्हणजे घरचा रस्ता सुधारण्यास ठीक पडेल.

सूत्र०- अरे वेड्यासारखा पुनः बरळूं लागलास काय? अरे तुला भो जनाचे पात्रांची तयारी करण्यास मीं सांगितली नाहीं. तर नाटक संबंधें लागणाऱ्या पात्रांची सिद्धता कर असें बोललों. गजानन महाराज व सरस्वती मातोश्री यांनीं तर अभयवर दिलाच आहे आतां आपल्यास पुढचे कृत्या बद्दल जास्त ईर्षा आली. व नाटकाचा फक्त मंगलाचरण झाला, नाटकतें पुढेंच आहे (असें विदूषकास सांगितल्यावर विदुषक जातो.)

---

## अंक १ ला.

पात्रें:- जालंधर, मैनावती, परिचारिका, मोगरी.



(तदनंतर अहल्लक करीत जालंदर डोक्यावर लांकडांची भारी घेऊन प्रवेश करितो.)

जालं०- पहा आज दोनचार दिवस डोक्यावर लांकडाची भारी घेऊन एकसारखा हिंडतों आहें, वजिकडे जावें तिकडे जो तो संसारामध्यें निमग्न होऊन गेलेला नजरें सपडतो, परंतु खरोखर पाहिलें असतां त्या संसारांत खुरख- ह्मणून बिलकूल नाहीं. परंतु हे मूढजन सुख आहे अ- सें समजून एकसारखें त्यांत गढून जाऊन ज्या जगन्नियंत्यानें आपणास निर्माण केलें त्याला विसरून जाऊन- आपल्याच स्वार्थाकडे लक्ष देऊन त्या संसार समुद्रांत बुडून जाताहेत ( असें ह्मणून कांहीं चालून ) काय करावें अर- ण्यांतून मोठ्या श्रमानें डोकीवर लांकडांची मोळी घेऊन हिंडतों आहें, परंतु ह्या शहरांत ही आपल्या डोकीवरचा आपणास जो मोळीचा भार झाला आहे तो खालीं करणारें गिऱ्हाईक तर दिसत नाहीं ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे, अस्तु- कांहीं वेळ ह्या ठिकाणीं विश्रांती घेऊन पहावें कोणी गिऱ्हाईक आलें तर बरें, नाहीं तर परत अरण्यांत जाऊं. ( असें ह्मणून डोकीवरील ती मोळी तशीच ठेवून ध्यानस्त होतो.

परिचा०- अग मोगरी, तों पाहिलास का एक साधू रस्त्याचे बाजूस कसा ध्यानस्थ होऊन बसला आहे तो?

मोग०- अग त्याच्या ध्यानस्थपणा विषयीं मला तर बाई नवल वाटत नाहीं. परंतु ती पाहिलीस का त्याच्या डोक्यावर एक हाताच्या अंतरानें लांकडांची भारी कशी राहिली आहे- तीः त्याचें मला बाई आश्चर्य वाटतें.

परि०- खरेंच बाई, तो कोणी तरी मोठा साधू असावा.

मोग०- परिचारिके, पहा अशावेळीं किंनईजर बाई साहेब, इथें असत्या तर त्यांनीं थोरल्या महाराजांच्या विरहानें जे-

दुःख झालें आहे, तें नाहींसें झालें असतें. फार तर काय-सांगूं मला तर बाई असें वाटतें कीं, त्या, ह्या साधूला गुरू क-रून घेतल्या वांचून राहाणार नाहींत.

परि०- अग, त्या पाहा बाई साहेब चंपी दासीला बरोबर घे-ऊन इकडेच येत आहेत. तर त्यांच्या तो दृष्टीस पडेल अशी-त्यांना बसण्याला खिडकी जवळ जागा करपाहूं.

मोग०- बरें आहे.

( इतक्यांत चंपी दासीला बरोबर घेऊन मैनावती प्रवे-श करिते. )

चंपी०- असेंच इकडून यावें बाई साहेब.

दो.स०- ( मैनावतीस पाहून ) यावें बाईसाहेब बसा.

मैना०-(बसून) बायानों, तुह्मीं अशा उभ्या कां? खालीं बसा.

स०- ( बसतात. )

मैना०- बायांनों, आज तुमचें मुख प्रफुल्लीत दिसण्याचें कारण कायबरें असावें, किंवा अशी कोणती एखादी वस्तू तुमच्या दृ-ष्टीस पडली ह्मणून तुमचें मुख प्रफुल्लीत दिसत आहे.

परि०- असें पहा बाई साहेब, कमळणी चंद्रोदय होतांक्ष-णींच जशा प्रफुल्लीत होतात, तद्वत आपल्या येण्यानें आ-ह्मांस आनंद झाला यांत आश्चर्य तें कसलें?

मैना०- अग मी तर तुमच्या जवळ नेहमींच बसलेली आहें. त्यावेळेस इतकी तुमची आनंदी मुद्रा दिसत नाहीं. आणि-आज ह्मणतां कीं, माझ्या येण्यानें तुमचें मन आनंदित दि-सत आहे ह्मणून तुमचें भाषण मला खरें वाटत नाहीं.

मोग०- आमच्या भाषणावर जर तुमचा विश्वास नाहीं असें असेल, तर ह्या खिडकीच्या बाहेर आपण नजर करावी. ह्मण

जे तुह्मांला आनंद झाला. तो बरोबरच आहे. व तसा आनंद होण्यासारखें स्वरूप ही आहे. अग गुरू असावा तर असा-च असावा नाहींतर इतर का थोडे गुरू आहेत. तसेंच बाई- त्यानें जी मोळी डोक्यावर घेतली आहे तिचा स्पर्श तरी त्या-च्या डोक्याला आहे काय?

परि०- बाईसाहेब खरेंच आहे मनुष्यजन्मास येऊन गुरु कर णें तो अशालाच करावा तरच बाई जन्मास आल्याचें सार्थक झा-लें ह्मणावयाचें.

मैना०- खरोखरच तूं बोलतेस हें अगदीं सत्य आहे. तर आतां मीं तुह्मांला सांगत्यें कीं, तुह्मीं दोघीजणी तिकडे जाऊन त्या-चा आदर सत्कार करून घेऊन या बरें?

मोग०- आपली आज्ञा प्रमाण आहे. परंतु त्या दासीची हात जोडून विनंती आहे ती ऐकावी.

मैना०- कोणती?

मोग०- बाईसाहेब असें पहा साधूजे आहेत हे अगदीं नि रिच्छ असतात. ह्मणून ते येतील किंवा नाहीं ह्याचीच शंका वाटते. ह्मणूनच ते इकडे येण्यापेक्षां आपणच तिकडे जावें हें मला बरें वाटतें.

परि०- मोगरी जें बोलली किंनई तें बाई अक्षरशः खरें आहे. तर मग चला बाई साहेब आपणच तिकडे जाऊं. ह्मणजे झालें.

मैना०- बरें आहे चलातर.

( सर्व चालूं लागतात. )

मै०- सखे परिचारिके, अजून कितीसें लांब जावयाचें आहे तरी?

परि०- बाईसाहेब आतां किंनई फार लांब नाहीं; आपण अ-गदीं त्यांच्याजवळ येऊन चुकलों.

मैना०- गडे त्यांच्याकडे पाहिलेंस का कशी ध्यानस्त मूर्ती बसली आहे ती?

अंजनीगीत.

साधूंचें हें ध्यान पाहुनी ॥ हर्षानें झाला बहुत मन्मनी
॥ काळचि जाइल त्याला भिउनी ॥ ऐसें तप ज्यांचें ॥ १ ॥

जालं०- ( ध्यानविसर्जन करून ) अलख, अलख

मोग०- बाईसाहेब, साधूंनीं आपलें ध्यान विसर्जन केलें आहे, तरी आपण जाऊन त्यांना वंदन करावें.

मैना०- (पुढें जाऊन ) साधुमहाराज आपल्या चरणकमळीं ही दासी वंदन करीत आहे.

जालं०- बाई कल्याण तूं कोण आहेस व येथें येण्याचें कारण काय?

मैना०- साधुमहाराज.

पद (चाल- आस धरुनि )

सुंदरपुरका गोपीचंद ॥ राजा त्याची मी ही माता ॥ धृ०
॥ पाहुनि तुम्हां आलें येथें ॥ दर्शन तुमचें घेण्या करितां ॥
सुंदर० ॥ १ ॥ दासीला त्या कृपावलोकनें ॥ बोधुनि सांगा
मजला आतां ॥ सुंदर० ॥ २ ॥ ॥

जालं०- बाई उपदेश म्हणजे कांय हें मला माहीत नाहीं. तूं गोपीचंदाची आई आणि मीं जालंदर जोगी आहें. परंतु मला मंत्र वगैरे कांहीं माहीत नाहीं. तशांत आम्हीं स्मशानांत रहाणारे असें असून तूं त्या नादांत पडूं नको. सुखानें काळक्रमणा कर.

पद ( चाल- सुवर्ण कनको )

दयाकरा तुम्हीं गरिब दासि वरी पदरीं घ्या त्या अब

लेला ॥ उपदेशाचितो मजला द्यावा ॥ न्यावें अपुल्या-
सेवेला ॥ धृ० ॥ कृपाळुवा कृपावंता, संसारांतुनि सो-
डिंमला ॥ नामजपुनि मीं रात्रंदिनत्या, सेविन तुमच्या-
चरणाला ॥ ० ॥ १ ॥

जाल०- दिंडी.

मंत्र कांहीं माहीत मलानाहीं ॥ जाइपरतोनी आपुल्या-
घरींराहीं ॥ नकोलागूं तूं भजानि माझ्याबाई ॥ व्यर्थ तू-
झाहाश्रमाचिलयाजाई ॥ १ ॥

जा०- बाई त्या करितां तूं माझे चरण सोडून देऊन आपल्या रा-
ज्यांत जाऊन सुखानें रहा. उगाच कां मला त्रास देतेस?

मैना०- साधुमहाराज, मलातें राज्यांतील सुख नको. आपण-
मला उपदेश द्याल अशा हेतूनें त्या ठिकाणीं आलें तों मजवर
तुम्ही कोप करितां असा माझे हातून कोणता अपराध झालाआ
हे, त्याबद्दल आपल्या नजरेस येईल तो मला दंड करावा.

जाल०- कायकरावें, परमेश्वरा मैनावती ही तरमाझे पाय सोडीत
नाहीं. हिला जर उपदेश दिला, तर गोपीचंद राजा मला एकदम-
हांकून देईल. ( कांहीं वेळ थांबून ) बाई जोग घेणें ह्मणजे मोठें
कठीण काम आहे.

साकी.

जोग घेणें बहुत कठीणाची, सुखहि न मिळे कांहीं ॥
सोडुनि माया अपुली आधीं, आप्त बंधु बांधवहीं ॥
उपदेश घेवोनी ॥ ध्यानचीं ईशाचें करूनी ॥ १ ॥

मैना०- महाराज मीं सर्व तन मन धन सोडून देऊन आप-
णाजवळ उपदेश घेण्याकरितां आलें आहें. तरी मला उपदेश
द्यावा एवढीच विनंती आहे.

जालं०- ठीक आहे बाहेर ये.
मैना०- गुरुमहाराज ही मीं आल्यें ( पुढें होते. )
जालं०- तिच्या कानांत मंत्र उपदेश करितो.
मैना०- ( उपदेशश्रवण करून ध्यानस्त होते.
सख्या०- ( भिऊन ) बाईसाहेब, सावध व्हा, सावध व्हा, महाराज हें जरकां आतां राजेसाहेबांना माहीत झालें, तर आह्मींकाय करावें?
जा०- तुह्मीं कांहीं भिऊं नका, आतां ती सावध होऊन तुमच्याबरोबर येईल, जरा थांबा ( मैनावतीस ) मैनावती ऊठ, तूं आहेस कोठें?
मैना०- ( हात जोडुन ) मला कांहीं नको, एकसारखें भगवंताचें नांव जपत रहावें असें वाटतें.
जा०- मैनावती, तूं आपल्या नगरांत जाऊन निरंतर सुखानें रहा, व एकसारखें आलेख नामध्यानांत राहूं दे. त्यापासून स्वार्थ व परमार्थ दोन्ही मिळतील.
मैना०- ठीक आहे. महाराज तर मग मीं जातें.

कल्याण. अहलख, अहलख.

( असें ह्मणून सर्व निघून जातात.

## अंक १ ला.

## समाप्त.

# अंक २ रा.

## पात्रें.

गजगामिनी, रतनमंजरी, मनमोहना, इतरदासी, गोपीचंद, मैनावती.



गजगा०-कायहो रत्नमंजिरीबाई, कालचेदिवशीं जीगोष्ट मला सांगितली ती अगदीं खरीकापण?

रतन०-खरीह्मणून कायविचारितां? प्रत्यक्षमीडोळ्यानींपाहिली आहे.

गज०- अहोपण सासूबाई त्या साधूजवळ उपदेश बिपदेश घ्यावयास जात असल्यातर?

रत०- अहो कसला उपदेशनीं कसलें काय? काय करावें बाई आजसाधूचें पेंवच जसें उघडलें आहे.

गज०- पण ही गोष्ट मनमोहना बाईस समजली आहे का?

रत०- हें हो कायविचारतां? जीगोष्ट दहापंधरांच्या कानावरगेली तीत्यांना समजल्याशिवाय काराहिली असेल.?

गज०- बरें पणत्यानां समजलीह्मणतांनीं महाराजांच्याकानावर कशीनाहींगेली.

रत०- अहो हळू हळू सवडीनुसार त्याचे ही कानावर जाईलच. व त्यानां कळविण्याचो त्यांचा विचार ही आहे.

गज०-खरेंच, नाहींतर रागाच्या तडाख्यांत एकादा भलताच कांहीं तरी परिणाम व्हावयाचा.

रत०- बरें आतां तें राहूं द्या. महाराजांना आज मंगलस्नान नावा. लावयाचें, त्याचें कसें काय?

गज०- कसें काय ह्मणजे? सर्व तयारी आहे. त्यांची उटण्याची चखोटी। उटणींसुद्धां वांटून तयार आहेत.

रत०- पण आज महाराज सासूबाईच्या पुढील चौकांत स्नानास जाणार आहेत ना?

गज०- हो बरीच आठवण केलीस. कदाचित् ते जाऊन ही बसले असतील. आणि आपण इकडे रेंगाळत बसलों आहोंना?

रत०-कायहो रतनमंजरी बाई, ते बघितलेत का महाराज मनमोहनाराणी सह सासूबाईंचे महालापुढील चौकांत सोन्याच्या चौरंगावर आपलीच वाट पाहात बसले आहेत असें वाटतें. तर चलाबाई आपण ातिकडे जाऊं.

रतन०- बाईसाहेब जरा वर तर पहा, सासूबाई कशा खिडकींतून महाराजांकडे टक लाऊन पहात आहेत.

गज०- मलातर असें वाटतें कीं, त्याढोंगी साधूनें कांहींतरी त्यांच्यावर जादू केली असावी. यांत संशय नाहीं. आणि त्याला आधार ह्मटलातर ज्यावेळेस त्यांनीं साधूचा उपदेश घेतला त्यावेळेपासूनच त्यांची अशीस्थिती होऊन गेली आहे.

( तदनंतर गोपीचंद मैनावती व मनमोहना येतात. )

गोपी०- अहाहा, मजपुढें इंद्राचें सौख्य कायजास्त आहे मीं- बंगालदेशचा राजा असूनमाझ्याबाराशें पट्टराण्या, व सोळाशें दुसऱ्या बायका, माझ्या सेवेला रात्रंदिवस हजर असतात.

( इतक्यांत गजगामिना व रत्नमंजरी प्रवेश करितात.

म०मो०रा०- ( त्यांना पाहिलेंसें करून ) या बायांनीं अगदीं योग्य वेळेवर आल्यात, नाहींतर आज रंगाचा बेरंग होण्याचीवेळ आली होती.

गज०- हें होकाय तुमचें बोलणें, आह्मांला असलें नाहीं बोलतां येत, वडील तर आपण होतांच, नीं मग आह्मीं नसलों ह्मणून रंगाचा बेरंग होण्याचासंभव दिसत नाहीं.

गोपि०- सख्यानों, ह्या ओलसर जागेंत मला कितीवेळ बसविणार बरें.

पद- चाल- वस्त्रानें-

सुवासीक उटणें माझ्या, अंगाला लाउनी ॥ मांगली. करस्नान आतां मजवरती घालुनी ॥ एकवार हो सख्या वी, तव मनिची पुरवुनी ॥ कोठवरी बेसवीतां, मजलागीं. घेउनी ॥ १ ॥

मन०- प्रिया, स्नानाविषयीं आपली आज्ञा केव्हां होते आहे- ह्याचीच वाट पाहात होतों ठीक आहे. चलाग बायांनों, आतां उगीच उशीर तो कशाला.

( इतकें बोलून राजाचे आंगास उटणीं तेलें वगैरे लावितात. )

मैना०- सखे,

श्लोक हरिणी.

सुतचि मम हा जैसा भासे जणूं शशितो असे सकल गुण हे त्याचे आंगीं पहा भरले कसे ॥ असे असुनि तो का .

क्काचेही सुरवीं पडतों आतां ॥ म्हणुनि मजला सोसे-
नाहे मनीं नच शांतता ॥ १ ॥ ॥

सख्या०- बाई साहेब, आपण असें भलतेंच काय बोलतां?
आपले महाराज किनई पुष्कळ दिवस सुखानें राज्य करिती-
ल त्यांस परमेश्वर सुखी ठेवो, म्हणजे झालें.

मैना०- सख्यांनो, तुह्मी सांगतां हें सर्व खरें. परंतु त्या भाष-
णांनीं माझ्या मनाची शांतता होत नाहीं. कारण काळजी आहे
तो याला घेऊन गेल्याशिवाय राहाणार नाहीं. आतां या संकटां
तून पार पाडण्यास गुरूशिवाय त्या पृथ्वीवर दुसरा कोणी नाहीं.

( असें शोकास्पद भाषण करीत असतां नेत्राश्रु राजाच्या
अंगावर पडतात.

राजागो०- ( दचकून ) अरे हें काय?

सार्की.

पर्जन्याचे दिवस नसोनी जलबिंदू हे पडले ॥ तरिच-
यांचा शोध करुनिये मन शंकित हें झालें ॥ लवक-
रि जावोनी ॥ आणा शोधाचि काढोनी ॥ १ ॥

मन०- प्रियतमा, आपल्या अंगावर पाण्याचे बिंदू कोठून प-
डले हें कांहीं समजत नाहीं. परंतु आतां दासीस पाठवून त्याचा
शोध लावितें.

गोपी०- बरें आहे लवकर शोध लावण्यास सांग.

मन०- अग दासी, सासुबाईंच्या महालांत जाऊन पाण्याचे
बिंदू महाराजांचे आंगावर कोठून पडले त्याचा शोध लावून ल-
वकर परत ये. बसूं नको हो!

दासी०- आज्ञा बाई साहेब ( मुजरा करून निघून जाते. पुनः
परत येऊन ) महाराज आपले आज्ञेबर हुकूम शोध लावून आ-

लें. आज्ञा असेल तर सांगत्यें.

गोपी०- जलबिंदू पडण्याचें कारण काय तें सांगपाहूं ?

दासि०- महाराज, आपल्या मातोश्री खिडकी जवळ बसून शोक करीत आहेत, त्यांमुळें त्यांचे नेत्राश्रु अंगावरपडले असेंवाटतें.

गोपि०- काय आई साहेब शोक करीत आहेत ?

दासी०-जीसरकार.

गोपि०- पद - राग - भैरवी -

दुःखबहुतचि झालें॥जननीला॥दुःख०॥धृ०॥
कारण नकळे मजलात्याचें कोणी तिला दुःख-
दीलें॥१॥अथवा दासींनीही तिजला वाग्बाणें मा-
रीलें॥दुःख०॥२॥ ॥

प्रिये, मनमोहिनी, मला आइसाहेबांच्या दुःखाचें कारण काय आहे ह्मणून विचारावयाला गेलें पाहिजे. तरी तूं एकटीच येथें राहून बाकीच्यांस आपआपल्या कामास जाऊं दे.

मन०- जरी आपली आज्ञा, बायांनो मला सांगावयाला पाहिजे असें नाहीं कारण त्यांनी सर्वत्रांनी आज्ञा ऐकलीच पाहिजे, तरी आपले कामास निघून जा पाहूं.

( गोपिचंद व मनमोहना यां खेरीज बाकीच्या निघून जातात.

गोपी०-प्राणवल्लभे, आईसाहेब कोणत्या ठिकाणीं शोक करित बसली आहे बरें ?

मन०- प्रिया, त्या पहा खिडकींत बसून आपल्याकडे टक लावून शोक करीत बसल्या आहेत.

गोपी०- अरेरे, प्रिये कितितरी दुःख हें.

मला असें वाटतें कीं, पतिच्या वियोगामुळें तिला दुःख झालें असेल, व त्या दुःखामुळें चही अगदीं निस्तेज दिसत आहे. आतां पुढें जाऊन विचारावेंच. प्रिये तूं येथेंच उभीरहा (पुढें सरून) आई हा बंगालाधिश गोपीचंद तुझा पुत्र प्रणिपात करीत आहे.

मैना०- दीर्घायुषी हो. पण बाळा ह्यावेळेवर कचेरीस जावयाचें असून आजच इकडे येण्याचें कारण काय?

गोपी०- आईग पहा तुझ्याकडे पाहिलें असतां तूं शोकानें परिपूर्ण व्याकुळ दिसत आहेस. तरी आई, मीं तुझा पुत्र असून शोक करण्याचें कारण काय? किंवा कोणी तुला दुःख दिलें. म्हणून तुला दुःख झालें, तें सांग- म्हणजे त्याचा बंदोबस्त करतां येईल.

मैना०- पद- चाल- बलसागर तुह्मी०

पाहुनि सुंदर शरिर तुझें हें काळचि घेउनी ।। नेई तुजला आतां यमपुरीं दयानसे तन्मनी ।। १ ।। यास्तव तुजला कथुनि सांगतें बाळा गुरु करुनी ।। अमर होई तूं, सुटसी आतां काळापासोनी ।। १ ।।

गोपी० - आई मला यमापासून बिलकुल काळजी नाहीं. व त्या बद्दल तूं मुळींच दुःख करूं नको. व गुरु करण्या विषयीं मला बिलकूल न सांगतां दुसरी कांही युक्ती असेल तर सांग.

मैना०- बाळा असें वेड्यासारखें काय बोलतोस? नीट विचार कर. अरे हें आपलें शरीर, द्रव्य, आपले इष्टमित्र वगैरे सर्व फुकट आहेत. याकरितां गुरू केलास, म्हणजे त्यापासून तुला पुष्कळ नफा होईल.

गोपी०- आई मीं तुला एकदां सांगितलें ना, असें असून पुनः

गुरु करण्याविषयीं तुझा हट्ट कीं? असलें पोकळज्ञान व असलें गुरु मला नकोत-तुला दुसरी कांहीं आज्ञा करावयाची असेल तरकर,

मैना०- जा मूर्खा भलतेंच बोलूं नको-तुला जर माझें बोलणें ऐकावयाचें नसेल तर निघून जा.( राजा रागानें निघून जातो. )

( सर्व निघून जातात. )

## अंक २ रा समाप्त.

## अंक ३ रा.

पात्रें०- गोपीचंद, प्रधान, त्याचा मित्र माधवी, जालंदर.



( कांहीं सैन्य घेऊन गोपीचंदाचा प्रधान येतो. )

प्रधा०- काय करावें बरें, महाराजांनी तर साधूला आणण्या बद्दल हट्ट धरला आहे; परंतु असा विरक्त साधू आमच्याबरोबर येईल किंवा नाहीं, त्याविषयींच मला संशय वाटतो. याला जर द्रव्याची आशा असती, तर तो अशा गिरिकंदरीं व जंगलांत राहता ना. बरें अशा त्या साधूला आणण्यांत त्याचा तरी काय-

उद्देश असेल तो असो. परंतु मला असें वाटतें त्यांना त्या साधू-चा फार राग आला असावा. व त्याचा गुप्त रीतीनें शोध करण्या-करितां माधवी नामक मित्रास पाठविलें आहे, त्याचा ही मला शो-ध लागत नाहीं. व आतां त्या साधूला शोधूं तरी कोठें. ( असें म्हणून स्तब्ध उभा राहातो. तों माधवी दृष्टीस पडतो. ) बरें झा-लें ज्याची आपण वाट पहात आहों, तोच इकडे येत आहे.

( इतक्यांत माधवी येतो. )

**माध०**- ( उसासा टाकून ) हाहा काय करावें? त्या मित्राच्या सं-गतीस ज्यानें लागावें तो अगदीं एक दोन दिवसांत पार व्हाव-याचा. तो मरेना कां साधू त्याला काय करावयाचें आहे? काय-होपण या अरण्यांतून जातां जातां पायांची कशी चाळणी हो-ऊन गेली आहे. त्याला काय तो सुखानें आपल्या मंदिरांत बसे-ल इतका वेळ शोध लावतां लावतां एकदांची त्या साधूची झोंपडी सांपडली. त्याकडे पाहिलें म्हणजे जसा काय पिशाच्चा प्रमाणें दिसतो. असें असून ती म्हातारी तरी कशी एकटी येत असेल व त्याला पाहून काय भुलली असेल, तो असो. ( दूर पाहून ) अरे हें सैन्य कोणाचें दिसत आहे बरें? त्या निशाणावरून पाहि-लें असतां हें माझ्या मित्राचेंच असावें. ( कांहीं पुढें जाऊन ) तें महाप्रधानजी तिकडे बसले आहेत त्यांना जाऊन विचारलें म्हणजे समजेल ( पुढें जाऊन ) कां प्रधानजी हें सैन्य घेऊन कुठें चाललेत?

**प्रधा०**- माधवी मीं महाराजांचे आज्ञेवरून त्या साधूचा शो-ध करून घेऊन येण्यास निघालों आहे. परंतु इतका हिंड-लों तरी अद्याप त्याचा शोध लागला नाहीं मी तर बा दमून गेलों.

**माध०**- प्रधानजी, तुम्हीं राज्याचे प्रधान असून पत्याशिवाय करें-

निघालेत होच तुमची अक्कलना?

प्रधा०-माधवी अरे मीं ऐकलें होतें कीं, आपल्या गांवाच्या वेशीज-वळ झोंपडें बांधून राहिला आहे. अशा धोरणावर मीं त्याचा शोध करीत निघालों पण पत्ता नाहीं.

माध०- पण प्रधानजी, साधूला धरून आपण्याची राजाला एव ढी खटपट करशाला पाहिजे होती. त्याच्या आईचें व त्याचें रह-स्य जमलें ह्मणून त्यांत त्यांचा तोटा नाहीं; उलटा नफाच ह्मटला तरी चालेल.

प्रधा०- कशावरूनरे?

माध०- अहो प्रधानजी महाराजांना चंपावती ह्मणून एक-बहीण आहे व त्याधास्तून महाराजांस पाठवळ देण्या करितां ए-क बंधुतर होईल

प्रधा०-छि: असें आपण भलतेच भाषण बोलूं नये बरें? तें अ-सो पण साधूचा पत्ता कोठें आहे, तो लवकर सांग, ह्मणजे झालें.

माध०- अहो पत्ता तो काय तो लांब आहे? ती पहा पली कडील बा-जूस झोंपडी दिसते तीच त्याची.

प्रधा०- बरें आहे माधवी, असाच त्यांजकडे जाऊन मीं दर्शन घे-ण्याकरितां आलों आहें ह्मणून कळीव.

माध०- चला तर याइकडून. ( चालूं लागतात. )

( नंतर जालंदर प्रवेश करितो. )

माध०-प्रधानजी, आपण ज्या साधूच्या शोधार्थ फिरत आहां; ते हेच, आतां खुशाल पुढें जा आणि दर्शन घ्या.

जालं०-आमच्या मठीच्या बाहेर काय गडबड आहे; कोण आ-हेरे बाहेर?

प्रधा०-महाराज या सुंदरपूर नगरांतील रामागोर्यांन्वंद त्याचा मंत्री

आपलें दर्शन घेण्या करितां आला आहे, आज्ञा असेल तर बांहेर उभा करतो.

जालं॰-काय गोपिचंद राजाचा मंत्री आला आहे ह्मणतोस? नगर सोडुन या अरण्यांत सुख व्हावें ह्मणून आला आहे काय? त्याला सांगे कीं, आह्मीं साधूलोक कोणाची पर्वा ठेवीत नसतीं.

प्रधा॰-महाराज, तुह्मीं ह्मणतां तें सर्व खरें, परंतु तो मोठ्या दीन मुद्रेनें आपलें दर्शन घेण्या करितां आपल्या जवळ विनंती करीत आहे.

जालं॰- असें आहे तर ठीक. तुझ्या मनांत आहे तर घेऊन ये.

माध॰- आला आहे महाराज. प्रधानजी पुढें होऊन दर्शन घ्यावें.

प्रधा॰- (बरें आहे) (पुढें जातो व जालंदरनाथास वंदन करून) महाराज हा मंत्री आपणास वंदन करित आहे.

जालं॰- बेटा परमेश्वराच्या कृपेच्यायोगें तुझें कल्याण होईल. बेटा, या घोर अरण्यांत येण्याचें कारण काय बरें?

प्रधा॰- महाराज, ह्या सुंदरपुर नगरांतील राजा गोपीचंद, त्याची अशी इच्छा आहे कीं, आपल्या चरणाचें दर्शन घ्यावें. व तो स्वभावानें अगदीं गरीब आहे ह्यास्तव कृपा करून आपण मज बरोबर चलावें एवढी आपल्या चरण कमला जवळ विनंती आहे.

जालं॰- मंत्री सांगतों ऐक.

## अंजनीगीत.

साधूनां हें बहुत योग्य चीं, ऐसें मजला स्थळ नादिसेची.
येऊनि तेथें सुख न येची, अणु मात्र मजला ॥ १ ॥

प्रधा॰- महाराज असें कधींही होणार नाहीं. राजा तसा नाहीं, ही माझी खात्री आहे. व त्यांच्या मनांत तुमच्या पायाचें दर्शन घ्यावें- अशी फार इच्छा आहे तरी अनमान न करितां चलावें.

जालं॰- ठीक आहे. बेटा तूं पुढें हो. मीं पाठीमागून येतों.

प्रधा०- महाराज, या रथांत बसावें ह्मणजे आपणास चालण्याचे श्रम होणार नाहींत.

जालं०- छे: तुमची तो रथ नको मीं पायानें चालत येतों. ( चालूं लागतात. )

प्रधा०- मित्रा माधवा, साधूमहाराजतर रथांत बसत नाहींत. करितां तूं हा रथ घेऊन जा, आणि आह्मीं येतों आहों. ही बातमी कळीव.

माध०- बरें आहे. ( माधवी रथासह जातो. )

प्रधा०- महाराज ह्या रस्त्यानें यावें.

( चालूं लागतात. )

( पडद्यांत भालदार पुकारतो. )

प्रधा०- महाराज, आपण मंदिराजवळ तर येऊन पोंहोंचलों.

जालं०- मंत्री तूं जा आणि मीं आलों ह्मणून सांग.

प्रधा०- महाराज, तुह्मांस सोडून मीं जाणार नाहीं, तुमच्या बरोबर जाईन. महाराज या रस्त्यानें यावें.

( चालूं लागतात. )

( तदनंतर गोपीचंद व माधवी प्रवेश करितात.

गोपी०- कां रे मित्रा, माधव्या, तूं आलास आणि प्रधानजी अजून आला नाहीं हें काय?

माध०- मित्रा, काय सांगावें तो साधू अगोदर येतच नव्हता. दोनचार तास त्याची विनंती केली, तेव्हां तो येण्यास कबूल झाला.

गोपी०- बरें मग तो आहे कोठें?

माध०- प्रधानजी व तो असे बरोबर येत आहेत. इतक्यांत आलेच असतील दरवाज्याजवळ.

( वेत्रवतिका येते. )

वेत्र०-महाराजांचा विजय असो. सरकार जालंदरनाथासह प्रधानजीची स्वारी दरवाज्याजवळ आली आहे.

गोपी०-असें आहे तरच लक्ष्मीही त्या साधूचा आदर करण्याकरितां येतों चल. (चालूं लागतो.)

वेत्र०-(जालंदरास) महाराज, हे पाहिलेत का राजे साहेब. त्यांना समजल्याबरोबर तुह्मांस पुढें सामोरे आले आहेत.

गोपी०-(पुढें होऊन) महाराज, सुंदरपूरनगरांतील राजा जो गोपीचंद तो आपले चरणीं प्रणिपात करीत आहे, आणि मनामध्यें एवढा हेतू आहे कीं, मंदिरांत चलावें.

जालं०-चलावें बेटा कल्याण.

गोपी०-महाराज, या रत्नजडीत सिंहासनावर बसावें.

जालं०-राजा गोपीचंदा, आह्मीं साधूलोक हें रत्नजडीत सिंहासन आमच्या काय उपयोगीं; आमचें आसन ह्मटलें ह्मणजे हरणाचें कातडें. त्याकरितां तूं त्यावर बैस, मीं खालीं बसतों.

गोपी०-तरमग महाराज बसावें.

जालं०-राजा हें चांगलें-राजा गोपीचंदा.

## कामदा.

काय धरुनि तूं हेतु त्वन्मनीं ॥ आणिलें मला तूं चितेधुनी ॥ इच्छा आपुली कथुनि सत्वरीं ॥ कार्य कोणतें सांगलो करीं ॥ १ ॥ ॥

गोपी०-महाराज दुसरी इच्छा कांहीं नाहीं आपलें दर्शन घ्यावें हीच इच्छा. आतां आपली पूजा करितों. ही ग्रहण करून मला आपला शिष्य मानून घ्यावा. मीं आपली सेवा करण्यास तयार आहें.

जालं०-राजा तुझी इच्छा आहे तर कांहीं हरकत नाहीं तूं माझी पूजा करतोस हें पाहून माझे मनाचे ठिकाणीं पुष्कळ सुख झालें

आहे.

गोपी०-कोण आहेग, वेत्रवतिके, अंतःपुरांत जाऊन उपाध्यांस पू-
जेचें साहित्य आणण्यास सांग पाहूं.

वेत्र०- ठीक आहे (मुजरा करून निघून जाते व पूजा साहित्या-
सह उपाध्यास घेऊन परत येते.) ते पहा तुमची वाट पाहात-
आहेत तरी आपण पुढें जावें.

( जालंदराची पूजा करूं लागतो इतक्यांत जालंदर ध्यान
स्त होतात. )

माध०-मित्रा अरे कसली पूजा करितो आहेस त्याचे मायातर
निघून गेले व कुडी तुजपुढें आहे.

गोपी०-( जालंदराकडे नीट लक्ष लावून ) वारे साधू! किती
तरी हें ढोंग माजविलें आहे, त्यानेंच आपल्या नगरातील बहु
तेक बायकांना वेड्या करून सोडल्या आहेत. मित्रा त्याचा चे-
हेरा तर पहा कसा दिसत आहे तो.

पद- चाल- लालशालजोडीजर०.

जटाभारहाशिरींघेउनी भस्मचिअंगीलाऊनी ॥
त्यालाह्मणतोंसाधूआह्मी परिहे कपटीबहु अ-
सुनी॥ धृ०॥ कंथाकुबडीकिन्नरि घेउनीजणुं भो-
ळाचीमजादिसुनी॥ वरुनिचांगलाशुद्धमनाचा-
आंतचिकाळाबहुअसुनी॥ बहुतास्त्रियांनाफसवु
नियानें मनत्याचें भुलवूनी॥ अशासाधुलाखवाड्या-
मध्येंटाकातुह्मिनेवोनी ॥१॥ ॥ ॥

माध०- मित्रा त्यासाधूची तेवढी किनरी ठेवबरें? देऊनको-
मला त्याचें तुणतुणें बनाविणें आहे

प्रधा०- महाराज आपण दयावंत, विचारी, गरीबांचे व साधूंचे

पालण करणारे असतां अशी वर्तणूक करणें हेंच मोठें नवल आहे. व असें हें अनुचित कृत्य आपण करूं नये.

गोपी०-( रागानें ) प्रधानजी, तुह्माला माझें बोलणें ऐकावयाचें आहे किंवा नाहीं?

साकी.

त्वरितचि वेडा नि त्यासा धूळारखाड्यामधिं घालोनी॥
दाहालक्ष घोड्यांच्या लीदो त्याजवरी टाकोनी॥ लवकरि जाऊनी॥ माझी आज्ञा परिसूनी॥ १॥ ॥

माध०-प्रधानजी माझ्याही तर्हेचीलीद न्यावरें विसरूं नका हो.

जाल०-महाराज, मीं आपला दास आहें, आपण माझा राग करूं नये. ( सेवकांकडून जालंदरास नेववितो. )

गोपी०-मित्रा, आतां माझें मन कसें शांत झालें आहे. पाहूं आतां आई साहेब कुठे जातात त्या!

## अंक ३ रा समाप्त.



# अंक ४ था.

पात्रें० - जालंदराचा शिष्य कानीफ, गोरख.

( तदनंतर कानीफ प्रवेश करितो. )

कानी० - पद-चाल- होईल कलह.

जन्मा येऊनि मापी ॥ संसारांतच्ची गेले भुलोनी ॥ ध्रु० ॥ परमेशाते विसरुनि गेले ॥ मायाडोहीं बुडुनि राहिले ॥ यास्तवत्याला भजूनी ॥ फुकटची सर्वही पीताजननी ॥ जन्मा ये० ॥ १ ॥ ॥

( इकडे तिकडे फिरूं लागतो. )

( इतक्यांत गोरख नाथ येतो. )

श्लोक- शार्दूलविक्रीडित.

जन्मा येउनि प्राणि हे बहुतची मोहामध्यें गुंतले ॥ जाऊनी विसरूनि त्या प्रभुवरा आयुष्य हें खर्चिलें ॥ आतां सावध होउनी तरि मनीं चिंतीत जा ईश्वरा ॥ रक्षीतो सकलां जनां सुखवुनी घेऊनि जाई पुरा ॥ १ ॥ ॥

गोपी० - ( कानीफास पाहून ) कुवाजी आदेश आदेश.

( त्याजकडे पहून ) आदेश आदेश.

दिंडी.

कोण गुरुनें तूज ला मंत्र दीया ॥ नाम त्याचें आपुलें सांगुनीयां ॥ कृपा मजवरती आपुली होउनीयां ॥ जाणें आहे कोठें चि साधुराया ॥ १ ॥ ॥

कानी० - पद- चाल- रडती दीनवद-

जालंदर हा गुरु असुनी ॥ गवाचि नलगे बहुत दिनी ॥ ध्रु० ॥ त्याचा शोध करीतां चि हा ॥ आलों या स्थळीं स्वामी पहा ॥ कानिफ नाम चि मज असुनी ॥ घ्यावें ऐकुनी तव श्रवणीं ॥

आपुल्या गुरुचें तसेंच तुमचें नांवाचि सांगोनी येणें झालें कोठुनी ॥ १ ॥

गोपी०- कामदा.

नाम माझें हें गोररवाचि असे ॥ गुरूचा च मीं शोध करित- सें ॥ मछिंदर हें नाम असुनियां ॥ शोधुं मीं कुठें भूवरीचया ॥

कानी०- साधुजी त्याजगोला निर्माण करणारांची कशी अघटी- तरचना आहे? त्यानेंच रज, सत्व, तम हे तीन गूण निर्माण केले तसेंच ही माया जी आहे हा केवळ बाजारच आहे. सारांष यामा- यारूपी बाजारांत एक आदिनाथ जो भगवान् तोच खरा आहे. त्याचे शिवाय कांहीं एक चालणार नाहीं.

गोर०- कानीफा ज्यानें आपल्याला निर्माण केलें, त्याला जाण- ण्या एवढें ज्ञान आपणास कोठें आहे.

कानी०- गोररवा, गुरूच्या कृपेनेंच ज्ञान होतें. नाहींतर एकंदर मायी त्या अज्ञानांत बुडून गेले असते.

गोर०- कानीफा, तूं जर आपल्या गुरूचा चेला आहें ह्मणतोस, तर त्याचेपासून तूं काय करामत जाणत आहेस?

कानी०- वाहावा! गोररवा, पाहा आतां हा सुताचा धागा आहे, त्यां- वर बसून ध्यान कर

गोर०- (त्यावर बसून) वाहवा, तुझी करामत ती फार चांगली आ- हे, ती पाहून मला अतिशय आनंद झाला आहे.

का०- गोररवा, तूं जर आपल्या गुरूचा चेला ह्मणवितोस तर त्या- झाडावर जे आंबे आहेत, तें खालीं आण पाहूं?

गोर०- ठीक आहे. (आंब्यास आज्ञा करतांच) आंबे जमी- नीवर पडतात.)

कानी०- ठीक आतां हेच आंबे पुन्हा होते तसे झाडावर नेऊन-

लाव पाहूं?

गोर० - पहावें (आंबे डाहाळीस लावतांच चिकटून राहातात.)

का० - गोरखा, गुरू असावा तर जालंदरच असावा. नाहींतर पुष्कळ गुरू आहेत.

गोर० - कानीफा, तूं आपल्या गुरूची इतकी बढाई करतोस, अतो इतका ज्ञानी असतां, यःकश्चित गोपीचंदानें त्याला खाड्यांत टाकावें काय? आणि तूं त्याचा चेला ह्मणवितोस तेव्हां तुला काय ह्मणावें? गुरु मछिंद्रनाथच खरा.

कानी० - गोरखा, तूंही आपल्या गुरूची इतकी बढाई करितोस परंतु तुझ्या गुरूची काय कथा आहे हें तुला कुठें माहीत आहे? सांग बरें. तुझा गुरू माछिंदरनाथ त्याला स्त्रियांनीं धरून आपल्या राज्यांत नेऊन ठेविला आहे तूं जर खऱ्या गुरूचा शिष्य आहेस, तर त्याला सोडवून आण.

गो० - साधुजी, स्त्रीराज्यांत गुरूला त्यानी नेला कसा, त्याचें कारण मला सांगा.

का० - गोरखा, त्याच्यावर मोहनी घालून त्याला नेलें दुसरें काय? त्या देशांत तर तुझा गुरू नाहीं. तपास करीत करीत स्त्री राज्यांत जाऊन त्याला सोडवून आण.

गोर० - कानीफा त्वां ह्मणण्याप्रमाणें मीं माछिंद्रनाथाला आणल्याशिवाय राहाणार नाहीं. नंतर तो गोपीचंदाचे राज्यांत येऊन गोपीचंदाची खाक केल्याशिवाय जालंदरास काढणार नाहीं.

का० - हें तुझें ह्मणणें बरोबर आहे. आदेश. आदेश.

गोर० - आदेश, आदेश.

(असें ह्मणून निघून जातात.)

चवथा अंक समाप्त.

## अंक ५ वा.

पात्रें०- कानीफा, वनचर, मैनावती, सखी, गोपीचंद, मछिंदर, गोरख, व जालंदर.



( कानीफनाथ प्रवेश करितो. )

का०- अहाहा! गोरखनाथाला सोडल्यापासून फिरत फिरत या शहराजवळ येऊन पोंहोंचलों; परंतु हें शहर कोणाचें असावें बरें; बहूतकरून ज्यानें आपल्या गुरूला खाड्यांत टाकिलें. त्याच गोपीचंदराजाचें असावें असें वाटतें. (पुढें येऊन) तो कोण दिसत आहे बरें? अथवा कोणीं का असेना, त्याला विचारलें म्हणजे समजेल. अरे तूं कोण व तुझें नांव काय आहे तें सांग.

वन०-( हातजोडून ) महाराज माझें नांव वनचर व मीं ह्या अरण्यांतच वास करितों.

कानी०- वनचरा, ह्यानगराचें नांव काय व ह्या ठिकाणीं कोणराजा राज्य करितो?

वन०- महाराज ह्या ठिकाणीं मींच राज्य करितों.

का०- वनचरा अशी थट्टा करण्याचें काम नाहीं, नीट सांग.

वन०- हां हां। समजलों त्या नगरचें नांव विचारतां? त्याचें नांव सुंदरपुर व येथील राजाचें नांव गोपीचंद.

कानी०- वनचरा, गोपीचंद राजा पुष्कळ पापी चांडाळ आहे त्याचें कधींही तोंड पाहूं नये.

वन०- महाराज, हा राजा तसा नाहीं. त्याला बाराशें बायका आणि साळाशें दासी आहेत. हा सर्व गौड बंगालचें राज्य चालवितो. आतां असें असून कसा चांडाळ आहे तें सांगा.

कानी०- वनचरा तुला माहीत नाहीं. त्यानें माझा गुरू जो जालंदर त्याजला खाड्यामध्यें टाकून दिलें आहे कांहीं फिकीर नाही. वनचरा त्या ठिकाणीं राहाण्याला जागा कोठें आहे?

वनच०- महाराज हा जवळच एक तलाव आहे. व त्या तलावाजवळ एक झोंपडी आहे त्यामध्यें जागा आहे.

कानी०- वनचरा, ती जागा कोठें आहे ती दाखव.

वन०- चलावें महाराज. (कानीफनाथ व वनचर झोंपडीमध्यें येतात, इतक्यांत मैनावती आपल्या दासीसह प्रवेश करिते.

मैना०- अगे दासी, माझा गुरू जालंदर अद्याप दृष्टीस पडत नाहीं. व त्याचे शिवाय मला एक घटकाभर सुद्धां करमत नाहीं. आतां काय करावें, अथवा त्याला शोधावा तरी कोठें?

दासी०- बाईसाहेब, तुमचा गुरु कोठें आहे तो मलाही माहीत नाहीं.

मैना०- दासी, या शहरांत गुरू नाहीं, तर माझा जीव राहाणार नाहीं, पहा या संसारांत सुख आहे म्हटलें तर तेंही नाही. जर त्या ठिकाणीं गुरू मिळत नाहीं तर अरण्यांत तरी शोध करण्यास गेलें पाहिजे. गुरूशिवाय अन्न सुध्धां गोड लागत नाहीं.

दासी०- तुम्हीं अरण्यांत जातां, परंतु गोपीचंद राजा रागें भरेल या करितां आपण जाऊं नये.

मैना०- त्यांचे शिवाय मला चैन पडत नाहीं, करितां अरण्यांत जाऊं. चल माझ्याबरोबर. ( असें म्हणून अरण्यांत जातात. ) हे वृक्षानो माझ्या गुरूला तुम्हीं पाहिलात काय? ( असें बोलून शोक करिते. ) गुरुनाथ, तुमच्याशिवाय मला अन्न वस्त्र हीं गोड लागत नाहीं. एकवेळ आपलें दर्शन व्हावें, एवढीच विनंती आहे.

दासी०- बाईसाहेब, इतकें करण्याचें कांहीं कारण नाहीं. मीं या अरण्यांत जाऊन तपास करून येतें.

मैना०- ठीक आहे, लवकर शोध करून ये. ( दासी अरण्यांत जाऊन शोध करून येते. )

दासी०- बाईसाहेब, तलावाजवळील झोंपडींत एक जोगी येऊन उतरला आहे, तुम्हीं जाऊन त्याला विचारावें.

मैना०- चल तर आपण जाऊन त्याला विचारूं. ( असें बोलून मैनावती कानीफाजवळ येऊन त्याचे पाय धरते. )

कानी०- बाई तुझें कल्याण होवो. बाई तूं कोण आहेस, व त्या ठिकाणीं येण्याचें कारण काय?

मैना०- महाराज, सुंदरपुरचा राजा गोपीचंद त्याची मीं आई. माझें नांव मैनावती. आपलें दर्शन घेण्याकरितां आलें महाराज तुम्हीं कोण. कोठून आलां, जाणार कोठें, तुमच्या गुरूचें नांव काय, हें कृपाकरून सांगावें.

कानी०- बाई, माझें नांव कानीफ. माझा गुरू जालंदर, त्याचा शोध करित करीत या ठिकाणीं आलों.

मैना०- साधु महाराज, माझाही गुरू जालंदरच. मला सुद्धां त्याचा शोध लागत नाहीं, म्हणून या ठिकाणीं फिरत फिरत आलें. तों आपण दृष्टीस पडलां. तर महाराज, आतां मीं काय करूं? त्यांचेशिवाय माझे पंचप्राण व्याकूळ झाले आहेत. तरी आ

तां मलाते केव्हां भेटतील बरें ?

का०- बाई, तूं शोक करूं नको, तुझ्याभक्तीच्यायोगें करून तुला जालंदरनाथ भेटेल.

मैना०- महाराज तुमच्याभरंवशावर मीं स्वस्थ बसते.

का०- बाई, तुझा मुलगा मोठा चांडाळ पापी आहे, त्यानेंच गुरुनाथाला खाड्यामध्यें टाकूनदिलें आहे. आतां मी त्याचें भस्म करून टाकीन.

मैना०- महाराज, असे रागाऊं नका. मीं गुरूला कोणी खाड्यामध्यें टाकिलें, याचाशोध करून येतें. ( असें ह्मणून राजमंदिरांतयते.

( राजकचेरी. )

प्रति०- राजाधिराज गोपीचंद्राज महाराज.

( सिंहासनावर राजा बसला असतां, सर्व दरबारांतील मंडळी मुजराकरून बसतात. )

गोपी०- प्रधानजी, आपल्याप्रजेमध्यें हाल हवाल कशीकायआहे?

प्रधा०- महाराज, यासर्वनगरांत आपण राज्यकरतां व सर्व प्रजा आनंदानेंराहून आपलें आयुष्यवर्धमाना बद्दल ईश्वराजवळ दुवा मागतआहे. कोणीही दुःखी नाही.

( इतक्यांत मैनावती प्रवेश करितें. )

प्रति०- महाराज, आईसाहेबांची स्वारी आली आहे.

गोपी०- काय आईसाहेब आल्या आहेत, प्रधानजी दरबारांत आईसाहेबयावयाचें कारणकाय असावें बरें, अथवातिजवर असें कोणतें संकट प्राप्तझालें असावें; भगवान् जाणे. ठीकआहे. प्रतिहारा, आईसाहेबांना येऊंदे. ( इतक्यांत आई आली असें पाहून तिचे पायांपडतो.

गोपी०- आईसाहेब, आपलाबालक आपणासनमस्कारकीतआहे

मैना०- भगवान् तुझें कल्याण करील.

गोपी०- आई, दरबारांत एवढ्या जलदीनें येण्याचें कारण काय असावें बरें? आणि हें तुझें मुख आज म्लान दिसत आहे, असें तुजवर कोणतें संकट प्राप्त झालें आहे कथन कर.

मैना०- गोपीचंदा, अरे हें काय केलेंस, जालंदराला खाड्यामध्यें टाकून दिलास काय?

गोपी०- आई मला काय जरूर! मला ही गोष्ट बिलकूल माहीत नाहीं.

मैना०- बाळा, खोटें बोलण्यांत अर्थ काय? अरे त्याचा शिष्य कानीफ या ठिकाणीं आला आहे. आतां तूं त्याचे पुढें कसा वांचशील,

गोपी०- आई मीं नाहीं त्याला टाकिलें, कानीफानें तुजला कांहींतरी खोटें सांगितलें.

मैना०- तूं खोटें बोलून त्यालाही खोटा करितोस, तरी तुझें तोंड सुद्धां पाहाणार नाहीं. ( असें म्हणून रागानें निघून जाते. )

गोपी०- प्रधानजी, ही वेळ मोठी कठीण आली आहे, जालंदराला खाड्यामध्यें टाकिला, म्हणून त्याचा शिष्य कानीफ त्या ठिकाणीं आला आहे. याकरितां मीं अरण्यांत गमन करितों.

प्रधा०- महाराज दुःखी होऊं नये. कांहींतरी धीर धरा.

गोपी०- छे तें कांहीं नाहीं मीं अरण्यांत गमन करितों.

प्रधा०- महाराज तो फार दयाशील आहे, त्याला तुम्हीं शरण गेलें असतां कांहीं भय नाहीं.

गोपी०- ठीक आहे.

( राजा उठून आईजवळ येऊन म्हणतो. )

गोपी०- आई हा बालक चरणीं वंदन करीत आहे.

मैना०- बाळा कल्याण.

गोपी०- आई, आपणाजवळ माझी एक विनंती आहे, सांग म्हणशील.

तर सांगतो

मैना०- बाळा सांग.

गोपी०- आई, मीं चांडाळ पापी आहें त्या करितां मला पवित्र केलें पाहिजे.

मैना०- बाळा ठीक आहे ऐक.

( असें म्हणून मैनावती त्याला घेऊन जाते. )

मैना०- साधूमहाराज, हीआपली दासी चरणी प्रणिपात करीतआहे.

गोपी०-महाराज, हा आपलाबालकसमानगोपीचंद चरणीं प्रणिपात- करीत आहे.

का०-तुमचें कल्याण होवो.

मैना०-साधुजी हा माझा मुलगा गोपीचंद आपणांस शरण आला आहे.

गोपी०-महाराज मीं अल्पबुद्धीनें तुमच्यागुरूला खाड्यामध्येंटाकून- दिला त्या विषयीं मला क्षमा असावी.

का०- मूर्खा, चांडाळा पाप्या, असें तूं खराब काम केलेंस, तूं आतां ज- ळून राख होशील क्षमा कशी असते ती मला माहीत नाहीं.

गोपी०-महाराज रागाऊंनका मीं आपले चरण सोडणार नाहीं मजव- र कृपा करावी.

का०-राजा, माझे चरण सोड आतां कशाला लीनपणानें भाषण- करीत आहेस? त्य वेळीं तुझी अक्कल कोठें गेली होती? आपल्या- शरीराची आशा सोड आणि त्या ठिकाणाहून निघून जा.

गोपी०-महाराज मी आपले चरण सोडणारनाहीं तुम्हांला असें वाटे ल तसें त्या देहाचें करावें.

मैना०-महाराज हा माझा मुलगा नव्हे, हा तुमचा आहे असें सम- जून तुम्हांला वाटेल तसें करावें.

का०- गोपीचंदा, माझे चरण सोडून दे. मीं तुला एक युक्ती सांगतों

मैना०- महाराज, काय युक्ती आहे ती मलातर सांगा· म्हणजे त्या-प्रमाणें माझा मुलगा चालेल·

का०- कां. गोपीचंदा, मैनावती, आपला गुरूजो जालंदर नाथ या-चाराग फार कठीण आहे. जालंदराचा भाऊ माछिंद्रनाथ, याजलागो ररवनाथ, थोड्या वेळांत घेऊन येईल त्याला तूं शरण जा, म्हणजे सां-जपासून तो तुझा बचाव करील, आतां तूं आपल्या महालांत जा-ऊन राहा. मनामध्यें कांहीं एक भिऊंनको·

गोपी०-महाराज, तुम्हाला वाटेल तें करावें·

का०-राजा, भिऊंनको·

गोपी०-महाराज ठीक आहे, मीं जातों हा बालक तुमचा आहे। हें· मात्र लक्षांत ठेवा म्हणजे झालें चरणीं लीन होत आहे·

का०- कल्याण·

(गोपीचंद, मैनावती, आपल्या मंदिरांत गमन करितात·)

(इतक्यांत माछिंद्रनाथ व गोरख येतात· त्यांस पाहून)

का०-गुरुमहाराज, हा आपला बालक चरणामत वंदन करीत आहे·

मछिं०-कानिफा कल्याण·

गोर०- गोरखनाथ, आदेश आदेश·

माछिं०- आदेश आदेश·

(कानीफ गोपीचंदाला खुणा करितो· त्या बरोबर गोपीचंदत्या-चे चरण धरितो·)

गोपी०-महाराज, हा बालक चरणीं लीन होत आहे

माछिं०-कल्यांण,

माछिं०-पहा मैनावती, जालंदराचा राग मोठा कठीण आहे· याकरि-तां तो भाइन्यानें शांत होणार नाही· म्हणून माछिंद्रनाथ स्वामींना ह्या· ठिकाणीं आणिलें आहे तर त्यांना तूं शरण जा म्हणजे तो रक्षण करतील·

साकी.

मनगुरूच्यारागकठिण ची मजलाशांतनहोई ॥ करि-
तांतूचीशरणजाउनीअभयवचनतवघेई ॥ लयकरि
जावोनी ॥ चरणींमस्तकठेऊनी ॥ १ ॥ ॥

मैना०-महाराज, ही दासी चरणीं लीन होऊन विनंती करीत आहे-
कीं, हा माझा मुलगा गोपीचंदराजा आपला बहुत अपराधी आहे.
त्याने जालंदरगुरूला अज्ञानपणानें खाड्यांत टाकून दिला आहे,
तरी त्याजवर दया करून त्याचें रक्षण करा.

जालं०-कानीफा, ही मैनावतीत रमलाशरण आली आहे. त्याक-
रितां गोपीचंदाचें रक्षण केलें पाहिजे. नाहींतर आपले सत्वास हा-
नी येईल कारण, शरणागताचें रक्षण करणें, हा आपला धर्म आहे.

मैना०-महाराज, अपराधाची क्षमा असावी.

पद. (चाल- प्रीतीस पारनसे. )

दयाकरामजवरी ॥ गुरुजी तुम्ही दयाकरामजवरी० ॥
धृ० ॥ तुंजवांचुनिमजत्राताताहीं ॥ अन्याचिभूमिवरी ॥
॥ १ ॥ जालंदरगुरुघालुनिकूपीं ॥ नेणुनिकृत्यकरी ॥ २ ॥
अपराधीमीबहुताचेआहे ॥ रक्षणमाझेंकरीं ॥ ३ ॥ ॥

मै०-महाराज, कृपा करून त्या बालकाचें रक्षण करावें.

मच्छिं०-तूं सांगत्येस म्हणून तुला एक युक्ती सांगतों, ती अशीकीं,
प्रथम तीन पुतळे एक सोन्याचा, एक रुप्याचा, एक लोखंडाचा, असे-
तयार करून ठेव.

गो०- ठीक आहे महाराज, असें म्हणून पुतळे तयार करण्याविष-
यीं हुकूम करितो व प्रधान तयार करितो आणि राजास येऊन सांगतो.

प्रधा०- महाराज आपले आज्ञेप्रमाणें खाडा खणून त्या खाड्याज-
वळ तीन पुतळे उभे करून ठेविले आहेत.

मच्छिं०-ठीक आहे. राजा खाडा कुठें आहे, तो दाखव.

प्रधा०-यावें महाराज.( सर्व चालूं लागतात. व खाड्याजवळ येऊन ) महाराज, या खाड्यामध्यें जालंदर गुरूला टाकिलें आहे.

मच्छिं०-राजा, प्रथम लोखंडाचा पुतळा उभा करून जालंदराला आदेश कर.

गो०- आई, अग पाहिलास का, काय चमत्कार आहे तो?

हे गुरुमहाराज अधांत्रीं असून त्यांना मातीचा स्पर्श ही-नाहीं.

मै०-बाळा, नजाणून कृत्य केलेंस त्याचा दाखला आज तुझ्या प्रत्ययास आला-

मच्छिं०-राजा गुरूला आदेश कर-

गोपी०-ठीक आहे ( असें ह्मणून लोखंडाच्या पुतळ्याच्या पाठीमागें-उभा राहून ) गुरूमहाराज चरणीं वंदन करीत आहे.

जालं०-( खाड्यांतून ) चांडाळ पापी कोण आहे तो?

गोपी०- महाराज मीं राजा गोपीचंद त्रिलोकचंदाचा पुत्र आहें.

जालं०- चांडाळ पापी तुझें भस्म होवो.

( लोखंडाचा पुतळा भस्म होतो. )

गो०- हाय हाय आतां मीं काय करूं.( असें ह्मणून मच्छिंद्रनाथाच्या सांगण्यावरून दुसरा चांदीचा पुतळा उभा केला व पुनः आदेश करितांच तो ही भस्म झाला ) नंतर तिसरा सुवर्णाचा पुतळा ही भस्म झाला.)

गोपी०-आई, आतां माझें रक्षण होण्याची वेळ कठीण आहे. कारण तीन ही पुतळे भस्म होऊन गेले.

मच्छिं०-राजा भिऊं नको, असाच उभा राहून आदेश कर.

गोपी०- महाराज मीं या ठिकाणीं आतां उभा राहूं शकत नाहीं.

मछिं०- कानिफा, पहा गोपीचंदानें जालंदराला खाड्यांत टाकि- लें त्यावेळेस भ्याला नाहीं, आणी आतां कसाभितोआहे?

मैना०- महाराज, अज्ञानपणानें त्याणें अपराध केला, परंतु त्या अप- राधाचा आतां त्याला पश्चात्ताप होऊन शरण आला आहे, तरी- त्याला अभयवचन द्यावें.

मछिं०- अच्छा गोपीचंदा, ही विभूत तुझ्या अंगालालावीत आहें, व तुझ्या मस्तकावर मीं आपला अभयहात धरिला आहें आतां तूं- नभीतां खाड्याजवळ जाऊन आदेश कर.

गोपी०-( खाड्याजवळजाऊन ) गुरुमहाराजवंदन करीत आहें.

जालं०- कोण आहे?

गोपी०- महाराजमीं आपलादास चंडालपापी गोपीचंद आहें.

जालं०- राजा जीवंत आहेस तूं?

गोपी०- महाराज आपल्या कृपेनें जिवंत आहें.

जालं०- राजा तुझें शरीर अमरहोवो.

( जालंदरास खाड्यांतून बाहेर काढितात. )

( सर्वजेणएक मेकांस आदेश करितात. )

गोपी०- गुरुमहाराजहा दास चरणीं मस्तक ठेवीत आहे.

जालं०- कल्याण राजा तूं आतां सुखानें राज्य भोगचे.

गो०- महाराज, नको मला तो राज्य भोग, मला आपण आतां अनु- ग्रह द्यावा एवढीच माझी इच्छा आहे.

जा०- राजा, जोग घेणें फार कठीण आहे, त्याकरितां तूं सुखानें- राज्य कर.

गो०- महाराज, कितीही कठीण असला तरी मी करीन.

जा०- ठीक आहे राजा आतां जा आणि उद्यां ये

## अंक ९ वा समाप्त.

# अंक ६ वा.

पात्रें.-गोपीचंद, त्याच्याराण्या, जालंदर, मैनावती, कानीफ.



( तलावाजवळ आंब्याचे झाडाखालीं जालंदरनाथ व कानीफ-बसले आहेत, इतक्यांत गोपीचंद येऊन हात जोडुन उभा राहातो)

गोपी०- साधूमहाराज, हा अधमपापी गोपीचंद वंदने करीत आहे.

जा०- राजाकल्याण.

गो०- महाराज मला राज्य करण्यांत कांहीं एक सुख नाहीं. करितां-कृपाकरून मजवर अनुग्रह करावा व आपला वरदहस्त माझ्या-मस्तकावर ठेवावा, म्हणजे मला ज्ञान प्राप्त होईल. व ही मोहमाया-सुटून जाईल.

जा०- बचा, तूं आपलें राज्यकर. पहा हा जोग फार कठीण आहे व यामध्यें कांहीं एक सूख नाहीं.

गो०- महाराज, मलाराज्यभोगनको. करितां आपणाजवळ एवढेंच-मागणें आहे कीं, मलाजोग द्या.

जा०-(गोपिचंदाचें बोलणें ऐकून ) बेटाकानिफा, राजातर बहूत-दीनझाला आहे व माझ्याजवळ जोग मांगत आहे. काय करावें?

काा०- महाराज, राजा अगदीं गरीब होऊन मोठ्या भक्तीनें तुह्मांस शरण आला आहे. तरी त्याजवर कृपा करणें हें योग्य आहे.

जालं०- राजा, ठीक आहे. परंतु हा जोग घेणें दुर्घट आहे. पहा- त्या जोगवेषांत स्त्रीसुख, संपत्ती, पुत्र वगैरे कांहीं एक मिळावया- चें नाहीं, आणि उलटें रानांतून फिरावें लागेल. ह्मणून सांगतों कीं तूं त्या भरीस पडूं नये.

गोपी०-महाराज, तुह्मी सांगतां हें सर्व खरें आहे, परंतु मला असें वा- टतें कीं, हा संसार सर्व फुकट आहे. करितां तें कांहीं एक मला नको. आपण मला जोग द्यावा.

जा०- राजा ठीक आहे, तुझी इच्छाच आहे तर घे. परंतु एक आदि- नाथ गुरूचा मंत्र तुझ्या कानांत सांगतों, तो ह्मणून भगवानाचें ध्या- न कर. (असें ह्मणून त्याला जोग देतो.)

गोपी०- महाराज, त्या दुनियेमध्यें एक भगवानाशिवाय मला दुसरा कोणीही दिसत नाहीं. आतां मला आज्ञा द्या. ह्मणजे मी अरण्यांत जातों.

जालं०-राजा ठीक आहे. तूं अरण्यांत जाऊन व सर्व तीर्थें पाहून- त्याठिकाणीं स्नान करून, आपलें शरीर शुद्ध कर. आणि एक- वर्षानें मला दर्शन देत जा, असें सांगून निघून गेले.

(नंतर गोपीचंद राजा मेनावतीच्या महालांत जाऊन- दाखल होतो.)

सखी०-बाई साहेब, आपले आंगण्यांत राजे साहेब कांहीं च- मत्कारीक पोषाग करून आपल्या तोंडानें अलख पुकारी- त आले आहेत.

मैना०- सखे, माझा मुलगा गोपीचंद आला आहे, तर त्याला आंत येऊं दे.

(इतक्यांत गोपीचंद येऊन मेनावतीच्या पायां पडतो.)

के०-साधूजी, तुमचा देश कोण? व जोग घेण्याचें कारण काय?

गो०- मीं आपला पुत्र गोपीचंद राजा आपल्या चरणीं लीन होत आहे.

मैना०-बेटा, राजा तुझें कल्याण होवो, बाळा बस माझ्याजवळ.

गो०-आई, मला कोणाच्याही घरांत राहण्याची आज्ञा नाहीं. याकरितां मीं अरण्यांत जातों. मला आज्ञा दे.

मैना०-बाळा अरे तूं राजा असून जोग घेतलास खरा, परंतु सर्व प्रजा, राण्या, तुझ्यासाठीं लीन होऊन बसल्या आहेत, असें असतां सर्व राज्य सोडुन बैरागी होऊन कोणीकडे चाललास आणि ह्मणतोस मला जाण्यास आज्ञा दे काय?

गो०- आई, ह्याउपरि येथें कोणाचा कोणी नाहीं. मीं सर्व जगाला सोडून दिलें, अग असें पहा कोणाची राणी, आणि कोणाची प्रजा, सर्व फुकट आहे, ह्याकरितां ह्यांत सुख आहे, असें मानून हा वेष धारण केला आहे. आतां मीं अरण्यांत गमन करितों. आज्ञा दे.

मैना०-बाळा, तुला जालंदरनाथानें उपदेश दिला हें पाहून मला फार आनंद झाला. परंतु बाळा, जरी गुरूच्या प्रसादें करून तुझी काया अमर झाली आहे, तरी तूं आपल्या राणी समवेत राज्य चालव.

गोपी०- आई, आतां मीं कांहीं राणी बीणी समजत नाहीं.

मैना०- बाळा, हें तुझें भाषण ऐकून मला अतीशय दुःख होतें, करितां तूं आपल्या राणी बरोबर विलास करून सुखानें राज्य चालीव, ह्मणजे मला आनंद होईल.

गोपी०- आई, मला उशीर होत आहे, तरी आज्ञा दे.

मैना०- बाळा, तूं तर सर्व आशा सोडून अरण्यांत जात आहेस.

खरा. परंतु ह्या संसारांत परमार्थ आहे. बाळा राण्यांना आईह्म-
णून ह्मणतोस तरी असें कधीं ही बोलूं नकोस. व तुझ्याशि-
वाय मला दुसरा मुलगा कोण आहे? आणि मी तर अगदीं वया-
तीत झालें. करितां मला सोडून कोठें चाललास?
गो० -संरक्षण करणारा माझा गुरु समर्थ आहे. तूं अज्ञाना
सारखें काय भाषण करितेस हे? व विनाकारण शोक कां करितेस.
मै० -बाळा, तूं माझें न ऐकितां अरण्यांत जात आहेस, परंतु एव
ढें करकीं, आपल्या राण्यांना मिळूं नको, आणि अरण्यांत जाऊन
आपलें शरीर शुद्ध करून मला लवकर येऊन भेट.
गो०- ठीक आहे (असें ह्मणून वंदन करितो.)
मैना०- बाळा कल्याण (असें ह्मणून गोपीचंद तेथून निघून आ-
पल्या राणीन्चे मंदिराजवळ येऊन " अहलख " असा शब्द क-
रितो) (सखीनें तो शब्द ऐकून)
परि०- राणी साहेब, आपल्या आंगण्यांत एक जोगी आला आ
हे. त्याची मुद्रा राज्याच्या मुद्रे सारखी दिसत आहे. तेव्हां मला-
असें वाटतें कीं, राजा हा वेष घेऊन आला आहे.
गज० -अहो मनमोहना बाई, रतनमंजरी बाई, राजाला १२०० राणी.
आणि १६०० दासी असतां, तसेंच तो गौड बंगालचा राजा असतां
राज्य सोडून हा वेष धारण करील काय?
मन ०- कदाचित् राजानें जरी जोग घेतला, तरी तो आमच्याकडे
येणार नाहीं. असें असतां हा आलख पुकारीत आहे तर हा कोण
असावा जा पाहून तरया.
रतन०- राणी साहेब, राजा कधींही जोग घेणार नाहीं. परंतु स-
खी सांगत आहे तरी सर्व जणी जाऊन पाहून येऊं (असें ह्मणून-
जाऊन पहातात तों गोपीचंद राजा जोग घेऊन आला आहे. ते पा-

हून सर्व त्याच्या पायां पडतात· )

गोपी०-आयांनों, तुमचें कल्याण होवो·

राज०-महाराज तुह्मी राजे आणि आह्मीं सर्व राण्या आपणापासून आह्मांस सर्वांस भोग मिळतो, असें असून आयांनो आयांनों असें काय बोलतां आहां?

गोपी०-आयांनों तुह्मी राजाच्या बायका जोग्याच्या तर बायका नाहींना? ज्या वेळेस मीं राजा होतों त्या वेळेस तुह्मीं माझ्या बायका-आतां मीं जोगी झालों आहें, आतां सर्व स्त्रिया माझ्या आईच-आहेत·

मन०-सखे, राजाचें चित्त उदास आहे, या करितां तो असें बोलत आहे-

सखी०-राजेसाहेब, तुमचें चित्त उदास दिसतें याचें कारण काय?

गो०-आयांनों, तुह्मांला वाटतें कीं माझें चित्त उद्विग्न दिसत आहे-परंतु माझें चित्त उद्विग्न नाहीं हा माझ्यावर गुरुचा चप्रसाद आहे ह्मणून हा वेष धारण करून वनांतरीं हिंडत आहे, कोणाचें राज्य आणि कोणाच्या बायका, तुमचें आमचें नातें उठून गेलें आतां तुह्मीं माझ्या आई झा लांत, भिक्षा घाळणें असेल तर घाला·

राणी०-महाराज, आपण आतां कसल्या बिछान्यावर निजाल, अथवा जमीनीवर काय आंथराल?

गोपी०-पृथ्वी हाच आमचा बिछाना, व पृथ्वीवर जें गवत उगवतें तें आमचें आंथरूण, आणि आमच्यावर आच्छादन ह्मटलें ह्मणजे आकाश·

राणी०-महाराज, तुमचे जवळ कोण निजेल, व कोणाजवळ आनंदाच्या गोष्टी बोलाल?

गोपी०-मजजवळ काठी निजेल, आणि ही माझ्या जवळ जी किंगरी आहे, तिजजवळ आनंदाच्या गोष्टी बोलेन·

रत०-महाराज,आमच्या पासून जरकांहीं अपराध झाला असेल, तर क्षमाकरावी-व मीं आपल्यापायां पडून सांगतें कीं, आपण माहालांत येऊन यांनासंग भोग द्यावा.

गोपी०-तुमच्याहातून कांहीं अपराध घडलानाहीं, व तुह्मी ह्मणतां-ही गोष्ट माझ्या हातून होणार नाहीं, आतां मीं अरण्यांत गमनकरितों, भिक्षा घालणें असेलतर घाला.

मन०-महाराज,असें नकरितां एकवेळ तरी माहालांत चलावें.

गोपी०-आतां कोणाच्याही महालांत जाण्याला गुरूची मला आज्ञा-नाहीं,या करितां भिक्षा घाल.

मन०-रतनमंजरी, गजगामिनीबाई, राजाशिवाय मला एक क्षण-भर देखील चैनपडत नाहीं,तरी कसें ही करून त्यानां घेऊनये.

रत०-तुह्मीबसा मीं त्यानां होईल तितका मयत्न करून घेऊनयेतें.

मन०-(ऐकत नाहीं असें पाहून.) महाराज,एकवार तरी महालांत चलावें.

गो० रा०-मातानों, असलाभोगजोग्यांना उपयोगनाहीं हा जोग्याचासत्य नाशकरील याकरितां तुह्माला सांगतों कीं, भिक्षा घालणेंअसेल तरघाला.

मन०-महाराज,हाजोग फारकठीण आहे. त्या पासून पुष्कळ लोक फसून गेले आहेत. तसेंच आपणराजे, सुकुमार असून, आपल्याला अशा अरण्यांतून फिरण्याची संवयनाहीं. असें असतां तुह्मालाजर दुःखझालें, तर कोण विचारणार? ह्मणून सांगतें कीं, हावेषसोडन नगरांत चलावें नाहींतर स्त्रीचरित्र मोठें विलक्षणआहे.

गो०-मातोनों, तुह्मींजरी कितीही सांगितलें तरीमाझे हातून अशी गोष्ट होणार नाहीं करितां भिक्षा घाला नाहींतर हा चाललों.

मन०-अगरत्नमंजरी, कोणत्या मेल्या वैराग्यानें ह्यांना जोगी बनवि-

लें असेल कोणजाणें.

गोपी०-मातागुरूला शिवी देऊंनको. देशील तर भिक्षादे, नाहीं-तर आपल्या मठींत जातों.

रतन०-राजाजी, ही घ्याभिक्षा परंतु रागाऊंनका.

गोपी०-ठीक मीं जातों. (असें म्हणून गोपीचंद गेल्यावर सर्व राण्या शोक करूं लागतात.)

( पडदा पडतो. )

## अंक ६ वा समाप्त.

---

## अंक ७ वा.

पात्रें:-चंपावती, सखी, गोपीचंद, जालंदर.



चंपावतीः- पद-(चाल- वाट बघत द्वारीं)

वांधवांच्यानगरींचिही हकिगतकायअसे॥ वहीनि-चीहीकायगतीनचमजलासमजतसे॥ धृ०॥ मातेला-सुखवुनियांराज्यचालवीतअसे॥ शुक्लपक्षिंजेंविशाशि-तेवींकीर्तिवाढतसे॥ ऐकण्याचीइच्छामनीं॥ मज ला-

हीवाटतसे॥१॥ ॥

सखी०-गडे, आई साहेबानीं जालंदरनाथनायांच्यागुरूपासून उ पदेश घेतला हें तुलाठाऊकच आहे.

चंपा०-अगतें मला ठाऊकच आहे. परंतु पुढें काय झालें?

सखी०-नंतर ही गोष्ट राणी कडुन महाराजांचे कानावर गेली. मग महाराजानीं त्यांला खाडा खणून त्यांत टाकिलें, पुढें त्याचा शिष्य जो कानीफ, त्याला ही बातमी समजतांच ती येऊन त्यानें आईपाशीं रागानें विचारिलें

चंपा०-सखे, बायकांच्याबुद्धीनें आऊनें केवढें तरी हें भयंकर कृत्य केलें? बरें पुढें मग?

सखी०-कानीफानें आईला विचारतांच ती धांवत महाराजां कडे गेली.

( आईला येतानां पाहून भाऊनें काय केलें. )

सखी:- पद. ( चाल- आर्ये वस्त्राभरणें )

उठुनी यां सिंहासनीं ॥ पाय मातेचे धरुनी ॥ धृ० ॥ मायटाकीं झिडकारूनी ॥ मग वदल्यामंजुळवाणी ॥ कूपीं गुरूला- कांटाकीलें ॥ कारणत्यालाविचारीलें ॥ त्यानीं कथिलें कीं मातेला ॥ मम हस्तें अपराध झाला ॥ १ ॥ उठुनी ॥ ० ॥

चंपा०-येथें माणसांनीं तरी काय करावें बाई, नंतर पुढें काय झालें?

सखी०-अग आईच ती मग काय विचारावें. लगेच त्यांना कानीफांच्या पायांवर नेऊन घातलें. व त्यांचें रक्षण करण्या विषयीं विनंती केली.

चंपा०-बरें हें तरी आईनें चांगलेंच केलें, पुढें काय झालें?

स०- कानीफानें सांगितलें कीं, माझा निरूपाय आहे. जर मछिंद्रनाथ येतील, तर त्यांच्या कृपेनें त्यांचें रक्षण होईल असें बोलून त्याची वाट पाहात झोंपडींत बसले. )

चंपा०-सखे काय सांगूं, त्या तुझ्या भाषणानें माझा जीव चिंतारूप अ-

मी हा माझ्या आशारूपी वृक्षास जाऊन पुनः त्याला अंकूर फुटले. बरें पुढें मच्छिंद्रनाथानीं येऊन काय केलें.

स०-पहिल्यानें तर राजाला गर्भगलीत करून सोडिलें, पुढें आईनें विनंती केल्यावरून.

पद-( चाल-मजबहुताचिही. )

तिन पुतळे हे धातूचे बनवोनी ॥ आणिले त्वरित जावोनी ॥ ध्रु० ॥ त्या पुतळ्यांच्या मा धारीनें उनी ॥ साधूनें क्षमा करोनी ॥ चाल ॥ त्याला सांगितलें जावोनी ॥ वचनें त्यानें हे ऐकोनी ॥ आदेश करुनियां गेले भस्म होवोनी ॥ दिलगीर मनीं राहोनी ॥ १ ॥ ॥

चंपा०- अहाहा, सखे, किती तरी आनंददायक वर्तमान सांगितलें हें !

स०- बाईसाहेब, गुरुकृपेनें माहाराजांचे प्राण वांचले, इतकेंच नव्हे तर ते अमर होऊन राहिले.

चंपा०-खरेंच आहे-तर अशा साधूचें दर्शन तरी घेतलेंच पाहिजे.

( पडद्यांत आहलुख, अहलुख असा शब्द होतो. )

चंपा०-अगबाई हा माझ्या भावाच्या शब्दासारखा शब्द कोठून ऐकूं येत आहे बरें ?

सखी-कोणीच जोग्याचा वेष घेऊन येत आहेत असें वाटतें तर चला आपण सामोरे जाऊं ?

चंपा०- छे वेडे, तो जोग्याचा वेष घेऊन इकडे कधीं ही यावयाचा नाहीं. त्याच्या मनांत यावयाचें असेल तर राजाच्या वेषानें येईल.

( इतक्यांत गोपीचंद अहलुख करीत येतो. )

गोपी०-अहलुख.

चंपा०-( आपणाजवळ ) अगबाई हा तर माझा भाऊच आहे, पण.

याला अगोदर ओळखून देतां ( उघड) योगीराज,

## अंजनीगीत.

कवणकुळी त्वां जन्मुनीयां ॥ नामग्रामतें सांगूनीयां ॥
असा वेष हा धरूनीयां ॥ येणें कां झालें ॥ १ ॥ ॥

गोपी०- बाई मीं सुंदरपुरचा रहिवासी तुझा बंधू गोपीचंद राजा तो मींच मला तूं अजून ओळखिलें नाहींस.

चंपा०- भाऊ मीं तुला मगांच ओळखिलें, परंतु हा वेष घेशील असें मला वाटलें नव्हतें.

गोपी०- बाई, जें जें प्रारब्धीं असेल. तें तें चुकावयाचें नाहीं, गुरूच्या कृपेनें अमर होऊन राहिलों आहें, मला आतां राज्य नको कांहीं नको.

चंपा०- भाऊ, आपल्या बायकांटाकून दिल्यास त्यानीं कोणता अपराध केला होता बरें ?

गोपी०- असें जर ह्मटलें तर माझ्या दुःखाला कारणीभूत त्याच आहेत. विनाकारण कांहीं तरी कळ उठवून द्यावयाची, आणि आपण स्वस्थ बसावयाचें, तेव्हां आतां त्यानां सोडून सुखी होऊन गुरूचे पायांची सेवा करीत असतों.

चंपा०- तें मीं सर्व ऐकिलें आहे. परंतु माझी एक विनंती आहे कीं, भाऊ तूं मला सोडून जाऊं नकोस ! माझ्या वाड्यांत सुखानें राहून आपला योग साध. जी जी वस्तू तुला पाहिजे असेल, ती मीं तुला मिळवून देईन.

गो०- तूं ह्मणतेस तें सर्व खरें आहे, परंतु एकाच गांवांत वस्ती करण्याची गुरूची मला आज्ञा नाहीं.

## साकी.

तवभाषण हें सोडुन देउनी अन्याचि कां थिं तूं मजला ॥ उशीर होतो मम कार्माला भिक्षा दे तूं मजला ॥ जातों येथू.

नी॥ कष्टितहोऊंनकोभगिनी॥१॥ ॥

चंपा०- भाऊ,कांहींतरी सांगून माझी समजूत करितोस,पण मीं ऐकणारनाहीं.जरमाझें हें ह्मणणें ऐकिलें नाहींस तरमीं प्राण ठेवणार नाहीं.

गो०-चंपावती, तुझें ह्मणणें सर्वखरें आहे,परंतु मला राहातां येतनाहीं करितां भिक्षा घालीत असलीसतरघाल,नाहींतर हा पहा जातों. अहलुख, (असें ह्मणून चालूं लागतो. )

चंपा०- मूर्च्छित होते.

( सख्या घाबरून सावध करूं लागतात. )

( तोंजालंदरयेऊन चंपावतीस उठती करितो. )

चंपा०- सावधहोऊनउठते.

गोपी०- साधूजी आदेश. महाराजआपणइकडे कसे आलां?

जालं०-गोपीचंदामीं ध्यानकरीत असतां तुझ्या बहिणीचें शोकास्पद भाषणमाझ्या कानावरआलेंतेव्हां तसाच मीं इकडे आलों.

गोपी०-महाराज, माझ्यावरनचंपावतीवर आपण मेहेरबानीच केली, ह्मणावयाची.

जालं०-अच्छा, राजा, तुझी काय इच्छा आहे ती सांग.

गोपी०-महाराज, माझी दुसरी कांहीं इच्छा नाहीं, परंतु एवढीआशा राहिली आहे कीं, निरंतर आपल्याचरणाची सेवा करून आपणाजवळ राहावें.

जालं०-राजा, तूं ह्मणतोस,तेंखरें. परंतु आजपर्यंत सुखानें रात्रंदिवस राज्यांत दिवसघालविले, आणि आतां असे कष्ट करावे लागतात. करितां माझी तुला आज्ञा पाळावयाची असेल तर तूं राज्यांत जाऊन सुखानें राज्यकरून प्रजेचें रक्षणकर व सुखानें आपले राणीशीं क्रीडाकर.

पली आज्ञा शिरसावंद्य आ परंतु मी राणी-
रे नाहीं असें असून त्यांच्या बरोबर विलास के-
आणि या नाशिवंत संसारामध्यें पडलों असतां मा-
याच्या सत्यनाश होईल. याकारणानें मीं राजभोग क-
ार नाहीं.
ोप्चंदा, माझा हुकूम ऐकतोस किंवा नाहीं?
पला हुकूम मला मानलाच पाहिजे.
क आहे, तर जा, आणि सुखानें राज्य चालीव व सुखानें
ोबर कालक्रमणा कर. अशा रीतीनें हजार वर्षें राज्य क-
अखेरीस तुला निरंजनपद मिळेल. असा माझा तुला प्र-
शिर्वाद आहे.
क आहे, चरणीं प्रणिपात करितों.
राजा, कल्याण.
असें ह्मणून आपल्या नगरांत जातो. व जालंदरनाथ ही
जातात. )

( सर्व राण्या आपल्या मंदिरांत बसल्या आहेत. )

गा०- अग मनमोहना, बारा वर्षें झालीं अजून राजाची स्वा
कशी आली नाहीं बरें?

घा०- गजगामिनी, मीं सांगत्यें कीं, साधू महाराज जें बोलले
कधिंही खोटें व्हावयाचें नाहीं.

नमो०- अग, राजाची स्वारी आली असें ऐकितों.

( इतक्यांत प्रतिहार पुकारतो. )

०- राजाधिराज गोपीचंद राज्यें महाराज.

( राजा बाहेर येऊन सिंहासनावर बसतो व सर्व राण्या छत्र धरितात. )

अंक ७ वा समाप्त.

## विक्रीस तयार.

1. भजनमालिका अथवा भजनाच्या ७ बैठकी
2. भजनी भारुड संग्रह.
3. एकनाथी भारुड संग्रह.
4. भजनी मेळा भाग १ ला. व २ रा. दर भागास.
5. हरिश्चंद्र नाटक.
6. वत्सलाहरण नाटक.
7. अफजूलखानाचा फार्स.
8. कटाव संग्रह (यांत १० कटाव आहेत.)
9. पाकशास्त्र.
10. बहुरूपी सोंग.
11. संगीत श्रावणाख्यान व दशरथ कचेरी नाटक.
12. संगीत मच्छिंद्राख्यान व पद्मिणकचेरी नाटक.
13. इंद्रजाल (मंत्र तंत्र यंत्र संग्रह.)
14. गुप्त इंद्रजाल.
15. भूतविद्या र भूतांची बाधा घालविणारे मंत्र, तंत्र, यंत्र.
16. वेताळ माहात्म्य व मंत्र, तंत्र, यंत्र.

वरील व इतर सर्व प्रकारची पुस्तकें खालील पत्यावर आमचे दुकानीं विकत मिळतात.

बाळकृष्ण लक्षुमण पाठक.

पत्ता- विठ्ठलवाडीचा नाका मुंबई.

...ग्रंथ संग्रहालय

# ...पक्षाची पूर्ण १६ आणे फजीती !

अथवा

# रुढी दिग्विजय.

हा लहानसा ग्रंथ

**रामकृष्णभट्ट स्पष्टवक्ते**

यांनीं तयार करून

**सर्व आर्यधर्माभिमानी सुज्ञजनांस**

आदर व प्रेमपूर्वक अर्पण केला असे.

"श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ।
स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ॥"

श्रीमद्भगवद्गीता ॥ ३।३५ ॥

मुंबई,

सुबोधप्रकाश छा० छा०

सन १८८५.

किंमत टपाल व बंगीखर्चासुद्धां ।=

# उपोद्घात.

आमच्या ह्या पुण्य देशांत म्लेच्छांचें राज्य झाल्या पासून आमचा आर्य धर्म आम्हांस हळू हळू सोडीत चालला आहे! अथवा आम्हीच त्या-ला आपल्या देशांतून हांकून लावीत आहों असें ह्मटलें तरी चालेल. कांहीं धर्म शेष आहे तो केवळ अस्मादिकांत ह्मणजे **भिक्षुक** व **वैदिक** लोकांत. इंग्रजी शाळांत तयार होत असलेले लोक बहुधा माति भ्रष्ट असून नाना प्रकारचीं ल्चांडें काढतात. मनासवाटतील तशा सभा स्थापन करितात; कोठें "**स्त्रीशिक्षण** सभा" कोठें "**वक्तृत्वोत्तेजक सभा**" कोठें "**प्रार्थनासमाज**" कोठें "**आर्य समाज**" कोठें "**बाल विवाह निषेधक मंडळी**" कोठें "**स्वदेशी मालांचें दुकान**", असे एक का दोन सांगावे. या सर्वांवर कमाल "**पुनर्विवाहोत्तेजक मंडळी**" नें केली! कांहीं वर्षांपूर्वी **बंगाल्यांत** एक भ्रष्ट **ईश्वरचंद्र विद्यासागर** झाला, आणि मुंबईकडे "**विधवाविवाहाचार्य विष्णु परशराम शास्त्री**" झाले. या दोघांनीं तर जणुकाय आमचा धर्म बुडिवण्यासाठींच देह धारण केले होते. बरें एक **मुंबई बंगालचे** असो. परंतु हें अधर्म वारें आमच्या पुण्यग्रामापर्यंत येऊन पोंचलें. तेंव्हा अर्थातच आमच्या धार्मिक बंधुवर्गाचें पित्त खवळून आम्हांस त्याचा प्रातिबंध करणें भाग पडलें. मी स्वतः गावीं नसल्यामुळें मला ह्या धर्म रक्षणाच्या कार्यांत सहाय्य करून पुण्यांश पदरीं घेण्याची सवड मिळाली नाहीं, तथापि माझ्या इष्टमित्रांनीं व आप्त जनानीं जी ह्या प्रकरणीं खटपट करून पुनर्विवाहपक्षाची फजीती उडिवली ती साद्यंत ग्रंथ रूपानें प्रसिद्ध करण्याचें यश मला प्राप्त झालें आहे, तेणें कडून मी आपणास मोठा धन्य समजतों. जरी "**धर्मस्यतत्वं निहितं गुहायां**" असें भगवद्वचन आहें तरी हा ग्रंथ समग्र अवलोकन करणारास धर्माचें खरें तत्व तेंव्हांच कळेल, ह्यांत अगदीं संदेह नाहीं. पुनर्विवाह पक्ष

लोक कदाचित् मजवर रागावतील, व त्यामुळें पुष्कळ ठिकाणचें माझें उपाधपण वगैरे बुडेल; परंतु मला त्याची मुळींच परवा नाहीं. मी स्वधर्माला जागून आणि आपल्या परम स्नेही, **जोशीबुवा, घनपाठी-बुवा** आणि परम पूज्य **वैद्यराज,** यांच्या आग्रहा वरून त्यांचा संतोष राखण्याच्या हेतूनें, हा ग्रंथ लिहून सर्व आर्य धर्माभिमानी लोकांच्या सेवेसि अर्पण करीत आहें. मर्मज्ञ व कुशाग्र बुद्धीचे लोक मात्र ह्या ग्रंथाचें इंगीत जाणण्यास समर्थ आहेत. मतिमंदांस तर ह्या पासून उलटा रागयेण्याचा संभव आहे. येवो बापडा! मीं तर आपलें कर्त्तव्य बजावील आहें. हा ग्रंथ लिहीत असतां माझ्या व्यवसायांत व्यत्यय येऊन जे माझें स्वतः चें नुकसान झालें आहें तें तर भरून येण्याची मला आशा नाहींच परंतु हा ग्रंथ छापून प्रसिद्ध करण्यांत जो माझ्या गरीब स्नेह्यानां खर्च पडला आहे तो वसूल व्हावा एतदर्थ सर्व धार्मिक ग्रहस्थाभिक्षुक ह्या ग्रंथास आपला उदार आश्रय देतील अशी दृढ आशा आहें. ह्याग्रंथांच्या नांवावरून पुनर्विवाहपक्षाकडील लोक बिचकतील परंतु ते हा विकत घेऊन आणि धीरधरून एक वार जरी वाचतील तर आपला वेळ व आपले पैसे फुकट गेले असें त्यांस खचित वाटणार नाहीं अशी माझी प्रतिज्ञा आहे. आतां ग्रंथ रचनेच्या संबंधानें चार शब्द लिहून हें उपोद्घाताचें चऱ्हाट आटपतों. मीकोणत्याही सरकारी शाळेंत शिकलेला नाहीं. गांवटी शाळेंत पंतोजीस फसकी देऊन धुळाक्षर आणि **दामाजीपंताची** बखर वाचायाला मात्र शिकलों आहें. व लाहान पणी **बाबानीं** शिक्षा,जोतिष,छंद, निघंट, संध्या पवमान शिकविलें होतें तेंहीं आतां विसरलों. रात्रंदिवस "**दाताकी-जय**" ह्मणून ओरडण्यांत तोंड आणि "दक्षणाः पांतु बहुधेयचास्तु" कडे हात गुंतलें असल्या मुळें मला बोलण्याचा किंवा लिहिण्याचा प्रसंग बहुशः कधीं पडत नाहीं. ग्रंथ लिहिण्याचा हा पाहिलाच प्रसंग तेव्हां ह्यांत पुष्कळ चुका झाल्या असतील, त्या सर्व **श्रीशंकरार्पणमस्तु!**

**रामकृष्णभट्ट स्पष्टवक्ते**
ग्रंथकर्ता.

**बलबलपूर**
फाल्गुन शुद्ध १९ मंदवार
शके १८०६, तारण नाम संवत्सरे, संवत् १९४०.

आह्मी हा ग्रंथ तयार करून **श्रीमत्परमहंस परिव्राजिकाचार्य श्री शंकराचार्य** मठ **श्रीशंखेश्वर** यांस अवलोकनार्थ पाठिवला होता. स्वामिनी परम कृपावंत होऊन ग्रंथपसंत करून त्या बद्दल आह्मांस व आमच्या मित्र मंडळीस जें मानपत्र दिलें आहे तें आह्मी आपल्या धार्मिक वाचकांच्या माहिती करितां खालीं साद्यंत छापून प्रसिद्ध करीत आहों.

वेदमूर्ति शट्शास्त्र संपन्न रा. रा. परमधार्मिक **रामकृष्णभट्ट स्पष्टवक्ते** यांसः—

**श्रीमत्परमहंस परिव्राजिकाचार्य श्रीरुढ्यानुगामी श्रीशंखेश्वराचाय** स्वामीकृत नारायण स्मरणानि तुह्मी श्रीक्षेत्र **बलबलपूर** येथें झालेल्या पुनर्विवाहाची इत्थंभूत हकीकत लिहून **श्रीस** सादर समर्पण केली ती वाचून **श्रीस** परम संतोष झाला. तुमच्या क्षेत्रांत राहणाऱ्या सज्जनां पैकीं वेदशास्त्र संपन्न **गजानन शास्त्री, वासुदेवभट जोशी, सदाशिव भट वैद्य, रामभट घनपाठी, नृसिंह पुराणिक विक्षिप्त** आदिकरून भिक्षुक मंडळी, व **श्रीमंत दादा साहेब** व **विश्वनाथ राव पेंदारे** प्रभृति ग्रहस्थ मंडळी, स्वधर्म रक्षणा विषयीं इतका परिश्रम करिते हें जाणून **श्रीस** परमाल्हाद होत आहे. आपला सनातन धर्म सोडून जे अन्य धर्माचें अवलंबन करितात त्यांचा तिरस्कार करणें व स्त्री पुनर्विवाहा सारिख्या निंद्य कर्माचा प्रचार न होऊं देणें हें अति अवश्य आहे; तुमचे ग्रामस्थ धार्मिक जन पुनर्विवाह पक्षाची फजीती करण्यास उद्युक्त झाले आहेत हें फार योग्य होय. तुमच्या मित्र मंडळींनीं पुनर्विवाह पक्षाचा मोड करण्यांत जे श्रम केले आहेत त्यां करितां त्यांस हें मानपत्र देण्यांत येतें कीं संस्थानीं अगर **श्रीची** स्वारी संचारास वगैरे गेली असेल तेथें श्री**शंकराचे** आणि **आदिमाता रूढीचे** पूजनसमयीं ते अगर त्यांचे वंशज सन्निध असल्यास त्यांजला तीर्थ प्रसाद देऊन नंतर दुसऱ्यास दिला जाईल व **श्रीच्या** पट्ट शिष्यांत त्यांची गणना केली जाईल. तुमचा ग्रंथ जगमान्य होईल असा **श्रीचा** पूर्ण प्रसाद आहे. इत्यलम्.

मठ **श्रीशंखेश्वर.**
मिती जेष्ट वद्य १२.

**श्री** तर्फे **कुटिलस्वामी**
उपमठाधीश.

# पुनर्विवाह पक्षाची पूर्ण १६ आणे फजीती.

## प्रवेश १ ला.

**स्थळ—बलवलपुरांत दादासाहेबांचा** वाडा.

**दादा**साहेब भोजनोत्तर वामकुक्षी करून, पवमानाची पोथी सोडून **गोपाळ भटजी**पासून, दुसऱ्या अध्यायाची संथा घेत बसले आहेत, आणि "यदीगोभिर्व सोयते" ह्या ऋचेचा पाठ चालला आहे, इतक्यांत **नाना मेंधळे** येऊन वर्दी देतात "सरकार! **जोशी** बुवा, **वैद्य** बुवा वगैरे मंडळी आली आहे. कांहीं विशेष काम आहे असें ह्मणतात."

**दा०सा०**—बरें आहे, इकडेसच बोलवा त्यांना.

(**नाना** बाहेर जाऊन, **वासुदेवभट जोशी, सदाशिवभट वैद्य, रामभट घनपाठी** आणि **विश्वनाथराव पेंढारे**, या चौघांस बरोबर घेऊन आंत परत येतात. सर्व **दादासाहेबां**स नमस्कार करून बसतात.)

**दा०सा०**—कां आज उन्हांत तात्पुरचें मंडळीचें येणें कोणी कडेस झालें?

**स०वै०**—सरकारासच तकलीफ देण्यास आलों आहोंत.

**दा०सा०**—काय काम आहे?

(सर्व एकमेकांच्या तोंडाकडे पाहतात.)

**स०वै०**—कां **जोशीबुवा**? आतां मौन सोडा अणि सर्व हकीकत सरकारच्या कानावर घाला.

**वा०जो०**—(**दादासाहेबांकडे** वळून) **मोरोपंत बेखंडे** विधवेबरोबर आपला द्वितीय विवाह करणार आहेत, हें सरकारला कळलेंच असेल?

**दा०सा०**—अशी बातमी आहे खरी

**नाना०**—बातमी काय, खरेंच आहे. तिथि निश्चय देखील झाला. आजपासून चौथ्या दिवशीं ह्मणजे सोमवारीं आठ वाजतां सकाळचा मुहूर्त ठरला आहे.

**वि०पें०**—लग्न काय हा मोठा अनर्थच होत आहे. असें दुष्ट कर्म आपल्या देशांत कोठेंचकधीं झालें नाहीं.

**दा०सा०**—**मुंबई पुण्या**कडे ही चाल निघाली आहे असें ऐकतों.

**रा०घ०**—तिकडचे लोक सारे भ्रष्ट आहेत. आपल्या देशांत ती भ्रष्ठ चाल कशास हवी ? आपल्या गांवांत अधर्म होऊं देऊं नये ह्मणजे झालें !

**दा०सा०**—मग काय उपाय करायचा ?

**वा०जो०**—उपाय सहज आहे, सरकारची मदत असली ह्मणजे अह्मी लोक उपाय करूं.

**दा०सा०**—मदतीस कांहीं आपल्या जवळ फौज फांटा नांही. राज्य पडलें ह्या प्रकारचें. कचेरी दरबारास भिऊन चाललें पाहिजे.

**स०वै०**—त्या विषयीं कांहीं भीती नाहीं. हा जातीचा मामला आहे. ह्यांत कचेरी दरबार काय करणार आहे?

**ना०मे०**—कचेरी दरबार काय करणार आहे, कां नाहीं करणार ? गतवर्षींच **मद्रासेस शंकराचार्यां**स २०० रुपये दंड झाला. ह्याच पुनर्विवाह प्रकरणांत !

**वि०पें०**—**मद्रास**चें प्रकरण निराळें आणि हें निराळें.

**दा०सा०**—बरें तर तुह्मी उपाय तरी काय करणार ? तुमच्यानें **वेखंडर्या**च्या, पुनर्विवाहतर बंद करवत नाहींनां ?

**रा०घ०**—उद्यां सर्व ग्रामस्थांची सभा भरऊन ठराव करावा कीं "जो कोणीं लग्नास जाईल किंवा **वेखंडर्यां**शीं संसर्ग करील तो जाती बाहेर;" ह्या भीतिमुळें कदाचित् लग्न राहील तर राहील, नच राहिलें तर, **वेखंडर्यांस** आणि त्यांशीं संसर्ग करणारांस बहिष्कृत करावें ह्मणजे झालें.

**दा॰सा॰**—बरें आहे! जसा मंडळीचा विचार होईल, त्या बाहेर आह्मीं नाहीं. परंतु ह्यांत पुष्कळ लोकांशीं वांकडें व्हावें लागेल. पुनर्विवाह पक्षांत सर्व मोठे मोठे सरकारी कामगार लोक आहेत. कांहीं करणें झाल्यास मोठ्या युक्तीनें केलें पाहिजे.

**वा॰जो॰**—सरकारी कामगारांचें भय कशास पाहिजे? सरकारची मदत आह्मांस असली ह्मणजे झालें. सर्व सरकारच्या पाया जवळ नाक घांशीत येतील.

**दा॰सा॰**—( समाधान पाऊन ) बरें आहे तर, उद्यां सभा भरविण्याची तजवीज करावी.

**स॰वै॰**—सभा सरकारांतच भरली पाहिजे, ह्मणजे तिला वजन जास्त येईल.

**दा॰सा॰**—नको नको! इथें नको! कदाचित् बडेसाहेबांस किंवा कमश्नर साहेबांस कळलें तर ह्मणतील कीं हेच लोकांस फितवितात. सध्याच आमच्यावर नाराजी होईल! **जोशीबोवांच्या** वाड्यांत होऊंद्या.

**वि॰पं॰**—(**जोशीबोवांकडेस** वळून) कां जोशीबोवा, कसा काय विचार?

**वा॰जो॰**—सरकारची मर्जी! सभा इथेंच झाल्यानें विशेषशोभा आली असती. सरकारच्या समक्ष कोणी जास्त "ब्र" नसता काढला. आपली झोपडी तयार आहे. सरकारांतून कोणी अवश्य आलें पाहिजे सभेला.

**दा॰सा॰**—आमच्या कडून आहेतच **उपाद्धेबाबा** आणि **नाना**ही येतील. ( **नानास** ) उद्यां तुह्मी जा सभेला. विडे सांगा आणायला.

**ना॰मे॰**—( सुपारीचें ताट पुढें करून ) आज एकादशी आहे.

**दा॰सा॰**—( मंडळीस ) घ्यावी सुपारी. ( सर्व सुपारी घेतात. )

**स॰वै॰**—आतां घेतों आज्ञा. ( सर्व **दादासाहेबांस** नमस्कार करून उठून जातात.)

**दा०सा०**—आतां उशीर झाला, पोथी ठेवा गुंडाळून ( **गोपाळभट** पोथी गुंडाळतात ) त्या **गण्या**ला परसाकडचा तांब्या ठेवायला सांगा ( पोटावरून हात फिरवून ) आज पोटांत कुटकुटतें आहे. कोणजाणें कशानें.

**ना०मे०**—उपोषणा मुळें तसें होत असेल.

**गो०भ०**—आज जरा बाजाराकडे जाण्याचा विचार आहे तसेंच तिकडून **मारोतीं**चें दर्शन घेत येऊं.

**ना०मे०**—मीही येतों अपल्या बरोबर.

**दा०सा०**—बरें आहे. लवकरच परत या, कालचा आणि आजचा "जमाखर्च" पाहायचा आहे.

( सर्व जातात. )

---

## प्रवेश २ रा.

### स्थळ—**वासुदेवभट जोशांचा** वाडा.

संध्याकाळचा फराळ वगैरे आटपून, मंडळी करितां बिछाईत तयार करून आणि दिवे वगैरे लाऊन, **वासुदेवभट जोशी** वाट पहात बसले आहेत इतक्यांत **विश्वनाथराव पेंढारे, सदाशिवभटवैद्य** आणि **रामभट घनपाठी** येतात त्यांस पाहून,—

**वा०जो**—नमस्कार! यांव **वैद्यराज,** या **रामभटजी; विश्वनाथ रावजी!** अहो असे लोडाशीं बसा नीट, वाह! मग हें लोड आणि गादी आहे कोणासाठीं?

**वि०पें०**—छेः हो, अह्माला कशाला हवें लोड. आह्मींतर आपले सर्वांचे दास आहोंत.

**रा०घ०**—आपल्या सारख्या ग्रहस्थांनीं जर लोडाशीं न बसावें तर मग कोणी आमच्या सारख्या भिक्षुकांनीं बसावें? तुह्मीतर आमचे यजमान आहांत.

**वि०पें०**—कशाचे यजमान! ( असें ह्मणून लोडाजवळ सरून बसतात.)

**वा०जो०**—प्रहर रात्र होत आली तरी अजून मंडळी येत नाहीं. बोलावणें बरोबर झालें कीं नाहीं कोणजाणे !

**स०वै०**—बोलावणें **सखाराम** भिक्षेकऱ्यानें तर सर्वांस केलें असेल. फराळ वगैरे करून येतच असेल मंडळी. या दिवसांस सात वाजतां तर सुर्यास्तच होतो.

**रा०घ**—बरें तर मंडळी जमल्यावर करायचें काय तें ठरऊन टाका एकदाचें.

**वा०जो०**—करायचें काय, मंडळीला स्पष्ट सांगायचें कीं विधवेशीं विवाह करणें अति निंद्यकर्म आहे. जर **वेखंडे** पुनर्विवाह करतील तर त्यांस बहिष्कृत करूं आणि लग्नास जाणारे व **वेखंड्यांशीं** संसर्ग करणारे सर्व अपंक्त केले जातील.

**वि०पें०**—परंतु कोणी लोक शास्त्राची तकरार काढतील त्याची वाट काय ? अपल्या पैकीं कोणी जबाब देण्यास तयार असलें पाहिजे.

**रा०घ०**—इतकी पंचाईत करतो कोण ? शास्त्राची तकरार आपण ऐकूं नये ह्मणजे झालें. काम पडल्यास आहेतच उत्तर देण्यास अपले **गजानन शास्त्री** आणि **नरसिंह पुराणिक**.

**वा०जो०**—हो, बरी आठवण झाली—**गजानन शास्त्र्यांस** सूचना गेलीच असेल. नसली गेल्यास मनुष्य पाठिवितों पाहिजे तर.

**वि०पें०**—कशाला पाठिवतां मनुष्य. मी आणि ते बरोबरच घरून निघालों. ते **पुराणिक बोवांस** आणि **नागेश्वर भटजींस** घेऊन येतच असतील. ते पहा आलेच.

( **गजानन शास्त्री घोंटे, नरसिंह पुराणिक विक्षिप्त** आणि **नागेश्वर भट मुळमुळे** येतात. )

**वा०जो०**—या शास्त्री बोवा, नमस्कार ! इतक्यांत तुमचीच अठवण निघाली होती. तुह्माला पूर्ण शंभर वर्षें आयुष्य आहे असें दिसतें.

**ग०शा०**—तुमच्या **फलितांत** काय असेल तें खरें. परंतु आतां जास्त जगून कांहीं उपयोग नाहीं. कारण जिकडे तिकडे अधर्म माजला आहे. होऊं नयेत तीं कर्मे होऊं लागलीं. अशा समयांत जगण्यापेक्षां लौकर "**राम !**" ह्मणावा तो बरा.

वि०पें०—बरें पर काहो शास्त्री बोवा ! ह्या पुनर्विवाहविषयीं कांहीं शास्त्रार्थ काढून आणिला आहे कीं नाहीं. मग आयत्या वेळेस पंचाईत पडेल.

ग०शा०—कांहीं पंचाइत पडणार नाहीं. सर्व पार पाडणार **शंकर** समर्थ आहे. आपल्या सारख्या ग्रहस्थांचें पाठबळ असल्यावर पंचाईत ती कसली ?

वि०पें०—अह्मी काय ग्रहस्थ भाई, आपल्या मागें मागें अह्मी. अह्मांला थोडेंच शास्त्र कळतें !

न०पु०—कांहीं चिंता नाहीं. अह्मी लोक सर्व संभाळून घेऊं.

रा०घ०—आतां असें करा कीं एका कागदावर मसोदा तयार करा. मंडळी जमली ह्मणजे, तो कागद सर्वांस वांचून दाखवावा ह्मणजे जास्त वादविवादास अवकाशच राहणार नाहीं.

वा०जो०—ही युक्ती बरी काढली ( खोलींत जाऊन दौत लेखणी आणि कागद आणितात, आणि **गजानन शास्त्र्या** पुढें ठेवितात ) घ्या, शास्त्री बोवा करा मसोदा तयार.

ग०शा०—**रामभटजीच** करतील मसोदा तयार. त्यांची युक्ती त्यांनांच बरी साधेल.

रा०घ०—आणातर मीच लिहितों—( कागद घेऊन लिहितात. )

वा०जो०—मजकूर असा लिहा किं जेणें करून ऐकणारांचें तोंडच बंद व्हावें आणि कोणीं चकार शब्द काढूं नये.

रा०घ०—अंबळसे स्तब्ध असा. पहा कसा मसोदा तयार करतो तो. ( सर्व उगेच बसतात. **रामभट** मसोदा तयार करून **जोशीबोवा** पुढें टाकितात ) घ्या, वांचून दाखवा सर्वांस पाहूं.

वा०जो०—( कागद हातांत घेऊन वाचण्यास आरंभ करणार तितक्यांत पुनर्विवाह पक्षाकडील, **गदाधरपंत मांडवे, अमृतराव** व **रामचंद्रराव वेखंडे, विनायकपंत आंबेकर, धोंडोपंत दातार** वगैरे मंडळी येते. **जोशीबोवा** हातांतला कागद **विश्वनाथरा-**

**वा** जवळ देतात. आणि "अतां असूंद्या" ह्मणून त्यांस सांगतात. पुनर्विवाह पक्षाकडील मंडळी सर्वांस नमस्कार करून बसते. त्यांचा नमस्कार **जोशीबोवा** वगैरे तेथें असलेली मंडळी कोणी घेत नाहीं. )

**रा०घ०**—आज मंडळीनीं फारच उशीर लावला आहे बोवा, **धर्माधिकारी** सर्वांच्या आधीं येथें यावे तेही अद्याप आले नाहींत.

**स०वै०**—धर्माधिकाऱ्यांनीं आताशीं कोठें दुकान आटोपली असेल. ह्या नंतर फराळ वगैरे होईल, तेव्हां ते येतील कोठें दहा वाजेपर्यंत. ( अशा गोष्टी होत आहेत तों हळू हळू बहुतेक ग्रामस्थ मंडळी येते, त्यांपैकीं प्रमुख लोक येणेंप्रमाणें:—**नारोपंत शेगडे, राघोपंत किडकिडे, अण्णासाहेब गोडबोले, त्र्यंकोबा धामणे, अंतोबा नकले, दिवाकरपंत सोमण, नाना मेंधळे, गोपाळभट भोकरे, बाबा पाध्ये,** आणि **शेषंभट धर्माधिकारी**.)

**वि०पें०**- कां **जोशीबुवा** आतां सभेला करावा आरंभ. मंडळी तर बहुत करून सर्व आलीशी दिसते.

**वा०जो०**—कां **वैद्यराज,** करावा ना आरंभ?

**स०वै०**—**शास्त्रीबोवा** करतील आरंभ.

**ग०शा०**—बरें आहे. **धर्माधिकाऱ्यास** बसवावें अध्यक्ष स्थानीं.

**रा०घ०**—उठा धर्माधिकारी, बसा लोडाशीं!

**शे०ध०**—कशाला बसा लोडाशीं, शिव्या खायला? पत्रिका पूजनाची दक्षणा घ्यायला **जोशीबुवा**; रिकचव्याचा आणि प्रायश्चित द्रव्याचा दुप्पट हिस्सा घ्यायला **घनपाठी**बा; वसंत पुजेंत गंधाचा टिकला अगोदर **उपाध्ये** बुवाच्या कपाळीं, आणि भांडाभांडी शिव्यागाळीच्या प्रसंगीं अध्यक्ष **शेषंभट**! खाशी मसलत. बसवा **जोशीबाला** लोडाशीं.

**ग०शा०**— अहो **शेषंभटजी**! हें पहा! ही धर्म सभा आहे. गांवचे वंशपरंपरेचे **धर्माधिकारी** तुह्मी. तुह्मी प्रत्यक्ष असून दुसरा कसा

बसूं शकेल अध्यक्षस्थानीं ? स्थान पाहिजे तर रिकामें राहील, परंतु शास्त्राची अवज्ञा करून तुमच्या व्यतिरिक्त दुसरा कदापि अध्यक्ष होणार नाहीं; तो मान तुमचाच आहे.

स०वै०–**शेषंभटजी** ! सगळे ह्मणतात तर बसा लोडाशीं चांगलें टेकून. तुमचें काय जातें त्यांत ? मला कोणी ह्मणेल तर मी लोडावर देखील बसेन.

शे०ध०– बरें आहे बोवा. तुह्मी सर्व ह्मणतां तर बसतों लोडाशीं, पण अपल्याला शास्त्रबीस्त्र कांहीं कळत नाहीरे बोवा. नाहीतर मागून ह्मणाल किं सांगितलें नाहीं. ( असें ह्मणून **शेषंभट** लोडाशीं बसतात. )

वि०पें०–(**रामभटजीं**नीं लिहिलेला कागद **जोशीबुवा**च्या हातांत देऊन) करावा **जोशीबुवा** सभेला आरंभ !

वा०जो०–( कागद हातांत घेऊन ) ऐका सर्व सभेचे ग्रहस्थ भिक्षुक मंडळी ! परवां सोमवारी आपल्या गावांत एक मोठा अनर्थ घडणार आहे अशी दाट वदंता आहे. **मोरोपंत वेखंडे**, ह्मातारपणीं विधवेशीं लग्न करणार तेणें करून आपल्या ब्राह्मण जातीस मोठा कलंक लागेल, तो न लागावा ह्मणून आज ही सभा भरिवली आहे. धर्माधिकाऱ्या कडून जी सभेस आज्ञा होत आहे ती मी सर्वांस वाचून दाखिवतों. सर्व सावध पणें ऐका.—

शे०ध०–माझें गरीबाचें नांव काय ह्मणून पुढें करता हो ? मला ठाऊक देखील नाहीं त्या कागदांत काय लिहिलें आहे. आज सभेची नवीच तऱ्हा काढली आहे. सभेंत कागद बिगद वाचतांनां अपण कधीं ऐकलें देखील नाहीं, मग पाहणें तर दूरच.

रा०घ०–( **शेषंभटास** ) तुह्मी अंबळसे उगेच बसाना. तुमचें नांव पुढें केलें ह्मणून काय झालें ? तुह्माला कोणी मारतो किं काय ? ( **जोशीबास** ) चालूंद्या पुढें.

वा०जो०–( कागद वाचतात ) "**बलबल पुरस्थ** व इतर ग्रामस्थ सर्व ग्रहस्थ व भिक्षुक यांस **शेषंभट** धर्माधिकारी यांचे वेदोक्त

अनेक आशिर्वाद! येथें राहणारे **मोरोपंत वेखंडे** विधवेशीं लग्न करणार आहेत. ही गोष्ट अगदीं धर्म विरुद्ध व अशास्त्र असून फारच निंद्य कर्म होय. त्यास **वेखंडयांशीं** कोणी अन्नोदक व्यवहार करूं नये. करील तो भ्रष्ठ व अपंक्त समजला जाईल व त्यास प्रायश्चित्तही होणार नाहीं."

**धों०दा**–( उभेराहून ) मंडळीस एक विनंती आहे, आज्ञा असल्यास निवेदन करितों.

**वा०जो**०–काय बोलणें असेल तें बसून बोला. ही काय इंग्रेजी सभा आहे किं उभे राहिले अणि लागले बडबड करायला. मारा मारी करायची आहे मनांत वाटतें ?

**धों०दा**०–( खालीं बसून ) मारा मारी करणें नाहीं. फक्त इतकेंच विचारणें आहे कीं विधवेशीं विवाह करणें "अगदीं धर्म विरुद्ध व अशास्त्र" आहे, असें धर्माधिकारी ह्मणतात, त्यास आधार काय व रांड ठेवणें धर्म विरुद्ध अशास्त्र व निंद्य कर्म आहे किंवा नाहीं ?

( सर्व स्तब्ध बसतात. )

**ग०मां**०–कां **जोशीबा**, प्रश्नाचें उत्तर कां देत नाहीं, अतां ?

**वा०जो**०–भ्रष्ट लोकांच्या प्रश्नाचें उत्तर काय द्यायचें आहे ? ( **वैद्यबास** ) कां **वैद्यराज** ह्या कागदावर सर्वांच्या सह्या करऊन घेतल्या पाहिजेत.

**स०वै**०–बरें तर आहे, करऊन घ्या सर्वांच्या सह्या. **शेषंभटजी** पासूनच करा आरंभ.

**वि०आं**०–एव्हांच सह्यांची घाई कां करतां **धोंडोपंता**च्या प्रश्नाचें उत्तर तर द्याल किं नाहीं अगोदर?

**रा०घ**०–काय उत्तर द्यायचें. आमची आज्ञा बस्स आहे. तुह्मांला नसेल मान्य तर नका मानूं, उठून जा.

**अं०न**०–असें काय बोलता हो दांडग्यासारखें "उठून जा" ह्मणजे,

बोलावलें कशाला मंडळीला "उठून जा" ह्मणण्यासाठीं ? रीतीचा प्रश्न विचारतात, त्याचें उत्तर देत कां नाहीं ?

ग०शा०—मी देतों उत्तर. विधवेशीं विवाह करणें अधर्म होय. ह्याला पुष्कळ ग्रंथांचा आधार आहे. करण्याविषयीं काय आधार आहे दाखवा?

धों०दा०—(मनुस्मृति आणि पराशरस्मृति पुढें ठेऊन) हीं पहा वचनें.

## मनु.

साचेदक्षत योनिः स्याद्गतप्रत्यागतापि वा ।
पौनर्भवेन भर्त्रासा पुनः संस्कार मर्हति ॥

## पराशर माधवीये मनु.

नष्टेमृते प्रव्राजिते क्लीबेच पतिते तथा ।
पंचस्वापत्सु नारीणां पतिरन्यो विधीयते ॥

## पराशर स्मृति.

नष्टेमृते प्रव्रजिते क्लीबेच पतित्ते पतौ ।
पंचस्वापत्सु नारीणां पतिरन्यो विधीयते ॥

आणखीं पुष्कळ आधार आहेत, परंतु सध्या इतके पुरे आहेत.

ग०शा०—कलियुगांत मनुस्मृतिचा आधार दाखवून काय उपयोग ? ती स्मृति सत्य युगाविषयीं आहे. कलियुगाविषयीं नारायण स्मृति मुख्यत्वें करून प्रमाण भूत आहे.

कृतेतु मानवा धर्मा स्त्रेतायां गौतमाः स्मृतः ।
द्वापरे शंख लिखिताः कलौ नारायणः स्मृतः ॥

नारायणस्मृतींत पराशराविषयीं असा लेख आहे कीं.

पाराशर महा मूढो नास्तिको वेदानिंदकः ।
धर्म संहरणार्थाय बभूव धरणीतले ॥

याचा अर्थ असा कीं पराशर महा मूर्ख होता तो नास्तिक आणि वेदाची निंदा करणारा असे; तो ह्या पृथ्वी तलावर केवळ धर्म बुडिवण्याकारितांच उत्पन्न झाला होता." त्याच स्मृतींत विवाह प्रकरणांत स्पष्ट सांगितलें आहे कीं "दासी गमनं श्रेयकरं, ग्वो द्वाह विगर्हितः ह्मणजें "दासी ठेवणें श्रेयस्कर परंतु विधवेशीं विवाह करणें अति निंद्य कर्म होय.

**धों०दा०**—हीं तुमचीं बनावटी खोटीं वचनें दिसतात. तुमच्या जवळ **नारायणस्मृति** समग्र ग्रंथ असेल तर दाखवा.

**ग०शा०**—अमचीं पोथी घरीं आहे. उद्या आमच्या घरीं याल तर तुह्माला दाखऊं. आह्मी दिलेलीं वचनें खरीं आहेत किंवा खोटीं आहेत, हें **पुराणिकबोवा, जोशीबोवा** वगैरे मंडळी सांगतील.

**न०पु०**—खोटीं वचनें कशाचीं, सर्व खरीं आहेत. **धर्मसिंधूंत** देखील पुनर्विवाह करणें निंद्य कर्म आहे ह्मणून साफ सांगितलें आहे.

**बा०जो०**—तर काय. महा पाप कर्म आहे. ( **शेषंभटास** ) कराहो कागदावर सही.

**ग०मां०**—थांबा जरासे, अशी गडबड कां करतां? ग्रंथ सभेंत आणिल्या शिवाय वचनांच्या खरे खोटेपणा विषयीं निर्णय कसा होईल, आणि शास्त्राचा निर्णय झाल्या शिवाय तुह्मी कागदावर सह्या कसल्या घेतां कपाळाच्या?

**बा०जो०**खबरदार! तोंड संभाळून बोला. कपाळ अणि डोमलें कराल तर आतांच बहिष्कृत केले जाल. ही सभा आहे किं बाजार?

**ग०मां०**—सभा कसली तुह्मी बाजारच तर भरिवला आहे. दुसऱ्याचें ऐकाल किं अपलेंच घोडें पुढें हकलतां?

**बा०जो०**बस्स चुप बसा, तुह्माला मधें मधें तोंड घालण्याचा अधिकार नाहीं. अधिक बोलाल तर तटस्थ.

**ग०मां०**—तटस्थ तुह्मी; आह्माला तटस्थ करण्याची काय प्राज्ञा तुमची?

**वा०जो०**—आह्मांला तटस्थ ह्मणतां? तुह्मी तटस्थ तुमचा बाप तटस्थ!

**ग०मां०**—तुमचा बाप आजा आणि पंजा तटस्थ मुर्ख बेटा!

( **जोशीबा** रागाऊन **गदाधरपंता**च्या आंगावर जातात आणि थापडेनें त्यांचें पागोटें पाडितात. **गदाधरपंत** डाव्या हातानें पागोटें संभाळतात व उजव्या हातानें **जोशीबाच्या** श्रीमुखाचा समाचार घेतात.)

**स०वै०**—हां! हां! हें काय **जोशीबा**!! तुह्मीं काय हलकट लोकांच्या तोंडीं लागतां!!! ( असें ह्मणून **जोशीबास** हात धरून एकीकडे करितात **जोशीबा** गाल चोळीत खालीं बसतात. **विनायकराव आंबेकर गदाधरपंतास** खालीं बसवितात.

**रा०घ०**—चांगले ग्रहस्थ! सभेंत ब्राह्मणाचा अपमान केला. ह्या बद्दल प्रायश्चित घ्यावें लागेल तुह्माला. घाबरूं नका.

**ग०मां०**—खोळंबलें आहे कांहीं अमचें प्रायश्चित्त घ्यायला. घ्या तुह्मीच प्रायश्चित्त!

**स०वै०**—सध्या प्रायश्चित्ताचें राहूं द्या. आजचें प्रकरण तर उरकून टाका अगोदर.

**अ०गो०**—अशी भांडा भांडी करून उपयोग नाहीं. आपसांत सलोखा करून चालावें हें बरें. बहुमतानें काय ठरविणें तें ठरवून टाका एकदाचें अणि चला घरीं. रात्र पुष्कळ झाली आहे.

**रा०घ०**—ठरवायचें काय आहे. अगोदरच ठरलें आहे. कागदावर सर्व सह्या करा ह्मणजे झालें. जे सह्या नाहीं करणार ते बहिष्कृत.

**बाबापाध्ये**—शास्त्रार्थाच्या पंचाइतींत पडण्याची गरज काय? आज पर्यंत आपल्या जातींत असें कर्म पडलें नाहीं तर आताही आह्मांस कर्त्तव्य नाहीं.

**अं०न०**—मग असें तरी स्पष्ट लिहा ह्या कागदांत.

**व्यं०धा०**—**वेखंडयाशीं** अन्नोदक व्यवहार करण्यास मात्र मनाई आहे. लग्न पाहेला जाण्यांत तर कांहीं बाध नाहींना?

**स०वै०**—लग्न पाहणारास कांहीं दोष नाहीं. फक्त अन्नोदक व्यवहार करूं नये.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे



**ग०मां**—बस्स, आह्माला आणखी काय पाहिजे? [illegible] परवानगी असली ह्मणजे पुरे. "चंचू प्रवेशं मुशल प्रवेशं."

**रा०घ०**—असें काय? तर मग लग्न पाहण्यास देखील मोकळीक नाहीं. ( **जोशीबास** ) करवा हो सह्या कागदावर. उगीच पंचाइत नको. फार रात्र झाली.

**अं०न०**—तुमच्या कागदांत लग्न पहाण्याविषयीं मनाई कोठें आहे? त्यावर सह्या करऊन काय उपयोग?

**वा०जो०**—खरेंच ( असें ह्मणून कागद फाडून टाकितात आणि आंत उठून जातात व **रामभटजीस** खुणेनें बोलाऊन नेतात. )

**स०वै०**—(थोडा वेळ दम धरून) जोशीबा! या लौकर इकडे, काय करतां आंत, फार वेळ [illegible] झाला. रात्र जास्त झाली आहे.

**वा०जो०**—( आंतून ) जरा दम धरा. आलोंच. ( थोड्या वेळानें **जोशीबा** आणि **रामभटजी** बाहेर येतात )

**रा०घ०**—तो पहिला ठराव रद्द झाला, त्या ऐवजीं **जोशीबा** दुसरा ठराव वाचतील तो मंडळीनें ऐकावा.

**वा०जो०**—( हातांतील कागद वाचतात ) "**बलबलपुरस्थ** ग्रहस्थ भिक्षुक मंडळींस, वे० शा० **शेषंभट** धर्माधिकारी प्रभृति ब्रह्मवृंदाकडून, अशी आज्ञा होत आहे कीं, विधवास्त्रियांचा पुनर्विवाह आपल्या जातीच्या रूढी विरुद्ध आहे, व तो ह्यापूर्वी **श्री शंकराचार्यांनीं** व **काशीकर** पंडितांनीं अशास्त्र ठरऊन टाकिला आहे, त्यास जो विधवेशीं विवाह करील अथवा जो लग्न पाहण्यास जाईल तो पतित होईल. त्याशीं अन्नोदक व्यवहार करू नये. जो ही आज्ञा अमान्य करील तो ब्रह्महत्येचा दोषी होईल. व ही सूचना इतर सर्व ग्रामस्थ ब्रह्मवृंदांस आहे. इत्यलम् "

**रा० घ०**—चला घ्या ह्या कागदावर सह्या सर्वांच्या आणि चला घरीं. बारा वाजून गेले.

**अं० न०**—आमच्या मंडळीस हा ठराव मान्य नाहीं. अह्मी तर लग्न पहाण्यास जाणार.

**व्यं० धा०**—अतां असें करा ऐकलेका **जोशीबा** ? ज्याची खुशी असेल तो अतां करेल सही. जे नाहीं करणार त्याकडे उद्या कोतवालाच्या हतीं पाठवा हा कागद. कोणाला विचार करणें असेल ते विचार करून सही करतील किंवा नाहीं करणार. मग तुह्मांला काय तजवीज करणें असेल ती करा.

**वि० पें०**—हेंही बरेंच आहे. कागद फिरवा. जे अतां करतील ते करतील आपली सही. बाकी लोकांकडे उद्यां पाठऊन द्या.

( **जोशीबा** कागद व दौत लेखणी फिरवितात. पुनर्विवाह पक्षाकडील मंडळी कोणी सही करीत नाहीं. सर्व भिक्षुक आणि **विश्वनाथराव** व इतर कांहीं ग्रहस्थ सही करितात. बाकी " उद्या विचार करून मग करूं " असें ह्मणतात नंतर मंडळी परस्परास नमस्कार करून आपापल्या घरीं जाते. )

---

## प्रवेश २ रा.

### स्थळ–दादासाहेबांचा वाडा.

**दादासाहेब** मुखमार्जन वगैरे आटोपून जमाखर्चाचे कांहीं कागद प हात बसले आहेत; त्यांच्याजवळ **नाना मेंधळे,** व **बाबा पाध्ये** बसले आहेत. इतक्यांत **बाळाजीपंत** कारकून येऊन सांगतात.

**बा०पं०**—सरकार ! **जोशीबा** वगैरे मंडळी आली आहे.

**दा० सा०**बरें आहे, इकडे घेऊन या त्यांना.

**बाळाजीपंत** जाऊन **जोशीबा, वैद्यराज, घनपाठी बोवा, नरसिंह पुराणीक, गजानन शास्त्री** व **विश्वनाथराव पेंढारे,** यांस आंत घेऊन येतात. सर्व **दादासाहेबांस** नमस्कार करून बसतात. )

दा०सा०—काल खूपच झाली सभा ह्मणून ऐकलें !

स०वै०—सभा कसली, तत्पक्ष्यांनीं बाजारच भरून दिला होता.

दा०सा० कांहीं मारामारी झाली ह्मणून ऐकतों ?

रा०घ०—मारामारी काय मोठाच अनर्थ होणार होता, परंतु तो टळला. त्या **गदाधरपंतानीं जोशीबाच्या** आंगावर हात टाकला ! विनाकारण, कांहींएक कारण नसतानां.

बाबापाध्ये०—कारण कसें नव्हतें ? अंमळ **जोशीबा**चाही अपराध होता त्यांत—

वा०जो०—( किंचित् रागाऊन ) आमचा काय अपराध होता ? तुमचे ते व्याही ह्मणून कैवार घेतां होय ?

बा०पा०—कैवार ह्मणून नाहीं. पण प्रथम तुह्मीच त्यांच्या आंगावर चालून गेलां, आणि त्यांचें पागोटें पाडलें.

वा०जो०—त्यांनीं अमच्या त्रैचा उच्चार कां केला तर ?

ना०मे०—तुह्मीं त्यांचा अगोदर बाप काढला ह्मणून !

दा०सा०—जाऊं द्या तें प्रकरण सध्या, त्याचें मग पाहूं. सभेंत काय ठरलें तें सांगा अगोदर.

वा०जो०—( ठरावाचा कागद पुढें ठेऊन ) सभेंत हें ठरलें. सरकारांनीं वांचून पहावें.

दा०सा०—( कागद हातांत घेऊन मनांतल्या मनांत वाचून किंचित् हास्यमुख होऊन ) ठराव बरा झाला; एकंदरींत कांहीं वाईट नाहीं. परंतु ह्यावर पुष्कळ ग्रहस्थ मंडळीच्या सह्या नाहींत. बहुतकरून सर्व भिक्षुक मंडळीच्याच सह्या दिसतात.

स०वै०—अह्माला काय करायचें आहे इतर ग्रहस्थांशीं ? सरकारची सही झाली ह्मणजे त्यांत सर्वांची सही आली. ह्मण आहेना, "थोराच्या पोटांत सारे" अह्माला सरकारचा आश्रय असला ह्मणजे पुरे.

दा०सा०—( संतोष पाऊन ) अमचा तर आहेच आश्रय. परंतु जितकी जास्त मंडळी असेल तितकी बरी.

रा०घ०—आज हा कागद गांवांत फिरविणार आहोंत. ज्यांनीं सही नाहीं केली ते करतील. जे नाहीं करणार त्यांची तजवीज करितां येईल. पुष्कळांचें असें ह्मणणें आहे कीं "लग्न पाहाण्यास जाण्यास काय बाध आहे ?"

दा०सा०तें ह्मणणें बरोबर दिसतें. पाहाण्याबद्दल मनाई करण्याची जरूर नाहीं, मला वाटतें.

वा०जो०नाहीं सरकार ! पाहेला जाण्याची मोकळीक दिली, ह्मणजे हळूच साखर पाणी पितील, मग लाडू खातील. आणि सर्व घोंटाळा होईल !

दा०सा०तेही खरेंच. पण पहाण्यास कोण जातात व कोण जात नाहीं ह्याचा पक्का शोध कसा लागेल ?

बा०पा०—त्याची युक्ती करितां येईल. अमच्या शेजारीं एक हाइस्कुलाचा पोर राहतो, त्याला पाठऊन देऊ लग्नास ह्मणजे तो कळवील साऱ्यांचीं नावें.

ना०मं०—परंतु तुमच्या ठरावा प्रमाणें तो वहिष्कृत होईलनां ?

न०पु०—वहिष्कृत करणें न करणें अपल्या स्वाधीन आहे. त्याला बहिष्कृत करणार नाहीं ह्मणजे झालें किं नाहीं ?

ना०मं०—मग ठीक आहे; नाहींतर बिचारा जाईल तुमच्या कामासाठीं आणि फशीं पडेल !

ग०शा० आणखीं एक युक्ती मला सुचली आहे. **वेखंडयाच्या** घराजवळच अपले **नागेश्वरभट** राहतात व त्यांच्या घरावरनेंच **वेखंडया**कडे जाण्याचा रस्ता आहे. मी तेथें दौत लेखणी घेऊन बसेन 'आणखीं जो तिकडून लग्नास जाईल त्याचें नांव टिपून घेईन.

वि०पें०—ही युक्ती फार चागली !

स०वै०—बरें तर चला अतां, सरकारला स्नानास उशीर होतो.

वा०जो०—ह्या कागदावर सरकारची सही झाली पाहिजे.

**दा०सा०**—सही कशास पाहिजे. आमची पूर्ण संमती आहे. **उपाध्येबुवा** व **नानांनीं** केलीच आहे सही.

**बा०जो०**—बरें तर आतां आज्ञा घेतों. हा कागद सरकारच कोतवालाच्या हातीं गांवांत फिरिवितील.

**दा०सा०**—तें तुह्मींच करा. माझें फारसें अंग ह्या प्रकरणीं लोकांत दिसतां उपयोगी नाहीं. ( असें ह्मणून कागद **जोशीबुवांच्या** हातांत देतात. सर्व **दादासाहेबांस** नमस्कार करून निघून जातात नंतर ) **नाना**, अतां ठेवा आटोपून दप्तर, आणि स्नानास पाणी काढण्यास सांगा. आज जेवणास उशीर झाला. ( **नाना** दप्तर उचलून ठेवतात व **दादासाहेब** स्नानास जातात. **बावापाध्येही** आपल्या घरीं जातात. )

---

## प्रवेश ४ था.

### स्थळ—**दादासाहेबांचा** वाडा.

**दादासाहेब** भोजनोत्तर वामकुक्षी करून, **गोपाळभटजीपासून** पवमानाची संथा घेण्याच्या बेतांत आहेत, इतक्यांत **नाना** मेंधळे येऊन कळिवतातः—

**ना०मे०**—सरकार! **कुशाबा जालवणकर** आले आहेत. कांहीं सरकाराजवळ बोलायचें आहे असें ह्मणतात.

**दा०सा०**—बोलायचें काय आहे. कांहीं पुनर्विवाह प्रकरणीं रडगाणें असेल आणखीं काय? ही एक मोठी पिडाच आहे बेटी. बरें आहे. घेऊन या त्यांना.

( **नाना** जाऊन **कुशाबास** घेऊन येतात व **कुशाबा**, **दादासाहेबांस** नमस्कार करून बसतात. )

**दा०सा०**—कां, खबर दबर बरी आहे सर्व?

**कु०जा०**—सरकारच्या कृपेनें सर्व ठीक आहे. सरकारची प्रकृती तर बरी असते ना आतां?

दा०सा०—बरीच असते! अतां उतार वय होत चाललें आहे, तेव्हां एक न एक कांहीतरी व्याधी असतेच शरीरास.

कु०जा०—सरकारचा आह्मां लोकांस मोठा आधार आहे. सरकारचें आह्मी लोक सदोदित इष्ट चिंतीत असतों.

दा०सा०—तुमचा सर्वांचा आमच्यावर इतका लोभ आहे, तेणेंकरून आ-ह्मास फार संतोष आहे.

कु०जा०—सरकारास एक विनंती• करणें आहे. परवानगी असल्यास बोलतों.

दा०सा०—ठीक आहे, बोला.

कु० जा०—येथें काल सभा झाली, त्यांत जो ठराव झाला तो सरकारला कळलाच असेल. बरें अन्नोदक व्यवहाराविषयीं मनाई मंडळीनें केली तर एक असो, परंतु लग्नास जाण्याविषयीं देखील प्रतिबंध केला तो सरकारास मान्य झाला असेल असें मला वाटत नाहीं.

दा० सा०—छेः छेः तो ठराव आह्माला मुळींच मान्य नाहीं. सध्या आपल्या इकडेस ह्याची रूढी नाहीं ह्मणून अडचण, नाहीं तर अन्नोदकव्यवहारास देखील बाध नाहीं असें आह्मास वाटतें.

कु० जा०—तर मग सरकारांनीं लग्नास अवश्य आले पाहिजे. सरकारांनीं येण्याचें कबूल केलें ह्मणजे इतर लोकही पुष्कळ येतील व ह्या कार्यास फार सहाय होईल.

दा० सा०—येण्यास कांहीं बाध नाहीं. परंतु काय करावें, चौघांत रहायचें तेव्हां मंडळीच्या विरुद्ध आतां येत नाहीं. तुह्मी करतां हें फार चांगलें करतां. ह्यापासून पुष्कळ फायदा आहे. हळू हळू सर्व अनुकूल होतील. सध्या भिक्षुक मंडळीपुढें कांहीं उपाय चालत नाहीं.

कु० जा०—आपल्या सारख्या थोर लोकांनीं जर अनाथ विधवांची दयापूर्वक कांहीं व्यवस्था केली तर कांहीं कठीण नाहीं. सरकारची आश्रित मंडळीच पुष्कळ आहे.

**दा०सा०**—तें सारें खरें. अनाथ विधवांचें कल्याण व्हावें अशी आमची पूर्ण इच्छा आहे. व आपल्या शक्त्यनुसार त्यांस आह्मी आश्रय देऊन त्यांचा प्रतिपाल करितों, हें तुह्मांस माहितिच आहे. परंतु जातीपुढें इलाज नाहीं. त्यामुळें आमचें येणें ल्मास होणार नाहीं तरी तुह्मी जे करतां त्यास आमची पूर्ण संमती आहे.

**कु०जा०**—अस्तु सरकारची मर्जी ! सरकारची ह्या कामांत आंतून पूर्ण संमती आहे एवढ्यानेंच आह्मां लोकांस मोठा धीर आहे. परंतु रीतीप्रमाणें गांवांत अक्षत फिरवावी असा आमचा विचार आहे व प्रथम सरकारांतच येईल अक्षत. ह्या विषयीं तरी परवानगी असावी. कारण गांवांतील शिष्ट मंडळीस आमंत्रण करणें आमचा धर्म आहे. तो आह्मी करूं.

**दा०सा०**—अक्षते विषयीं ठरावांत कांहींच उल्लेख नाहीं. व त्या विषयीं तुह्मीं कांहीं प्रश्नच काढूं नका. तुह्मांला जिथें जिथें अक्षत नेणें असेल तिथें खुशाल न्या. त्यांत कांहीं बाध नाहीं.

**कु०जा०**—एवढ्यानींच आमचा पुष्कळ कार्यभाग होईल. आतां घेतों आज्ञा.

**दा०सा०**—ठीक आहे, कोणास असें नका सांगूं कीं अक्षत आमच्या सल्ल्यानें व परवानगीनें फिरविली. ( असें ह्मणून **कुशाबास** विडा देतात. **कुशाबा** नमस्कार करून जातात ) आज दोन तीन दिवसां पासून रोज संध्येंत कांहीं न कांहीं विघ्न येतें. हें पुनर्विवाहाचें लचांड नकळे कसें ह्या आमच्या गांवांत आलें आहे. **नाना!** परसाकडचा तांब्या ठेवायला सांगा बरें लौकर. ( **गोपाळभटजीस** ) ठेवा आज पोथी. आजचा ही पाठ राहिला.

( **गोपाळभटजी** पोथी गुंडाळून उठून जातात, व **दादासाहेब** ही परसाकडेस जातात. )

---

## प्रवेश ५ वा.

### स्थळ—दादासाहेबांचा वाडा.

**दादासाहेब** प्रातःकाळीं मुखमार्जन करून कोठीचा हिशेब तपाशीत बसले आहेत. जवळ **राघो** कोठारी बसला आहे, **नाना मेंथळे** कागद वाचीत आहेत, इतक्यांत **बाळाजीपंत** कारकून येऊन कळवितातः—

**बा॰पंत॰—सरकार! जोशीबुवा, वैद्यराज, घनपाठीबुवा, पुराणिकबुवा, उपाध्येबुवा** अणि **शास्त्रीबुवा** आले आहेत.

**दा॰सा॰**—कायबा ह्या भटांनीं तर भारी डोकें उठिवलें आहे! जा त्यांना आंत घेऊन या.

( **बाळाजी**पंत जाऊन सर्वांस घेऊन येतात. सर्व **दादासाहे**बांस नमस्कार करून बसतात. )

**दा॰सा॰**—कां **वैद्यराज,** कशी काय हकीकत लग्नाची?

**स॰वै॰**हकीकत काय सर्व बरीच आहे! "तुका ह्मणे उगे रहा अणि जें जें होईल तें तें पहा." आतां ह्या गांवांत रहण्याचा धर्म नाहीं. परंतु करावें काय, पोट पाठीस लागलें आहेना?

**दा॰सा॰**—लग्नविधी कसाकाय झाला, कांहीं कळलें का?

**रा॰घ॰**— जळला लग्नविधी. कोणी "दीक्षित दीक्षित" ह्मणून लट्टभ्रष्ट ब्राह्मण आला होता मुंबईहून, त्यांनीं करिवला विधी.

**दा॰सा॰**—कन्यादान वगैरे कोणी केलें?

**वा॰जो॰**—कन्यादान केलें त्या लपोडशंख **कुशाबा** जालवणकरानें.

**दा॰सा॰**—अहो असें नकाह्मणू. **वैद्यराजास** राग येईल!

**ग॰शा॰**—कां, वैद्याराजास राग येण्याचें कारण?

**ना॰मे॰—कुशाबा,** त्यांचे भाचें लागतात.

**स॰वै॰**—कसले भाचे आणि कसलें काय! भाचेच असते तर कशाला आह्माला बशिवते छपरावर? कलियुगचीं पोरें हीं—बापाला बाप ह्मणायचीं नाहींत, तीं काकाला काका आणि मामाला मामा कोठचीं ह्मणायला!

**दा॰सा॰**—अपल्या पैकीं कोणी गेले होते का लग्नाला?

**वा०जो**—छेः, "रामाय तस्मैनमः," अपल्याकडे अक्षत देखील आली नाहीं.

**रा०घ०**—अक्षत आमच्या पैकीं कोणाकडेसच आली नाहीं, आणि आली असती तर घेतली देखील नसती आह्मी. तो **रामनाथ** मुखत्यार विदुर असून त्यानीं देखील घेतलीं नाहीं अक्षत, मग अह्मीलोक कुठचे घ्यायला!

**स०वै०**—आमच्या कडे आली होती मंडळी अक्षत घेऊन, परंतु शंख करीत गेली परत. पुष्कळ ओरडली दाराशीं आह्मीं दारच उघडलें नाहीं.

**न०पु०**—सरकारांत आली होती अक्षत ह्मणून ऐकतो?

**दा०सा०**—आली होती खरी परंतु आह्मीं घेतली नाहीं. मंडळीला तशाच सुपाऱ्या देऊन वाटी लावलें.

**ना०मे०**—(आपल्या यजमानाची चतुरता लक्षांत आणून किंचित् हास्य-मुख होतात.)

**ग०शा०**—(दोन यादी पुढें टाकून) ह्या यादी आहेत सरकार. ही मंडळी लग्नास गेलेली. आणि ही मंडळीं रात्रीं जेवणास गेलेली.

**दा०सा०**—(दोन्ही यादी हातांत घेऊन) लग्नास बरीच मंडळी गेली होती एकूण! जेवणार लोक थोडेच होते. त्यांत आमच्या उपाध्ये बुवांचे जावई देखील होते! हें कसें काय उपाध्ये बुवा?

**बाबापा०**—(मनांत) हें अरिष्ट कुठलें आलें बेटें (उघड) छेः सरकार असें कधींच होणार नाहीं, आमचे जावई किती धर्मनिष्ठ! ते लग्न पाहण्यास देखील गेले नाहींत.

**वा०जो०**—पहा बरें शास्त्रीबुवा, त्या यादींत **नारोपंतांचें** नांव आहे का?

**ग०शा०**—नाहीं बुवा; त्यांत नाहीं त्याचे नांव. व ते आपणास जातांना देखील आढळले नाहींत.

**बाबापा०**—ते नाहींच गेले. मला माहीत आहे. जेवणारांत त्यांचें नांव चुकीनें पडलें असेल. टाका खोडून तें.

**न०पु०**—एव्हांशी नका खोडूं, चौकशी करून मग खोडा.

**बाबापा.**—चौकशी काय करायाची आहे हो. मी देखील रात्रीं असेंच ऐकलें ह्मणून आज सकाळींच जाऊन मुद्दाम चौकशी केली. त्यांनीं माझ्या पायावर हात ठेऊन सांगितलें कीं " मी **वेखंड्याच्या** पंक्तीस जेवलों नाहीं."

**रा०घ०**—**वेखंड्यांच्या** पंक्तीस नसतील बसले. दुसऱ्या पंक्तीस बसले असतील! परंतु लग्नघरी जाऊन जेवले आणि त्या बाईनें लाडू वाढले ते खाल्ले कीं नाहीं. ह्याची चौकशी केलीत का तुह्मीं. ?

**बाबापा.**—ती सर्व चौकशी केली हो. ते मुळीं लग्नासच गेले नव्हते, मग जेवणास कोठून जातील? जो जेवणास जाईल तो लग्नास जाण्याला भिईल काय ?

**दा०सा०**—हें ही खरेंच. खोडून टाका **नारोपंताचें** नाव सध्या. मागाऊन पाहूं. बाकीच्या लोकां विषयीं काय करायाचें असेल तें करून टाका अगोदर.

**बा०ओ०**—करायचें काय. या लोकांवर कोतवाल फिरवावा आणि बहिष्कृत करावें साऱ्यांना.

**दा०सा०**—साऱ्यांना बहिष्कृत करणें शहाणपणाचें कामनाहीं. कारण साऱ्यांना तुह्मी बहिष्कृत कराल तर ते सारे एक होतील. मग तुह्मांला जड जाईल. त्यास असें करा कीं जेवणारांस करा बहिष्कृत, आणि लग्न पाहणारांस तटस्थ ठेवा. ह्मणजे त्यांस वाटेल कीं आपण सभेचा ठराव अमान्य केला ह्मणून ही शिक्षा मिळाली. पुढें मग त्यांनां हळूच आपल्या कडेस घेऊं ओढून. मग त्या पक्षाची थोडीशी राहिलेली मंडळी आपो आपच तोंड घशीं पडेल. कां **वैद्यराज**, आहे कीं नाहीं ही युक्ती बरी!

**स०वै०**—खाशी! उत्तम तोड काढली सरकारांनीं.

**रा०घ०**—(मनांत) इतकी सर्व मंडळी जर हातांतून गेली तर आहे पंचाइतच, कारण आपले बहुतेक यजमान त्यांत जातील. मग आपल्या पोटावर पडेल पाणा. (उघड) सरकारांनीं फार नामी युक्ती सांगितली. लग्न पहाणारांविषयीं काशीस पत्रें पाठवून खुलासा मागऊन घेतां यईल.

[library stamp]

दा०सा०—ठीक आहे, आज सभा करून उद्यां फिरवा कोतवाल.

वा०जो०—पुनः सभा भरविण्याचें कांहीं प्रयोजन दिसत नाहीं. सभेचा ठराव झालाच आहे, त्याप्रमाणें या लोकांवर कोतवाल फिरविला ह्मणजे झालें.

रा०घ०—आणखीं काय, इतकेंच करणें बस्स आहे. ह्याशिवाय मोठमोठ्या शहरांस पत्रें पाठवावीं ह्मणजे या लोकांचा चहूंकडे संसर्ग अगदींच बंद.

दा०सा०—हेंही बरेंच. धर्माधिकारी पाठिवतील चहूंकडे पत्रें.

स०वै०—धर्माधिकाऱ्याला बाहेर गांवीं कोण ओळखतो? सरकारचें नांव जगजाहीर आहे, तेव्हां सरकारचींच पत्रें जाणें बरें.

दा०सा०—छेः छेः तसलें करणें उपयोगी नाहीं. अमचें नांव उगीच बद्दु होईल कीं हेच लोकांना बहकावितात. राज्य पडलें दुसऱ्या प्रकारचें. राजास आमचा धर्म बुडविणें इष्टच आहे. तेव्हां त्या विरुद्ध आमच्या सारिख्यानीं उघड खटपट करणें नीट नव्हे. तुह्मी भिक्षुक मंडळी पाहिजे तें करा. आंतून आहोंच अह्मीं तुह्मांस अनुकूल.

स०वै०—सरकारास भिण्याचें कारण मुळींच नाहीं. पत्राचा मजकूर अशा तऱ्हेचा लिहावा कीं जेणेंकडून वांचणारास वर वर कांहीं न कळेल. परंतु इंगितार्थ लक्षांत येईल.

दा०सा०—बरें तर करा मसुदा पत्राचा पाहूं.

स०वै०( दौत लेखणी व कागद घेऊन पत्राचा मसुदा तयार करून वाचतात ) "वेदशास्त्र संपन्न व रा. रा. सर्व वैदिक शास्त्री पंडित आणि गृहस्थ मंडळी अमुक ग्रामस्थ यांस, श्रीमंत सकल गुणालंकृत अखंडित लक्ष्मी सदा राजमान्य राजश्री **दादासाहेब काथवटे**, जहागीरदार संस्थान **बलवलपूर**, यांचे अनेक नमस्कार. आमच्या गांवांत काल रोजीं **मोरोपंत वेखंडे** यांनीं आपला द्वितीय विवाह एका विधवेशीं केला व त्यांच्या पंक्तीस जी मंडळी जेवली ती येणेंप्रमाणें.

१ कुशाबा–जालवणकर.
२ गदाधरपंत–मांडवे.
३ नारोबल्लाळ–खोटे.
४ गणेशपंत–शाहणे.
५ यशवंतराव–वेखंडे. }
६ अमृतराव–वेखंडे. } मोरोपंताचे आप्त.
७ रामचंद्रराव–वेखंडे. }
८ गुजाबा–फागे.
९ एसोबा–गाडगे.

स्वधर्म रक्षण करणें आपलें कर्त्तव्य कर्म जाणोन आपणास सूचनार्थ लिहिलें असे. आपण सूज्ञच आहांत. सूज्ञाप्रत अधीक काय लिहावें? "

दा॰सा॰–खासा मसुदा! शेवटीं असें वाक्य लिहावें कीं "हें पत्र तत्पक्षीयांस दाखवूं नये." ह्मणजे मग सर्व ठीक होईल. अमचे बाळाजीपंत नकला तयार करून आज रवाना करतील चहूंकडे.

स॰वै॰–( दादासाहेबांनीं सुचिवलेलें वाक्य लिहितात आणि मसुदा बाळाजीपंताचे हातीं देतात. )

ग॰शा॰–येथ पर्यंत तर सरकारचे सहाय्यानें सर्व काम यथास्थित झालें आणि पुढेंही आमच्या पक्षास सरकारचेंच पाठबळ आहे. परंतु एक विनंती करणें आहे कीं, सरकारच्या समक्ष आपल्या गांवांतील सर्व मंडळीस बोलावून, त्यांस ह्या प्रकरणीं उपदेशपर चार शद्ब सांगावे, ह्मणजे त्यांची बुद्धि स्वधर्मांत स्थिर राहून ते त्या पक्षास मिळणार नाहींत. परवानगी असल्यास येथें उद्यांच समारंभ करितां येईल.

दा॰सा॰–आमच्या कडनें कांहीं हरकत नाहीं. परंतु सध्या माझी प्रकृति नीट नाहीं, ह्मणून सभेंत माझ्यानें रात्रीं बसणें होणार नाहीं. जोशीबुवांच्या वाड्यांतच कां होऊं द्याना समारंभ?

ग०शा०—समारंभ दिवसा सगटच करितां येईल, असा चार पांच वाजतां सायकाळीं. सरकारच्या समक्षच व्हावा अशी माझी इच्छा आहे.

दा०सा०—बरें आहे. **नाना**! उद्याची बिछाइती वगैरेची सर्व तजवीज ठेवा, आणि गांवांत बोलावणें करा.

ना०मे०—बोलावणें सर्व गांवांत करायचें किं फक्त आपल्या मंडळींसच ?

बा०जो०—( मागील सभेची आठवण करून )फक्त आपल्या मंडळींसच. तिकडचे लोक आले ह्मणजे दांडगाई करतील.

न०पु०—त्यांची किट किट नको पुन्हा. ते आले ह्मणजे शास्त्राचें घोडें पुढें करतील.

ग०शा०—करूं द्या शास्त्राचें घोडें पुढें. मी त्यांना उत्तर देणारा समर्थ आहें. आमच्या **नारायण स्मृती** पुढें कोणतें धर्मशास्त्र टिकतें तें पाहातो तर खरें.

रा०घ०—नकोहो शास्त्रार्थाची किट किट. आपल्याच मंडळींस उपदेश करावा ह्मणजे झालें. त्या भ्रष्टाशीं आपल्याला काय कर्त्तव्य आहे?

बा०बापा०—हेंच बरें. आपली मंडळी बोलवा ह्मणजे झालें.

दा०सा०—बरें तर **नाना**! आपल्या कडचीच मंडळी बोलवा ह्मणजे झालें.

स०वै०—आतां घेतों आज्ञा सरकार! सरकारास आह्मीं लोक वारंवार तकलीफ देतों त्याची क्षमा असावी. सरकार आमच्या लोकांचे स्तंभ आहेत, ह्मणून सरकारच्या पायां जवळ आह्मी लोक वारंवार धाऊन येतो.

दा०सा०—(संतोष पाऊन ) कांहीं तकलीफ नाहीं आह्मांस. हें धर्माचें काम आहे. ह्यांत आह्मांस संतोषच आहे.

(सर्व **दादा साहे**बांस नमस्कार करून निघून जातात. )

दा०सा०—आंघोळीस पाणी काढायला सांगा. (असें ह्मणून **दादा साहे**ब उठतात. **नाना** कागद पत्र सर्व आटोपून ठेवितात. आणि जातात. कोठारी व **बाळाजी पंत**ही जातात. )

## प्रवेश ६ वा

### स्थळ– दादासाहेबांचा वाडा.

तिसरा प्रहरा नंतर चार वाजल्याच्या सुमारास **दादासाहेब** गादीवर लोडाशीं बसले आहेत; उजव्या बाजूस **बावापाध्ये शेषंभट धर्माधिकारी गजाननशास्त्री, वासुदेवभट जोशी, सदाशिवभट वैद्य, रामभट घनपाटी, नरसिंह पुराणिक, कृष्णशास्त्री प्रयागवाळ. नागेश्वरभट मुळमुळे,** इत्यादि वैदिक, शास्त्री पंडित बसले आहेत. डाव्या बाजूस, **विश्वनाथराव पेंढारे, अण्णा साहेब गोडबोले, राघोपंताकिडकिडे, नारोपंत शेगडे** इत्यादि गृहस्थ कारकून मंडळी बसली आहे. सभास्थान गच्च भरलें आहे.

**दा॰सा॰**–( **गजानन शास्त्र्यास** ) कां शास्त्रीबुवा, होउं द्या आरंभ.

**ग॰शा॰**–बरें आहे. ( असें ह्मणून बाहेर उठून जातात व तोंडांतील विडा तंबाकू थुंकून, लाळ वगैरे धोतरानें पुसून आंत येतात व उभे राहून ) अध्यक्षस्थानीं सरकार आहेतच. करतों अतां आरंभ.

**दा॰सा॰**–ठीक आहे. करावा आरंभ.

**ग॰शा॰**–( खकारून व गळा साफ करून. ) **दादासाहेब, अण्णासाहेब, विश्वनाथरावजी,** प्रभृति सद्गृहस्थहो! **उपाध्येबुवा, जोशीबुवा वैद्यबुवा** आदि वेदशास्त्र संपन्न परमधार्मिक व पूज्य महा ब्राह्मणहो! मी आपल्या गांवांत केवळ एक पांथस्थ आगंतुक व अज्ञ ब्राह्मण असून आपण सर्व माझा बहुमान करितां, त्यामुळें माझी मला थोरवी वाटणें साहाजिकच आहे. व ती खरोखर वाटतही आहे ह्यांत नवल नाहीं. आपण सर्व माझा गौरव करितां, ह्मणूनच परवांच्या सभेंत बोलण्याचें मला धाडस झालें व मी आपल्या प्रतिपक्ष्यांचीं तोंडें बंद केलीं. आज पुनः मी ह्या मोठ्या विद्वज्जनसमूहा पुढें बोलण्यास उद्युक्त झालों आहें, हें केवळ आपल्या अनुग्रहाचेंच फल होय. मी

बोलण्यास उभाराहिलों आहें खरा, परंतु काय बोलूं व काय न बोलूं हें माझें मलाच कळत नाहीं. "कायम्या पामरें, बोलावें उत्तर । परितो **श्रीशंकर** बोलवील." मला कांही कळत नाहीं व मला वाचा शक्तिही नाहीं. मी त्या दिवशीं जें बोललों तें सर्व **शंकर** प्रसादाच्या योगानें बोललों व आजही **शंकरप्रसाद गुटिकाच** काय बोलवील तें खरें. माझा आज असा विचार आहे कीं पुनर्विवाह पक्षाचें चांगलें खंडन करून आपला पक्ष ह्मणजे निषेध पक्ष स्थापन करावा. तेणें करून सर्वांचें चित्त स्वधर्मीं स्थिर राहून, पूनर्विवाहरूपी प्रभंजनानें चलायमान होऊन अधर्म कूपांत पतन पावणार नाहीं. ("शाबास! शाबास!" आणि टाळी.) आमच्या ह्या भरतखंडांत अनादिकालापासून चालत आलेला धर्म पृथ्वींतील सर्व धर्मांत श्रेष्ठ मानिला आहे. जो पावेतों आपल्या जातीचे राजे राज्य करीत होते तों पावेतों आपला आर्यधर्म पूर्ण रूपानें जागृत होता. कालचक्रामुळें आपले आर्य राजे जाऊन म्लेंच्छ राजे झाले तेव्हां पासून आमच्या धर्मास कीड लागली. पुर्वी मुसलमान राजे झाले त्यांनीं आमची जी छलना केली ती सर्वांस विश्रुत आहेच. त्या वेळेस **शंकर** कृपेनें **श्रीशिवाजी** सारिखे वीर उत्पन्न होऊन कांहीं धर्म शेष राहिला व म्लेंच्छ धर्माचा पराभव झाला ("खरें आहे"— आणि टाळी) परंतु प्रस्तुत कांहीं तऱ्हाच निराळी. यवन लोक आह्मांस जबरीनें धर्मभ्रष्ट करण्याचा यत्न करीत तेणें करून आह्मांस ह्मणजे त्यावेळेस जे आमचे पूर्वज होते त्यांस त्वेष येऊन स्वधर्म रक्षणा करितां अपला प्राण खर्चीं घालण्यास देखील हुरूप येत असे परंतु ह्या इंग्रजीं राज्यांत आमचे लोक आपोआपच धर्मभ्रष्ट होत चालले आहेत. जुन्या वेदशाळा मोडून त्या ऐवजीं इंग्रजांनीं जिकडे तिकडे स्वभाषेच्या शाळा स्थापन केल्या आहेत. तेणें करून आमच्या मुलांची लहानपणापासूनच मति भ्रष्ट होते. **पाद्री** लोक आमच्या लोकांस बाटिवण्या विषयीं प्रयत्न करीतच

आहेत. आगगाडीनें तर आमच्या धर्मावर व विशेषेंकरून जातिभेदावर आगच पाखडली आहे. जिकडे पहावें तिकडे नवे नवे मार्ग व नवे नवें पंथ उत्पन्न होत आहेत. आमच्या मुंबई पुण्याकडेतर या नवीन पंथांस व धर्मभ्रष्टतेस जणूं काय ऊतच आला आहे. त्या त्रासानेंच मी आपला देश व घर-दार सर्व टाकून ह्या आपल्या गांवांत आलों. नाहींतर इकडे येण्याचें मला कांहीं प्रयोजन नव्हतें कारणकीं माझे तिकडे सर्व आप्तवर्ग आहेत, गांव शींव, जमीन जागा शेती वाडी, वर्षासनें इनामें, सर्व कांहीं तिकडे आहे. त्या सर्वांवर पाणी सोडून केवळ आपला धर्म व एक स्वयंपाकीण विधवा बाई बरोबर घेऊन इकडे निघून आलों. ( "धन्य ! धन्य !" व टाळी ) परंतु **"नाहि चलति नराणां भावनी कर्मरेखा"** ह्या शास्त्रोक्ती-प्रमाणें येथें देखील पहावें तो अधर्माचें शुक्लकाष्ट आमच्या मागें आहेच. दुःखांत समाधान ह्मणून एवढेंच कीं, जरीं अधर्म व भ्रष्टता येथें पसरत चालली आहे, तरी धर्म रक्ष-णा विषयीं दक्ष व तत्पर अशी मंडळी आपल्या सारखी अद्याप येथें पुष्कळ आहे, त्यां बरोबरच मीही आपलें शेष आयुष्य स्वधर्म रक्षणांत व मातृ भूमीच्या सेवेंत घालिवण्याचा निश्चय केला आहे. व परम कृपाळू रावसाहेब **पेंढारें** यांच्या छाये खालीं वास करीत आहें. ( टाळी. ) कोणाची निंदा करावी अथवा कोणास उगीच दूषण देऊन त्यांची छलना करावी असा आमचा मुळींच संप्रदाय नाहीं. परंतु धर्मांचें रक्ष-ण करण्याविषयीं सर्वांनीं झटावें किंबहुना प्रसंग पडल्यास प्राण देखील वेंचावें अशी भगवदोक्ती आहे. **गीतेंत** ह्मटलें आहे. **"स्वधर्मे निधनंश्रेयः परधर्मो भयावहः,"** त्या प्रमाणेंच आह्मीं आपला धर्म रक्षण करण्यासाठीं योग्य उपायांची योजना करीत आहों, व आज जी आमचीही जंगी सभा येथें भरली आहे ती त्यासाठींच. आजपर्यंत ह्यागांवांत ज्या लहान सहानै गोष्टी आ-पल्या धर्माविरुद्ध झाल्या, त्यांकडे आह्मीं कानाडोळा केला.

इंग्रजी शिकलेले लोक मांस मच्छी खातात, ग्राम कुक्कुट गट्ट करितात. ( **राघोपंत नारोपंतास** हळूच विचारतात—" ग्राम कुक्कुट काय हो?" **नारोपंत** त्यांना सांगतात—"ग्राम कुक्कुट ह्मणजे पाळिव कोंबडी." ) श्राद्धपक्ष, कुळधर्म कुळाचार त्यांनीं सर्व सोडले. पूजाअर्चा टाकली. आगगाडींत दशम्या खातात. दारू पिऊन गटारांत पडतात. हलवायाकडच्या पुऱ्या व भजीं खातात. ( **अण्णासाहेब** आदि इंग्रजी शिकलेले सभेंत असणारे लोक खेरीज करून बाकी सर्व टाळीवर टाळी देतात. ) याप्रमाणें अनेक अनाचारावर कालमान लक्षांत आणून, आह्मी लक्ष पुरविलें नाहीं. परंतु परवां आपल्या गांवांत जो अधर्म व अनर्थ झाला, तो मात्र "न भूतो न भविष्यति" ह्या अनर्थकारक कृत्यास कोण धार्मिक मनुष्य पोटांत घालूं शकेल बरें? आह्मीं सर्व फार क्षमाशील व शांत स्वभाव आहोंत व सहसा आह्मीं कोणाचा तिरस्कार करीत नाहीं. व्यभिचार, गर्भपात, भ्रूणहत्या, बालहत्या, इत्यादि सर्व पातकांविषयीं आह्मीं डोळे झांक करितों, परंतु "विधवाविवाह" किंवा "पुनर्विवाह" हा शद्ब कानीं पडला कीं, आमच्या तळव्याची आग मस्तकास जाते! खरेंच कां बरें जाणार नाहीं? हा अधर्म लहानसहान आहे काय? ( "महा अधर्म! महा अधर्म!!" ) मग आह्मी तत्पक्षीय लोकांस बहिष्कृत केलें तें कांहीं वावगें केलें नाहीं, हें लहान पोर किंवा एकादी ह्मातारी बाई देखील सांगेल! वास्तविक पाहिलें असतां **बेखंड्यास** ह्मातारपणीं द्वितीय विवाह करण्याची जरूर काय होती? अग्निहोत्राचा भंग होऊं नये ह्मणून, किंवा घरांत सुवासीन असून कुलधर्म कुलाचार बरोबर चालावे, अथवा वसंतपुजेंत ब्राह्मणांच्या पायांवर अर्घ्य देण्यास स्त्री पाहिजे होती तर कुमारिकांचा दुष्काळ आहे काय? आपल्यांपैकीं कित्येकांच्या मुली लग्नाच्या आहेत. खातें पितें घर जाणून पाहिजे तो आपली मुलगी **बेखंड्यास** हंसत नाचत देता. फक्त स्वयंपाकाकरितांच जर लग्न करण्याची त्यांस जरूर

होती तर स्वयंपाक करणाऱ्या सोंवळ्या बायांचा काय तोटा आहे? मी स्वतः हव्या तितक्या बाया देशांतून आणविल्या असत्या. एकादी बाई ठेऊन तिजवर निर्वाह केला असता तर काय न चालतें? अथवा विधुर व्रतानें राहिले असते तर त्यांस कठीण पडलें असतें काय? **वेखंडे** तर वयस्कच आहेत परंतु दुर्दैवानें ऐन तारूण्यांत वैधूर्य प्राप्त झालें असून ज्यानीं आपला जन्म ब्रह्मचर्य्यांत घालविला आहे असे महा पुरूष आमच्या ह्या सभेंतच आज उपस्तिथ आहेत. उदाहरणार्थ (**दा. सा.** कडे हात करून) आमचे ग्रामाधिपति! यांवर दुर्दैवाचा घाला पडून आज पंचवीस तीस वर्षें झालीं. (**दा. सा.** आलेले दुःखाश्रु रूमालानें पुसतात) परंतु त्यांनीं तीं कशीं काढलीं? सरकारची इंद्रिय निग्रहता किती आहे, हें मजपेक्षां आपण ग्रामस्थ मंडळी विशेष जाणत आहां. त्यांनां **रामराजा**चीच उपमा देणें योग्य (टाळी) दुसरें उदाहरण. (**कृ. शा. प्र.** कडे हात करून) आमचे **प्रयागवाळ** बंधु **कृष्णशास्त्री**! आज यांचें वय साठीच्या जवळ जवळ आहे, तथापि गांवोगांव भ्रमण करून पतित लोकांस शुद्ध करून त्यांस धर्ममार्गांत परत आणण्या विषयीं, ते किती उद्युक्त असतात व खटपट करितात, हें सर्वांस विश्रुतच आहे. वृद्धापकालांत जर त्यांच्या आंगांत अद्याप इतकी तरतरी आहे तर तरूणावस्थेंत त्यांची शक्ति व उमेद किती असेल, ह्याचें अनुमान श्रोत्यांनींच करावें. असें असून यांनीं चाळीस वर्षें वैधूर्यदशेंत किती शुद्धरीतीनें घालिवलीं हे आपणास माहीतच आहे. यांनीं आपल्या सर्व तारूण्याची विरहाग्नींत आहुतीच दिली असें ह्मटलें पाहिजे. यांस **प्रतिशुकाचार्य** ह्मटलेंतरी अतिशयोक्ती होणार नाहीं असें मला वाटतें (टाळी.) आत्मस्तुतीचा मजला आपण दोष न द्यालतर तिसरें उदाहरण मी आपलें स्वतःचें देतों. माझें वय पन्नासवर्षां जवळ जवळ आहे. अद्याप मी स्वस्त्री मुखावलोकन केलें नाहीं. अंतस्थ अग्नी शांत केलाच पाहिजे व क्षुधा कशीतरी तृप्त झालीच पा-

हिजे, ह्मणून एक स्वयंपाकीण बाई जवळ ठेवणें भाग पडलें, परंतु आज हा काळपर्यंत स्त्रीसंपर्क मला घडला असेल तर तुमच्या सर्व देव ब्राह्मणांच्या पायांची शपत ! ( टाळी ) सारांश **वेखंड्यांस** ह्या वयांत द्वितीय विवाह करण्याची कांहीं गरज नव्हती. त्यांना "**कटिशूला**ची बाधा होती तर त्यांनीं "**विधवोद्वाह गरल**" प्राशन करण्यापेक्षां, "**रूढीतंत्रांत**" त्या रोगावर तीन रस सांगितले आहेत, त्यांपैकीं एकादा रस सेवन केला असता तर त्यांस तो विशेष हितकर झाला असता. "**रूढीतंत्रांत**" कटिशूलावर, "**परबालामृत**", "**वारवध्वामृत**" आणि "**दास्याधरामृत**" असे तीन रस सांगितले आहेत, पैकीं पहिल्यास द्रव्यव्यय जास्ती नको तरी तो कष्टसाध्य व त्यास लागणारी सामग्री दुर्मिळ आहे; दुसरा रस बाजारांत ऐता तयार मिळतो, परंतु त्याला पैसे जास्त पडतात आणि तो बहुधा तलख असल्यानें त्यापासून अपकार होण्याचें भय असतें; परंतु तिसरा रस ह्मणजे "**दास्याधरामृत**" सुलभ, सुप्रसिद्ध, सुखकर आणि स्वस्त असा आहे. तो नित्य सेवन केला तरी त्यापासून अपकार होत नाहीं, व त्याला खर्च महिन्यास फार झालेंतर पांच किंवा सहा रूपये पडतात ! तो आमच्या सारिखे गरीब भट भिक्षुक देखील सेवन करतात, मग **वेखंड्यां** सारिख्या धनिक लोकांस सेवन करणें काय कठीण ? ( टाळी ) हा रस सेवन केल्यापासून केवळ शारीरिक पीडा दूर होऊन ऐहिक सुखच प्राप्त होतें असें नाहीं, तर सेवन करणाराच्या व त्याच्या पितरांच्या आत्म्यास पारमार्थिक सुखाचाही लाभ होतो. हें ह्मणणें माझें स्वकपोल कल्पित आहे असें आपण समजूं नये. ह्याला शास्त्र प्रमाण आहे—"**अपत्यं धर्मकार्याणि, शुश्रूषा रतिरुत्तमा। दास्याधीनस्तथा स्वर्गः पितॄणा मात्मनश्चह ॥**" व केवळ शास्त्र प्रमाणच आहे आणि त्या रसाचा कोणी अनुभव घेऊन पाहिला नाहीं असें नाहीं ( **स. वै.** कडे हात करून ) आमचे ग्राम्य **धन्वंतरी सदाशिव**

**भटजी** ह्याविषयीं साक्ष देतील पाहिजे असल्यास. त्या रसापासून स्वतः ज्यांनां गुण आला आहे असे कित्येक सद्गृस्थ या सभेंत निघतील—उदाहरणार्थ—वे. शा. **शेषंभटजी, रा.रा. दिवाकरपंत, श्रीरामपंत, विसाजीपंत, व्यंकोबा** इत्यादि. जुने दाखले पाहिजे असल्यास वे. शा. **भटंभट** (**सदोबाचे** तीर्थरूप) प्रख्यात **लल्लू जोशी, नागोबानाना, माधवाचार्य भेसाई, रामनाथ मुखत्याराचे** तीर्थरूप (नांव विसरलों) असा हा उत्तम रस टाकून रूढी व धर्मशास्त्राचा अतिक्रम करून; "**महाजनोयेन गतः सपंथः**" ह्या भगवदोक्तीचें उल्लंघन करून, व शिष्ट संप्रदाय मोडून, **वेखंडे,** स्वतःच्या अज्ञानामुळें अगर दुसऱ्याच्या नादीं लागून, कांहीं गरज नसतां पापकूपांत मुद्दाम जाऊन पडले. त्यांस ह्मणावें तरी काय? (**रा. घ.**—"गाढव! मूर्ख!") मूर्ख? शत मूर्ख! (टाळी) हे पुनर्विवाहपक्षाचे लोक स्वपक्ष मंडण करितानां असें ह्मणत असतात कीं "आह्मी ही पुनर्विवाहाची चाल सुरू केली आहे तेणें करून तरुण विधवा दुःख मुक्त होतील" या अज्ञानी लोकांस हें कळत नाहीं कीं दुःख आणि सुख हे वस्तुतः कांहीं नसून केवळ कल्पना तरंग मात्र आहेत. सर्व शास्त्रांत अत्युत्तम जे वेदांत शास्त्र त्याचे सिद्धांत "एकमद्वितीयं ब्रह्म," "सर्व ब्रह्ममयं जगत्" हे त्यांस ठाऊक असते तर ते कशाला अशा फंदांत पडते! त्यांना विधवांची दया येते परंतु आह्मा गरीब भिक्षुकांची कांहींच दया येत नाहीं! ज्याचे पुत्र मोठे होऊन आपल्या मृत पित्याचे श्राद्ध पक्ष करण्यास योग्य झाले असतील अशा विधवांचा जर पुनर्विवाह केला तर बरें असो. परंतु हे निर्दय लोक अल्पवयस्क निपुत्रिक विधवांच्या पुनर्विवाहाचा प्रचार पाडण्याचा यत्न करीत आहेत, आणि बालविधवांचीच संख्या मोठी आहे; तस्मात् जर त्यांचा पुनर्विवाह झाला तर त्यांच्या मृतपतीचे श्राद्धपक्ष बंद पडतील आणि त्या

पासून आमच्या प्राप्तीवर सहजच धोंडा पडेल! ( "सत्य! सत्य!" ) तर मग अशी तसली हानिकारक चाल न पडूं देण्याविषयीं होईल तितकें झटलेंच पाहिजे ( "अवश्य–अवश्य" ) ह्या चालीपासून केवळ आमचाच तोटा आहे असें नाहीं. पुनर्विवाहित विधवा, धर्मभ्रष्ट तर होतीलच, परंतु त्यांच्या मृत पतीचेही हाल होतील. हें मी आपणास उदाहरणानें स्पष्ट करून दाखवितों. समजा आमच्या **प्रयागवाळ** बंधु **कृष्णशास्त्र्यानीं** आज अपलें लग्न केलें–ते करणार नाहींतच. पर घटकाभर समजा कीं केलें, आणि उद्या ते **यमलो**कास गेले–चुकलों, वाद्दोषाबद्दल क्षमा असावी–**वैकुंठास** गेले, आणि त्यांच्या मागून त्यांच्या विधवास्त्रीनें पुनर्विवाह केला; तर मग **शास्त्रीबोवाची** वाट काय होणार? त्यांस निदान वर्षांतून एकवेळ तरी अम्बोदक हवें तें कोण पुरविणार? ( "पुनर्विवाह पक्षाची मंडळी!" ) कशाला आशा हवी! ते अपापल्या पितरांना तर देतच नाहींत, मग **कृष्णशास्त्र्यास** कोठून देणार!! छिः तें कांहीं नाहीं. ही पुनर्विवाहाची चाल अति निंद्य, ती आपण कधीं प्रचारांत येऊं देऊं नये हेंच आपलें कर्त्तव्य. विधवांना दुःख आहे कोठें? मुळींच नाहीं. बहुतेक विधवां तर अल्पवयस्क व अज्ञानच असतात त्यांना विवाहजन्य सौख्याचा मुळींच अनुभव झालेला नसतो, तेव्हां "**मूले कुठाराः**" ह्या न्यायशास्त्राच्या सुत्राप्रमाणें, त्यांस पतिवियोग जन्य दुःख कोठून होणार? ज्या संसारसुख भोगून विधवा होतात, त्यांच्या सर्व वासना तृप्त झालेल्या असतात. अशांस पुनर्विवाहाची गरजच नाहीं. या शिवाय कामविकार वगैरे विधवांस कांहीं होऊं नये ह्मणून शास्त्रकारांनीं त्यांस "**कामंतु क्षपयेद्देहं पुष्पमूलफलैः शुभैः**" अशी पद्धत लाऊन दिली आहे. मग पुनर्विवाहाचा भ्रष्टप्रचार हवा कशाला? ( टाळी ) ज्यांना उदर पोषणाची कांहीं सोय नसते त्यां साठीं **परमेश्वरानीं** अनेक धार्मिक व उदार ग्रहस्थ या पृथ्वीतलावर निर्माण केले अहेत. ह्या **चलवलपु-**

**रांत** तर तरुण विधवांस कधींच कोणत्या गोष्टी विषयीं ददाती असण्याचा संभवनाहीं. ( **दा. सा.** कडे हात करून. ) आमच्या **सरकारानीं** तर विधवा पालनाचें व्रतच घेतलें आहे ! **इंद्रास** जसें " **प्रजापती** " नांव शोभतें तद्वत आमच्या **सरकारांस** "**विधवापती**" हें नांव शोभतें. ( श्रोतेमंडळी मोठ्यानें हंसते—**दा. सा.** किंचित खिन्न झालेले दिसतात ). मी सरकारशीं विनोद करावा अशी माझी योग्यता नाहीं व मी सरकारांस " **विधवापती** " हें विशेषण विनोदानें दिलें नाहीं. " पातीति पतिः " ह्मणजे " पालन करणारा जो तो पती " अशी पति शब्दाची व्युत्पत्ती आहे; आणि "विधवायाः पतिः" विधवापतिः, ह्मणजे ' विधवांचें पालन करणारा जो तो विधवा पति " असा **शष्टितत्पुरुष समासांत** "विधवापति" हा शब्द सिद्ध होतो. हें पाहिजे असल्यास आमचे महा वैयाकरणी **पुराणिक बुवा** देखील सांगतील. ( मोठी टाळी—**दा. सा.** प्रसन्न वदन होतात ) ज्या **पराशर** वाक्यावर पुनार्विवाह पक्षाचा व्यूह रचिला आहे त्याचा तरी अर्थ असाच आहे कीं नष्टादि पंचापत्तींत स्त्रियांनी एकाद्या थोर पुरुषाचा आश्रय धरून रहावें, कारण " पतिरन्यो विधियिते " ह्यांत " पति " शब्दाची " पातीति पतिः " अशीच व्युत्पत्ती होते. ( टाळी. ) **सरकारा**सारखे परम दयाळू व विधवांचे अत्यंत कनवाळू धनाढ्य गृहस्थ, विधवांचा सांभाळ व परामर्ष करण्यांत आपलें तनमनधन लावितातच, परंतु आपल्या सर्वांच्या चरण प्रतापेंकरून मी एक गरीब भिक्षुक ब्राह्मण असूनही, दोनचार तरुण विधवांचा सांभाळ करण्याची उमेद बाळगितों. ( टाळी ) मग आमच्या गांवांत विधवा विवाहाचें प्रयोजन काय ? ( " अगदीं नाहीं. " ) **सभ्यजनहो !** मला वाटतें आतां आपणांस फार वेळ बसल्यामुळें व माझ्या वेड्यावांकड्या भाषणामुळें कंटाळा आला असेल. ( " मुळींच नाहीं—चालूंद्या—चालूंद्या " ) आपण खरोखरच मोठे कृपावंत आ-

णि उदार आहांत, कारण यापूर्वी मी कधींच कोठें सभेंत भाषण केलें नाहीं. एवढ्या मोठ्या समुदायासमोर उभें राहून बोलण्याचा हा प्रथमच प्रसंग. तरि निःसंशय माझें भाषण असंगत, अशुद्ध, नीरस आणि त्रासजनक झालें असेल; तथापि आपण सर्वांनीं तें शांतवृत्तीनें लक्षपूर्वक साद्यंत ऐकून घेतलें, त्याबद्दल मी आपला फार फार आभारी आहें. ( "शाबास! गजानन शास्त्री शाबास!! खूपच बहार केली!!" टाळ्यांचा गजर होतो. )

अ० गो०—सज्जन सभासदहो! आमच्या शास्त्रीबोवांनीं जें भाषण केलें तें किती मधुर रसभरित आणि मार्मिक झालें, हें सर्वांस समजलेंच असेल. त्यापेक्षां जास्त आह्मांपैकीं कोणी बोलेल अथवा बोलण्याची गरज आहे असें मला वाटत नाहीं. पुनर्विवाहाच्या सशास्त्रते अशास्त्रते विषयीं जरी वाद असला, तरी पुनर्विवाह करणें अगदीं रूढी विरुद्ध आहे ह्यांत तिलमात्र संशय नाहीं. व ज्या अर्थी तो लोकानां मान्य नाहीं त्या अर्थी प्रचारांत आणूं नये हेंच उचित. ( टाळी ).

रा० कि०—शास्त्री महाराजांनीं जें भाषण केलें तें जसें सर्वांस पसंत पडलें तसेंच मलाही आवडलें. त्यांचे विचार व त्यांचे सिद्धांत सर्व मला मान्य आहेत. त्यांनीं इंग्रजी शिकलेल्या लोकांच्या आचरणावर जी टीका केली ती मात्र मला वाजवी पेक्षां जास्त वाटते. कारण सर्वच इंग्रजी शिकलेले लोक ह्मणजे मांस भक्षण करितात, कोंबड्या खातात किंवा दारू पितात असें नाहीं; किंवा सर्वांनींच आपले कुळधर्म कुळाचार आणि श्राद्ध पक्षादि कर्में टाकिलीं आहेत असें नाहीं. कांहीं लोक गुप्त रीतीनें मद्यपान मांस भक्षण इत्यादि दुराचार करितात त्यांपासून भिक्षुक मंडळी ह्मणजे अगदीं आलिप्त आहे असेंही ह्मणतां येत नाहीं ( सभेंत असलेले भिक्षुक नाकें मुरडितात ) परंतु मनुष्याचें बाह्याचरण कसें आहे ते मात्र पाहिलें पाहिजे. आणि तेंच पाहणें शक्यही आहे. चोरून कोण काय करितो

तें आपणास कसें कळेल? कदापि कळणार नाहीं. आपल्या आशिर्वादें करून मलाही इंग्रजी भाषेचें चांगलें ज्ञान आहे व पगारही मोठा आहे, ह्मणून मीं आपले कुळधर्म कुळाचार श्राद्धपक्ष श्रावणी इत्यादि ब्रह्मकर्मे टाकिलीं आहेत काय? ("नाहीं–नाहीं."–टाळी) आपला धर्म सोडून पुनर्विवाहाच्या भ्रष्ट पक्षास अनुकूल झालों आहें काय? (टाळी) मग सरसगट सर्व इंग्रजी जाणणाऱ्या लोकांवर अनाचाराचा आरोप आणणें अतिशयोक्ती आहे असें मला वाटतें, व विचारा अंतीं **शास्त्री**बोवा देखील हें कबूल करतील अशी माझी खात्री आहे. शास्त्री बोवांनीं जो आज अत्युत्तम उपदेश केला त्याबद्दल आह्मीं सर्वांनीं त्यांचे जितके आभार मानावे तितके थोडेच. (टाळी)

ना० शे०–आमचे मित्र रावसाहेब **राघोपंत किडकिडे** जे आतां बोलले त्यास माझी पूर्ण संमति आहे. मीही इंग्रजी शिकलेल्या नवीन मंडळीपैकींच आहें, तथापि माझी स्वधर्मावर श्रद्धा किती आहे ती पहा. माझे कांहीं आप्तवर्ग ( ज्यांनीं मला लहानपणापासून पुत्रवत् पालन करून व विद्या शिकवून एवढें मोठें केलें ) पुनर्विवाहपक्षांत जाऊन मिसळले आहेत. न्यायरीत्या मीही त्यांस अनुकूल व्हावें, परंतु धर्मदृष्ट्या तसें करणें मला प्रशस्त न वाटून मी तुमच्याच पक्षास अनुकूल होऊन तुमची सेवा करण्यास सिद्ध आहें, तस्मात् मी आपल्या धर्माविरुद्ध आचरण करणारा नव्हे हें सिद्ध आहे. (**बावा** पाध्ये फार समाधान पाऊन प्रथम टाळी देतात त्या मागून सर्व टाळी देतात ).

वि० पें०–सर्व ब्रह्मवृंदांस ह्या दासाचे शतशः प्रणाम असोत. हा तुमचा दासानुदासही इंग्रजी शिकून मोठा पगार मिळवीत आहे, परंतु तुमच्या पक्षाविषयीं ह्यास किती कळकळ आहे व तुमच्या सेवेंत हा दास किती तत्पर आहे, तें तुह्मी सर्व जाणतच आहांत. तरी **शास्त्री**बोवांनीं इंग्रजी शिकणारांवर जो अना-

चाराचा आरोप आणिला आहे त्यापासून आपण ह्या दासास मुक्त करण्याविषयीं समर्थच आहांत. ( टाळी, )

**ग० शा०**—मी जें इंग्रजी शिकलेल्या लोकांविषयीं बोललों, त्यासंबंधानें मंडळीचा थोडा गैर समज झाल्यासारिखा दिसतो. मी जो अनाचाराचा आरोप आणिला आहे तो फक्त त्यांच लोकांविषयीं आहे कीं, जे पुनर्विवाह पक्षास अनुकूल झाले आहेत. रावसाहेब **गोडबोले, किडकिडे, शेगडे** अथवा **पेंढारे,** या सारिख्या स्वधर्म परायण गृहस्थांविषयीं मुळींच नाहीं. शिव ! शिव ! असा प्रमाद मजकडून सहसा घडणार नाहीं. माझ्या वाग्दोषामुळें ज्या धार्मिक गृहस्थांना विषाद वाटला असेल, त्यांची मी प्रांजळपणें क्षमा मागतों ( **राघोपंत** इत्यादि इंग्रजी शिकलेली मंडळी—" आतां आमची समजूत झाली, कांहीं विषाद नाहीं.–" टाळी ).

**स० भि०**—मला गरीबाला देखील कांहीं बोलावेंसें वाटतें ह्मणून बोलतों. आजपर्यंत मला असें वाटत होतें कीं पुनर्विवाह पक्षांत मोठीं मोठीं धेंडें आहेत तर त्यांत कांहीं तरी चांगलें असेल, परंतु आज शास्त्री महाराजांचें भाषण ऐकून माझी पूर्ण खात्री झाली कीं, ते लोक अगदीं नीच व भ्रष्ट आहेत. ह्मणून मी असा निश्चय केला आहे कीं, त्यांच्या दारांत भिक्षेला देखील जाऊं नये. ( " शाबास सखारामपंत ! शाबास ! ! "–मोठी टाळी. )

**दा० सा०**—आज शास्त्रीबुवांचें भाषण ऐकून परमानंद झाला. असें भाषण या पूर्वीं आपण कधींच ऐकलें नव्हतें.

**कु० प्र०**—भाषण काय, आज शास्त्रीबुवांनीं आह्मां सर्वांस बोधमृत पाजिलें ह्या कुग्रामांत असले विद्वान पुरुष येतात कशाला आणि आमचे कर्ण पवित्र होतात कोठून ! आमचे महद्भाग्य कीं शास्त्रीबोवासारखें रत्न आह्मांस सांपडलें आहे.

**ग० शा०**—( हात जोडून नम्रतेनें. ) रत्न कसलें. महाराज मी गारगोटी आहें व आपल्या सर्वांच्या पायांची धूळ आहे. आपल्या गांवा-

स कुग्राम कोण ह्मणेल? **कर्णावतार दादासाहेब, वेदमूर्ति घनपाठीबुवा, धन्वंतरी वैद्यबुवा, प्रति भास्कराचार्य जोशीबुवा, पाणिनीचे** अवतार **नरसिंह पुराणिक, जैमिनी**तुल्य आमचे **कृष्णशास्त्री प्रयागवाळ,** आणि **धर्मावतार रावसाहेब पेंढारे,** अशी थोर थोर मंडळी ज्या पुण्यग्रामांत वास करीत आहे, त्याला जर कुग्राम ह्मणावें तर सुग्राम मग कशास ह्मणावें?

**कृ०प्र०**—तें सारें खरें, परंतु एका **ब्रहस्पती**ची उणीव होती ती आतां **परमेश्वर** कृपेनें दूर झाली. ह्मणून आह्मांस अत्यानंद होत आहे.

**न०पु०**—बरें भाषण समारंभ तर अटपला. आतां पुढची तज्वीज?

**रा०घ०**—पुढची तजवीज काय. आज ऐती मंडळी जमलीच आहे. सर्वांस सांगावें कीं पुनर्विवाह पक्षाकडील मंडळीशीं कोणत्याच प्रकारचा संबंध ठेऊं नये. त्यांशीं भाषण व नमस्कार चमत्कार देखील बंद!

**वा०जो०**—ठीक आहे. ( **शेषभटजीस** ) धर्माधिकारी! सांगा सर्व मंडळीस.

**शे०ध०**—ही मुडदेफरोशी आपणच करावी. मी असल्या रिकाम्या पंचाइतींत पडत नाहीं. नमस्काराचें बरें एक असो. भाषण देखील त्यांशीं करू नये हें कुठलें शास्त्र? आमच्या दुकानांत अंत्यंज देखील येतात, व त्यांजवळ बोलणें पडतें, इतकेंच नव्हे तर त्यांना दिलेला कपडा जर त्यांच्या पसंत न पडला तर एकादे वेळेस आह्मास परत घ्यावा लागतो. आह्मी दुकानदार भाई दुकानदार. पुनर्विवाह पक्षाकडील लोक आमच्या दुकानीं जर आले तर त्यांस हांकून द्यावें कीं काय अह्मी?

**रा०घ०**—त्यांशीं बोलून कांहीं उपयोग नाहीं. तुह्मी सरकाराची आज्ञा द्या अणि सांगा मंडळीला.

**वा०जो०**–( दा. सा. स ) सरकारची परवानगी असेल तर सांगतों मंडळीला.

**दा०सा०**–ठीक आहे. सांगा मंडळींस कीं त्या पक्षाच्या लोकांशीं संबंध ठेऊं नये. परंतु भाषण करण्या विषयीं मनाई करण्याची गरज नाहीं भाषण आपण भंग्यांशीं देखील करितों, तद्वत हे.

**वि०पें०**–एक शंका उत्पन्न झाली आहे तिचा खुलासा होणें मला इष्ट वाटतें मंडळीची आज्ञा असेल तर बोलतों.

**स०वै०**–बोलावें. आपण तर आमचे ह्या प्रकरणांत मार्ग द्योतक आहांत.

**का०पें०**–येथें एक **बाळकृष्ण**पंत **खोकले** रहात असत हें मंडळीस आठवत असेलच. त्यांच्या घरीं त्यांचे एक विधवेशीं विवाह केलेले स्नेही दोन चारदां येऊन उतरले होते, व तेथें आमच्या **घनपाठीबो**वांचें उपाधपण असल्यामुळें जेवण खाणांस ते जात येत असत; आणि गांवांतील इतर मंडळी ही **खोकल्यां**कडे जेवण खाणास जात असे. आणि असें ऐकलें आहे कीं सरकारचे आश्रित **गोपाळभट भोकरे** एका पुनर्विवाह पक्षाकडील ग्रहस्थाच्या पंक्तीला **औरंगाबादेस** पुष्कळ दिवस जेवले आहेत. हा सगळा ब्रह्म घोंटाळा झाला आहे ह्याची सफाई कांहीं अवश्य झाली पाहिजे असें मला वाटतें.

( **दादासाहेब** व **गोपाळभट** वगैरे मंडळीस किंचित वैषम्य वाटतें. )

**दा०सा०**–ठीक आहे मंडळीचा काय विचार होईल तो खरा.

**रा०घ०**–पुनर्विवाह पक्षाचा संसर्ग तर घडला आहे खरा. पुढें संसर्ग होऊ नये ह्मणून तजवीज आपण केली, परंतु मागें घडलेल्या दोषाचें कांहीं निराकरण झालें नाहीं तें होणें अवश्य आहे.

**वा०जो०**–(**नरसिंह पुराणिकास**) कां **पुराणिकबुवा**, याचें निराकरण कसें होणार ? कांहीं प्रायश्चित असेल तर सांगा.

**न०पु०**–( दांदरून जाऊन ) अ अ याला प्रायश्चित्त? अवश्य याला प्रायश्चित्त असेल. **प्रायश्चित्तेंदुशेखरांत**, अथवा **धर्मसिंधूंत** किं-

वा **निर्णयसिंधूंत** कोठें पुनर्विवाहा विषयीं प्रायश्चित असल्याचें माझ्या लक्षांत नाहीं. पुनः ह्या साठीं मुद्दाम पोथी पाहिली पाहिजे.

**ग॰शा॰**–**प्रायश्चित्तेंदुशेखरादि** ग्रंथांत जरी नसलें तरी **नारायण** स्मृतींत सांगितलें आहे ह्याला प्रायश्चित्त. (अठवण केल्यासारिखें करून) असें सांगितलें आहे कीं, " **पुनर्विवाह पक्षस्य संपर्कोयदि जायते ! सचैलं नर्मदास्नानं सक्षौरंच विधीयते.** "

**कृ॰प्र॰(दा॰ सा॰ स)** श्लोकाचा अर्थ असा कीं, पुनर्विवाहपक्षाचा संपर्क झाला असतां नर्मदेंत सचैल स्नान करून सक्षौर प्रायश्चित्त करावें.

**दा॰सा॰**–( मनांत फार खिन्न होऊन ) हें प्रायश्चित्त सरसगट सर्वांनीं केलें पाहिजे किंवा त्यांत कांहीं पर्याय आहे? सक्षौर प्रायश्चित्त घेणें तर आमच्यानें होणार नाहीं.

**रा॰घ॰**–शास्त्रोक्त प्रायश्चित्त जर सरकारच घेणार नाहींत तर मग इतर लोक कसे घेतील? आणि जे प्रायश्चित्त घेऊन शुद्ध होतील त्यांस सरकारांनीं सोडल्या सारिखें होईल. तरी सरकारांनीं प्रायश्चित्त घ्यावें अशी आमच्या लोकांची इच्छा आहे.

**दा॰सा॰**–सर्व मंडळीस विचारावें अगोदर, ह्मणजे आह्मी मग सांगू कायतें.

( **वा॰ जो॰** सर्वांस विचारितात, फक्त **विश्वनाथराव, वैद्यराज, घनपाठीबुवा** आणि **पुराणिकबुवा** खेरीज करून बाकी सर्व मंडळी सक्षौर प्रायश्चित्त घेण्यास नाकारते.)

**ग॰शा॰**–जें मी वचन ह्मटलें त्यांत सक्षौर प्रायश्चित्त घेण्याविषयीं जबरी नाहीं. तें प्रायश्चित्त ऐच्छिक आहे. " विधीयते " हें कांहीं लिङाचें रूप नव्हे. **लिङाचें** रूप जेथें असतें तेथेंच **नित्यविधि** होतो. आणि त्याच्या अकरणीं प्रत्यवाय असतो. या वचनांत तसा प्रकार नाहीं. कां **पुराणिकबुवा**. मी ह्मणतों हें बरोबर आहे कीं नाहीं?

न०पु०—( मनांत ) मी ल्हानपणीं **अष्टाध्यायी** शिकलों होतों. ती आतां विसरलों. **लिङ्गाचें** रूप ठाऊक कोणाला कसें असतें तें! ( उघड ) ठीक ठीक; तुह्मी ह्मणतां असाच व्याकरणाचा सिद्धांत आहे.

वि०पें०—सर्वांनीं जरी सक्षौर प्रायश्चित्त घेतलें नाहीं तरी हरकत नाहीं. अह्मी तर घेणार. त्याशिवाय आमची चित्तशुद्धी होणार नाहीं.

ग०शा—( वि. पें. स ) कोणीच सक्षौर प्रायश्चित्त घेत नाहीं, मग आपणच आग्रह कशास करितां? दुसरें आपण कचेरीदरबारची माणसें, आपणांस चारचौघांत जावें लागतें. तेव्हां मुद्दाम मुख विशोभित काय ह्मणून करून घेतां?

वि०पें०—बरें आहे आपण ह्मणतां तर मी स्वतः नाहीं घेत सक्षौर प्रायश्चित्त, परंतु ब्राह्मणद्वारा तरी तें झालें पाहिजे अशी माझी इच्छा आहे,कारण माझें मन मला आंतून खातें.

कु०प्र०—आपली धर्मावर श्रद्धाच तशी ह्मणून आपणास तसें वाटतें. तें आपणास भूषणास्पदच आहे. ब्राह्मण द्वाराच आपणांस करणें असेल तर, आपण सुपारी मला देऊन ठेवावी, ह्मणजे मी **प्रयागास** जाऊन कोणा एकाद्या स्नान संध्याशील ब्राह्मणा करवीं करऊन घेईन. आपणास खर्च दहा पंध्रा रुपये पडतील, जास्त पडणार नाहीं.

का०पें०—खर्चाची कांहीं पर्वा नाहीं. पंध्रा नाहीं पंचवीस पडले तरी हरकत नाहीं, एक वेळ चित्त शुद्धी झाली पाहिजे.

रा०ग०—बरें सर्वांचें तर ठीकच आहे नर्मदा स्नानावर उरकेल. परंतु सरकारचे **गोपाळ भटजी** त्या पक्षांत पुष्कळ दिवस जेवले आहेत, त्यांस सक्षौर प्रायश्चित्त तर झालेंच पाहिजे; आणखीकांहीं अधिक दंड झाला पाहिजे.

गो०भो०—( रागाऊन )मीच काय अधिक पाप केलें आहे? जसें सारे घेतील प्रायश्चित्त तसें मीही घेईन. पुनर्विवाह पक्षांत जेवलों ह्मणून झालें काय? त्या नंतर मी लाख गायत्री जप केला असेल. आणखी मी नित्य **गीतेचा** व **पंचदशीचा** पाठ करीत असतों,

या पासून जो ज्ञानाग्नि उत्पन्न होतो तेणेंकरून ब्रह्महत्यादि मोठमोठीं पातकें भस्म होतात. पुनर्विवाह पक्षाचा संसर्ग दोष कः पदार्थ.

**वि॰पें॰**—महाराज ! आपलें ब्रह्मज्ञान सर्व खरें. परंतु माझ्या अल्प मतीस असें वाटतें कीं, ब्रह्महत्या, बालहत्या, भ्रूणहत्या, या हत्या सर्व पुरवतील परंतु पुनर्विवाह पक्षाचा संपर्क पुरवणार नाहीं. कां **पुराणिकबुवा**, खरें ह्मणतों किं खोटें मी ?

**न॰पु॰**—आपलें ह्मणणें शब्दशः खरें आहे. **गोपाळभटजी**नीं सक्षौर प्रायश्चित्त घेऊन, पंध्रा दिवस तीर्थवास करावा आणि आपल्या हातानीं पाक करून नक्त भोजन करावें, असें माझें मत आहे.

**स॰वै॰**—**पुराणिकबुवा**चें ह्मणणें आह्मांस अक्षरशः मान्य. **गोपाळभटजी** जर हें प्रायश्चित्त करणार नाहींत तर ते बहिष्कृत राहतील.

**रा॰घ॰**—**वैद्यबुवा** ह्मणतात तें आह्मास मान्य.

**वा॰जो॰**—आह्मासही तें मान्य आहे. सभेंत कोणास मान्य नसेल त्यानें बोलावें. ( कोणीच बोलत नाहीं. गोपाळभटजी म्लानमुख होऊन खालीं मान घालतात. )

**दा॰सा॰**—( फार खिन्न होऊन मनांत ) या भटांनींतर बिचाऱ्या **गोपाळभटास** भारीच पेंचांत आणिला. ( उघड ) बरें आहे. मंडळीच्या ह्मणण्याप्रमाणें **गोपाळभटजी** सक्षौर प्रायश्चित्त घेतील आणि पंध्रा दिवस **नर्मदा**वास करतील. बाकी सर्वांनीं उदईक **नर्मदा** स्नान करून शुद्ध व्हावें. आह्मी देखील जाऊ **नर्मदे**स.

**गो॰भ॰**—सरकार अन्नदाते आहेत. जी आज्ञा करतील ती आह्मांस शिरसावंद्य करणें भाग आहे. ( मनांत ) धिःकार असो आमच्या वृत्तीस. 'एका पोटाकरितां जसें कोणी नाचवील तसें नाचणें प्राप्त आहे. ह्या पोटामुळें आमचें सर्व ब्रह्मज्ञान आज धुळींत मिळालें. अस्तु ! प्रारब्धभोग टळत नाहीं हेंच खरें.

दा०सा०—नाना ! मंडळीस पानसुपारी द्या आतां. सायंसंध्येस विलंब होत चालला आहे.

( नाना मेंधळे पानसुपारी वांटतात. नंतर सर्व दादासाहेबांस नमस्कार करून "पुनर्विवाहपक्षाची खूप पच्ची झाली" ह्मणून आनंदभरित होत्साते आपापल्या घरीं जातात. )

---

## प्रवेश ७ वा.

### स्थळ—रामभटजी घनपाठ्यांचें घर.

दादासाहेबाकडील सभा आटोपल्यानंतर **रामभट घनपाठी, वासुदेवभट जोशी, सदाशिवभट वैद्य,** आणि **नरसिंह पुराणिक,** वाटेनें बोलत चालत **रामभटजी**च्या घरापर्यंत येतात.

रा०घ०—चला **वैद्यराज** घरांत, अंथळसें बसून जा. चलाहो **जोशीबुवा;** या **पुराणिकबुवा,** पानतंबाकू खाऊन या पुनर्विवाह पक्षवाल्यांच्या नावांनीं थुकूं जरासे, चला. ( सर्व हंसत आंत जाऊन ओंटीवर बसतात, **रामभट**जी पानतंबाकूची चंची पुढें ठेवितात.) घ्या हीं पानें, ही सुपारी, हा कात, हा चुना. ( सर्व पानसुपारी घेऊं लागतात.)

वा०जो०—काहो ! आज **गजानन शास्त्र्यानीं** तर खूपच बहार केली. मी समजत होतों कीं आहे एक अगांतुक ब्राह्मण झालें. परंतु आज त्यांची खरी योग्यता दृष्टीस पडली. त्यांची विद्वत्ता आणि भाषण करण्याची तऱ्हा पाहून तर आपल्याला त्यांचा गुरुमंत्र घ्यावा असें वाटतें.

रा०घ०—मीही समजत होतों कीं भांग घोटण्या पलीकडे, किंवा गांजाची चिलिम तयार करण्या पलीकडे, त्यांची कांहीं योग्यता नाहीं. अणि ते केवळ नांवाचेच शास्त्री आहेत. पर आज त्यांचे गुण बाहेर पडले. **गजाननशास्त्री** काय एक झांकलेलें माणिक आहे.

स०वै०—झांकलेलें माणिक काय तो मोठाच विलक्षण पुरुष दिसतो. त्याला **न्याय, व्याकरण, अलंकार, धर्मशास्त्र, तंत्रशास्त्र, वेदांतशास्त्र** सर्व मुखोद्गत येतात असें दिसतें. "**कटिशूलावर**" औषधाचें वर्णन तर काय फक्कड केलें. आज त्या ब्राह्मणानें आमच्या गांवाचें नाक राखिलें असें समजा, नाहींतर त्या पक्षवाल्यांशीं सामना करणार आज आपल्या गांवांत दुसरा कोणी निघाला असता काय? नांवाचे शास्त्री पुराणिक पुष्कळ असतात, परंतु प्रसंग आल्यावर धैर्य धरून पुढें उभें राहणें फार कर्म कठीण!

न०पु०—( फार संतापून )कांहो **वैद्यबुवा**. तुह्मी शुद्धीवर तरी आहांत काय? **गजाननशास्त्री, गजाननशास्त्री,** आहेतरी कः पदार्थ तो? गंजड, भंगड, लुच्चा, मनुष्य कोठचा! तीन दिवस येऊन झाले नाहीं तोंच मोठे "शास्त्रीबुवा शास्त्रीबुवा" वाजूं लागले! आले उंटावर बसून दीड शाहाणे. आज आह्मीं तीन तपें **भारत, भागवत** वाचलें, अनेक शिष्यांस मंत्रोपदेश केला. हें सर्व मातींत गेले, आणि सभेंत उगीच बटवट केली ह्मणून **गजाननशास्त्री** मोठे झाले! ते आमच्या गांवची नाकें संभाळणारे आणि अह्मी भारे वाहणारे? "शश्पं मदीयं गतः" आहे काय **गजाननशास्त्र्याची** योग्यता, एक **रघूंतला** किंवा **किरातांतला** मी श्लोक देतों तो लावा तर ह्मणा, ह्मणजे समजेल राजेश्रीची विद्वत्ता. **जोशीबुवा** त्या लपोडशंखाचा गुरुमंत्र घेण्यास तयार झाले आहेत, इतकी विद्वत्ता आहे तरी काय त्याची? तुह्मी सगळे जे त्या अगांतुकावर भाळले आहां त्याचें कारण इतकेंच, कीं तो तुमचा पक्ष घेऊन पुनर्विवाहपक्षाची निंदा करतो, दुसरें कांहीं नाहीं. पुण्यांतील भांग्यामारुतिजवळ जमणाऱ्या हलकट व सोदे लोकांपैकीं आहे ही स्वारी, हें तुह्मांला ठाऊक तरी आहे? परवां ह्या गावांतच राजेश्री गुण उधळणार होते, परंतु मसलत फसली,

इतकेंच काय तें नाहीं तर त्या **शेषरावा**च्या **ठकूबाई**वर ताव देऊन "य:पलाय" करणारच होता गृहस्थ !

**रा०घ०**—तो आंत पाहिजे तें करतो, लुच्चा असो कीं सोदा असो. आज तर तो आपल्या कामास पडला? त्याच्या विद्वत्तेविषयीं तर शंका नाहीं?

**वा०जो०**—आणखी काय तर, विद्वान तर तो आहेच.

**स०वै०**—विद्वान ह्मणजे, असा तसाका? चार पांच शास्त्रांचें ज्याचें अध्ययन त्याला विद्वान न ह्मणावें तर कोणाला ह्मणावें विद्वान्? **पुराणिकबुवा** उगीच संतापतात तर संतापोत बापडे !

**न०पु०**—पुन्हा तेंच "येरे माझ्या मागल्या." कांहो **जोशीबुवा** तुह्मांला कांहीं समजतें का संस्कृत?

**वा०जो०**—आपल्याला बोवा संस्कृत वगैरे कांहीं येत नाहीं. आपण तर **लघुजातक** शिकलों आहों, आणि **काका**जवळ पत्रिका आणि पंचांग तयार करणें शिकलों आहों. तेल्या तांबोळ्यांना मुहूर्त वगैरे सांगून, "मीन मेष वृषभ" करून कसें तरी कुटुंब पोषण करतों.

**न०पु०**—बरें **रामभटजी**, तुह्मांला तरी समजतें कांहीं संस्कृत?

**रा०घ**—आह्मी वैदिक भाई वैदिक. पट्टीमध्यें बसून जटा घन पाहिजे तर विनचूक ह्मणूं. संस्कृताशीं अपला अगदीं परिचय नाहीं, खरें आहे तें सांगतों.

**न०पु०**—काहो **वैद्यबुवा** तुह्मी जी **गजाननशास्त्र्याची** इतकी प्रशंसा करतां, तुह्मांला आहे का संस्कृत भाषेचें परिज्ञान?

**स०वै०**—आह्मी काय आपले काथ्या मेथ्याचे वैद्य ! आह्मांला हो काय संस्कृत ठाऊक?

**न०पु०**—मग तुह्मी त्या लपोडशंखाचा जो एवढा स्तुतिपाठ मांडला आहे तो काय ह्मणून? खोटे श्लोक रचून त्यानीं पुनर्विवाहपक्षाच्या आणि तुमच्या डोळ्यांत धूळ टाकिली, ह्मणून तुह्मी सर्व त्याला इतके भाळलांत वाटतें, होय?

**स०वै**—नवे श्लोक तयार करण्याला तरी विद्वत्ता पाहिजे कीं नको; आणि

आह्मींचशे भाळलों, तुह्मी देखील तर त्यांच्या भाषणावर कितींदा मान डोलिवली आणि टाळ्या वाजिवल्या, त्या फुकटच का?

**न०पु०**—नवे श्लोक तयार करायला काय लागतें. अमच्या घरची **सकू** मोलकरीण देखील पुराण नित्य ऐकून ऐकून संस्कृत बोलायला शिकली आहे आणि ती देखील नवे श्लोक तयार करील. त्यांत काय झालें ?

**रा०घ०**—मग तुह्मी काय ह्मणून सभेंत **गजानन**शास्त्र्यास शाबासकी दिलीत, आणि त्यांच्या ह्मणण्यास अनुमोदन दिलेंत, तें सांगा अगोदर ?

**न०पु०**—सभेची गोष्ट सभेंत. तो प्रसंग कशीतरी वेळ मारून नेण्याचा होता. तेथें खऱ्या खोट्याचा निर्णय करीत बसण्याला अवकाश थोडाच होता! परंतु इथें अपसांत **गजाननशास्त्र्याची** इतकी प्रशंसा करून हत्त्याच्या गंडस्थळावर त्याला बशिवण्याची, त्याचा गुरुमंत्र घेण्याची आणि आह्माला "नांवाचे पुराणिक" ह्मणण्याची गरज काय? तुह्माला गुरुमंत्र घ्यायचा आहे तर आह्मी आहोंच ग्राम गुरू.

**स०वै०**—( **नरसिंह** पु. च्या हातावर हात मारून) चार चौघांत वेळ मारून नेली आणि आपली बाजू राखली, फक्त एवढ्याबद्दलच त्यांची तारीफ करावयाची. बाकी **गजाननशास्त्री** लफंगा मनुष्य आहे हें आह्मी लोक जाणत नाहीं काय ? चला आतां रात्र अधिक होत चालली. **रामभटजी**ला फराळाला उशीर होतो. ( तंबाकूचा फक्का मारतात. )

**रा०घ०**—छेः छेः, उशीर कसचा. आपले पाय लागतात कधीं या घराला. आणखीं घ्या तंबाकू.

**स०व०**—घेटली घेटली. टोंडांत मावट् डेखील नाहीं.

( परस्परांस नमस्कार करून सर्व निघून जातात. )

---

## प्रवेश ८ वा.

### स्थळ.—बजाबा कारकुनाचें घर.

**बजाबा**, मामलत कचेरीचे कारकून, जेवण वगैरे आटोपून ओटीवर दप्तर सोडून कांहीं लिहीत बसले आहेत; त्यांचा मुलगा **शिरू** आपलें बूक घेऊन एका खोलींत वाचीत बसला आहे; व **म्हाळसाबाई** (**शिरू**-ची आई) काम धाम उरकून माजघरांत वाती करीत बसली आहे. इतक्यांत **कृष्णशास्त्री प्रयागवाळ** येतात, त्यांस पाहून **बजाबा** उठून उभे राहतात.

**बजाबा**—नमस्कार महाराज! यांव, आज कुणीकडे वाट विसरलां, बहुतां दिवसांत?

**कृ०प्र०**—आयुष्यमान् भव! बरेच दिवसांपासून तुमची भेट नव्हती झाली. उद्यां **प्रयागची** तयारी आहे ह्मणून ह्मटलें जातां जातां यजमानाची भेट घेऊन जावी. आणि कांहीं विशेष कामही होतें ह्मणून मुद्दाम आलों तुमच्याकडे.(असें ह्मणून बसतात.)

**बजा०**—काय आज्ञा आहे?

**कृ०प्र०**—आज्ञा काय, बोलावें तरी पंचाईत न बोलावें तरी पंचाईत. दांतही आपलेच आणि ओंठही आपलेच.

**बजा०**—बोलावें, कांहीं हरकत नाहीं.

**कृ०प्र०**—बोलूं काय, हा तुमचा **शिऱ्या** अगदीं बिघडला. कांहीं दिवसांनीं बाट्या होईल दिसतें.

**बजा०**—(घाबरून) **शिऱ्या** बिघडला? झालें तरीं काय, कळूं तर द्याल.

**कृ०प्र०**—आपल्या गांवांत आज चार महिन्यापासून पुनर्विवाहसंबंधानें लाथाळें माजलें आहे, तें तुह्मांस माहीतच आहे. त्या लोकांशी अगदीं नमस्कार चमत्कार देखील बंद आहे.

**बजा०**—होय, बरें मग?

**कृ०प्र०**—मग काय, हा तुमचा **शिऱ्या** काल त्या **वेखंड्याला** बाजारांत भेटला आणि त्याला नमस्कार करून त्याच्याच समागमें त्याच्या घराकडेस गेला. हें मी व **रामभटजीनीं** प्रत्यक्ष पाहिलें. आ-

णि या पूर्वी मी त्याला **वेखंड्याचे** घराकडेस सांज सकाळ जातांनां पुष्कळदां पाहिलें आहे. कोणसें ह्मणत होतें कीं यानीं जाऊन **गाडग्या**च्या घरीं एकदा जांभळें देखील खाल्लीं. अणि जांभळें खाल्लीं तेव्हां पाणी प्यालाच असेल. अशानीं तुमच्या गळ्यांत लचांड येईल एकादे दिवशीं.

**बजा०**–( संतापून ) अरे -**शिऱ्या** ! इकडे तर येरे बाहेर शिंच्या (**शिरू** हातांत बूक घेतलेलें तसाच बाहेर येतो. **म्हाळसा बाई बजावाचें** ओरडणें ऐकून ओटीवर येते ) कायरे ए- मादर चोदा. तूं इंग्रजी शिकून वाटणार कायरे आतां? ( असें ह्मणून **शिऱ्याचें** मुसकुटांत एक थापड देतो )

**शिरू०**–(गाल चोळीत चोळीत )ऊं ऊं ऊं. मी काय केलें, मला मारलें उगीच्या उगीच. ऊं ऊं ऊं

**बजा०**–आणीक "काय केलें" ह्मणून विचार तो गाढवीचा! लाथा देऊन घरांतून हाकून देईन. लुच्याला माझा राग ठाऊक नाहीं वाटतें. कशाला त्या **वेखंड्याला** नमस्कार केला झक मारायला- आणि त्याच्या घरीं कशाला जातोस शेण खायला?

**शिरू०**–शेण खातील ह्मणणारेच. मीतर खाईन लाडू—ऊं ऊं ऊं—

**कु०प्र०**–पाहिलेंत ना कशीं उत्तरें देतो तो. **हायस्कूल**ची मुलें एकून एक अशीं दांडगीं आहेत.

**बजावा**–अरे शिंदळीच्या ( जवळ गंधाचें खोड पडलें होतें तें उचलून **शिरू**स फेंकून मारतो, तें **शिरू**स न लागतां **म्हाळसाबाईच्या** पायांस लागतें ) आतां जाब द्यायला शिकला होय?

**म्हा०**–अग आईग! मेल्या, जळलं कपाळ तुझं तें. कारठ्या, तुझ्या पांई मला शिव्या तर मिळाल्याच अणि पाय दिखील मोडला! ( पाय चोळूं लागते. )

**कु०प्र०**–लाडू खाल बच्चाजी, तर **प्रयागास** जाऊन सक्षौर प्रायश्चित्तच घ्यावें लागेल!

**म्हा०**–मोठें शहाणेच बोलणार तुह्मी. माझ्या कपाळीं वीतभर कुंकू असतां पोराला सक्षौर प्रायश्चित्त देणार तुह्मीं? त्या बिचाऱ्या

गंगूचा 'विनाकारण घटस्फोट करविला ते शास्त्री तुह्मीच न-व्हे? ( मनांत ) जळलं मेल्याच कपाळ, मेला काळतोंड्या कुठचा!

**कृ०प्र०**—( बजावास ) **बजावा**! त्या पोराला फूस तुमच्या कुटंबाचीच दिसते.

**बजा०**—काय मी आपलें कपाळ सांगूं. मी कसेंतरी करून चार पैसे मिळऊन संसार चालिवतों. नाही नाही ह्मणतां हट्ट धरून पोराला इंग्रजींत घातला त्याचा हा परिणाम.

**कृ०प्र०**—इंग्रजी शिकला ह्मणून झालें काय? हाच का एक नवल्या इंग्रजी शिकणार झाला. त्या **राघोपंता**कडे पहा. त्या **नारोपंताकडे** पहा. **विश्वनाथ**रावाकडे पहा. ते इतकी इंग्रजी शिकून मोठमोठाले पगार मिळवून देखील आपला धर्म बाळगून आहेतच कीं नाहीं?

**शिरू**—पुरे तारीफ त्या **नारोपंताची** आणि **राघोपंताची**. चोरून मासकंडें चावतात आणि कडाकड हडें फोडतात. वरून मात्र मोठे धार्मिक! तुमच्या डोळ्यांत असेच धूळ टाकणारे पाहिजेत.

**कृ०प्र०**—चोरून हवं तें करतात. शेण खातात, ह्मणून?

**शिरू**—ह्मणून बोडखें तुमचें. माझी **एफेची** परिक्षा होऊन मी चीफ कान्स्टबल नाहीं तर इन्सपेक्टर झालों ह्मणजे पहा तर बच्चाराम तुमची एका एकाची कशी खटाई काढतों. तुह्मी मला उगीच मार बशिवला आहे आज. ( असें ह्मणून " ऊं ऊं ऊं " करीत जातो ).

**कृ०प्र०बजावा**! तुमचा पोर निवडला हो निवडला!! तुह्मी आपले ह्मणून तुह्माला सांगायला आलों, तर तुमच्या चिरंजिवांनीं व कुटुंबानीं आमची बरीच संभावना केली; बरें येतों तर आतां. ( उठून उभे राहतात. )

**म्हा०**—( मनांत ) तुमची तर संभावना पायपुसांनीं करावी. कळलाव्या मेला, हाडखाऊ!

**बजा**०–( **कृष्ण**० चे पाय धरून ) मला क्षमा असावी. मी तर आपल्या चरणाचा दास आहे. घरांत माझा नाईलाज आहे. पोर काय, असें पोर नसलें तरी पुरवेल.

**कृ०प्र**०–बरें तर तुह्मी बसा, मी येतों. आयुष्मान् भव !

( निघून जातात. )

**म्हा**०–बरोबरीचा मुलगा झाला, आतां त्याच्या आंगावर हात टाकणें नीट दिसतें ? लोकांनीं येऊन सांगितलें आणि इथें ऐकलें.

**बजा**०–असा कैवार घेऊन घेऊन तर पोराला ह्या थराला आणलास. लोक कां खोटें सांगतात ? मी आतां संन्यास घेऊन निघून जाऊं, कीं विहिरींत उडी घेऊं. करूं तरी काय ?

**म्हा**०–संन्यास घ्यायला नको आणि विहिरींत उडी घ्यायला नको. गांवांत काय चाललें आहे तें पहावं आणि मग आपल्या पोराला वाईट ह्मणावं. इतर पोरें बाजारच्या पुऱ्या खातात, दारू पितात, नाहीं नाहीं ते वाईट कर्म करितात. त्यांत पुष्कळ भटाभिक्षुकांचीं पोरें देखील आहेत. **शिऱ्यांनीं वेखंड्याला** नमस्कार केला आणि त्यांच्या घरीं गेला ह्मणून झालें काय ?

**बजा**०–तें सारें खरें. भिक्षुकांच्या पोरांनीं पाहिजे तें केलें, भटांनीं रांडा ठेविल्या, शुद्राकडचीं दानें कुदानें घेतलीं तरी चालतें. परंतु आमच्यासारख्याचें कठीण. **जोशिबुवा, वैद्यराज, घनपाठीबुवा,** आणि **पुराणिकबुवा** ही चांडाळचौकडी यमपाश घेऊन, अंवळ कांहीं झालें कीं, उरावर बसायला तयारच उभी आहे. मग करावें तरी कसें ?

**म्हा**०–असा जुलूम कुठेंच नसेलग बाई ! पुण्यांस मी नुक्ती मामाकडे गेलें होतें, तिथें पाहिलें तर पुनर्विवाहवाल्याकडे जेवणाखाणाला देखील जातात सारे. इथें नमस्कार चमत्काराला देखील मनाई !

**बजा०**—पुण्यांत सारें कांहीं आहे. पण आपल्याला तर येथें राहणें आ-हेना? जसे चौघे वागतील तसें वागलें पाहिजे. ( इतक्यांत **भागी** मराठीण येते.)

**भागी**—हळदी कुंकवाच बोलावन जी—बाई! शिरीरामपंता कुडच उंद्या सकारच. बोरगाजर लुटिवतेत पोरीवरूनशानी.

**म्हा०**—( आश्चर्यानें ) श्रीरामपंताकडेग कोणाची पोर, आणि कसलं हळद कुंकू!

**भागी**—ती हयनजी, त्यांनीं ठुलेली **तानी**. तिची हय पोरगी, एका व-रसाची असल बगा.

**म्हा०**—अग सटवे! त्या बटकीकडे का हळदकुंकू आहे? आणि त्याचं का तूं बोलावणं करतेस! जळलं कपाळ तुझं तें.

**भागी**—मलाजी काय म्हनता! समद्या तर जात्यात् तिच्या घरी हळदी कुकवास. **जोश्या**कडच्यान्, **पुरानिका**कडच्यान्, **वैदबा**-कडच्यान्, साऱ्या झाडुंशानी. **पुरानिका**चा तर **शिरीराम-पंत** एजमान व्हय.

**म्हा०**—जात असतीलग बाई. आमच्याकडे तर **पुराणिक**बुवांनीं सांगून धाडलं आहे कीं पुनर्विवाहवाल्याकडेस बायांनीं हळद कुंकास जाऊं नये. आणि त्यांच्या बायका बटकीकडे कशा जातात हळदकुंकाला!

**भागी**—मज काय ठाव बाई! तुमच्या बाह्मनाइच सास्तुर! (जाते.)

**म्हा०**—( **बजावास** ) पाहेलंका, या भटांचें शास्त्र?

**बजा०**—पाहिलें, सर्व बरेंच आहे. जा प्यायला पाणीं घेऊन ये. (**म्हा०** जाते. **बजाबा** दप्तर गुंडाळून ठेवतात.)

---

## प्रवेश ९ वा.

### स्थळ—नरसिंह पुराणिकाचें घर.

**नरसिंहपुराणिक** प्रातःकाळीं मुखमार्जन इत्यादि नित्यविधी आटो-पून **प्रायश्चित्तेंदुशेखर, धर्मसिंधू, निर्णयसिंधु,** आणि **आचारार्क**

असे ग्रंथ पुढें मोकळे ठेवून पानें चाळीत बसले आहेत. इतक्यांत **रामभट घनपाठी** व **वासुदेवभट जोशी** येतात. त्यांस उत्थापन देऊन—

**न॰पु॰**—या **जोशीबुवा** नमस्कार! असे वर बसा, इकडे असे असे **रामभटजी** (हात धरून) असे बसाहो नीट, तुह्मीतर पांव्ह-ण्यासारखें करतां.

**रा॰घ॰**—बरा आहें. इथेंच.. घरच्या माणसाचा हो इतका मान कशास हवा. कां आज मुद्दामसें बोलावलें?

**न॰पु॰**—असेंच कांहीं महत्वाचें काम आहे. अंब्ळ दमधरा, **वैद्यबुवा** आले ह्मणजें सांगतील.

**वा॰जो॰**—**वैद्यबुवा** यायचे आहेत का? त्यांना बोलावणें गेलेंच असेल?

**न॰पु॰**— बोलावणें सर्वांस गेलें आहे, **गजाननशास्त्र्यास, नागेश्वर भटजीस, पेंढार्‍यांस** आणि **पाध्येबांस**. ते पहा **नागेश्वरभट** आले. ( **नागेश्वर**भट येतात आणि सर्वांस नमस्कार करून बसतात. )

**वा॰जो॰**—( न. पु. स ) कां **पुराणिकबुवा** आज पुष्कळश्या पोथ्या बिथ्या सोडल्या आहेत. कांहीं पुनः पुनर्विवाहाचें लचांड उभें राहिलें कीं काय?

**न॰पु॰**—छेः लचांड बिचांड कांहीं नाहीं. आजचा तर लाभ योग आहे.

**रा॰घ॰**—( न. पु. च्या हातावर हात मारून ) काय ह्मणतां! आज बरेंच दिवस कांहीं लभ्यांश झाला नाहीं.

**न॰पु॰**—आतां घ्या एकदाच लाट. मागली बाकी सव्याज मिळण्याचा रंग दिसतो.

**नागे॰**—असें कांहीं असेल्तर बरेंच झालें. यंदाचें वर्ष आपल्याला बरोबर फळलें नाहीं.

**वा॰जो॰**—तें कसें? तुमच्या बोलण्याचा भाव माझ्या नीट लक्षांत आला नाहीं.

**नागे॰**—कसें काय. बहुतेक गृहस्थ मंडळी तटस्थ आहे, व कांहीं पुनर्विवाह पक्षांत मिळाली ती बहिष्कृत आहे. त्यामुळें गेला पितृ-

पक्ष नेहमीं प्रमाणें चांगला नाहीं चमकला आणि आतां लागला सिंहस्थ. तेव्हां भुरशी आणि रिकूचवा मिळण्याची आशा नाहीं.

**रा॰घ॰**—सिंहस्थाची मोठीशी अडचण नाहीं. **जोशीबुवाच्या** हातीं आहे मुहूर्त काढण्याचें. त्यांनीं मुहूर्त काढले ह्मणजे झालें.

( **गजाननशास्त्री** येतात. )

**वा॰जो॰**—या शास्त्रीबुवा, असे या नमस्कार! ( **ग. शा.** बसतात. )

**रा॰घ॰**—आतां **वैद्यबुवां**चाच उशीर आहे. नाहीं का!

**ग॰शा॰**—**वैद्यबु**वा इतक्यांत येतील. ते **हरीहर**पंताकडेस गेले आहेत. जरा आज **वैद्यबुवा** उदास आहेत. काल रात्रीं त्यांचा तो शेट वारला.

**वा॰जो॰**—कोण, **वैद्यबुवां**चा यजमान, **मथुरादास**! अरेरे!!

**ग॰ शा॰**—**मथुरादास** नव्हे—**तिलोकचंद**.

**वा॰जो॰**—असं असं, मी समजलों **मथुरादास**, माझ्या पोटांत असं धस्स झालं. **तिलोकचंद** मेल्याबद्दल **वैद्य**बोवाला काय ह्मणून वाईट वाटावें! तो त्यांचा यजमान नव्हता.

**ग॰शा॰**—तो **मेला** त्याबद्दल वाईट वाटलें नाहीं. परंतु **लौकर** गेला ह्मणून वाईट वाटतें. कारण कांहीं दिवस जास्त जगला असता तर **वैद्य**बुवांचें औषध वगैरे जास्त खपलें असतें, आणि आमचें ही अनुष्टानाचे दिवस जास्त झाले असते. तितकी दक्षणाही जास्त वाढती. ती बुडाली.

**नागे॰**—मागली दक्षणा तर सारी झालीच असेल वसूल!

**ग॰जा॰**—थोडी दोन चार रुपये बाकी असेल, ती होईल वसूल ह्मणा.

**रा॰घ॰**—**वैद्य**बुवांचा खरोखरच अह्मांलोकांस पुष्कळ आसरा आहे. कोणी शेटसावकार त्यांचें औषध घेऊं लागलारे लागला, ह्मणजे ते कसें तरी करून आठ दिवसांचें दुखणें महिन्यावर घालून, जोशीबुवाकरवीं पत्रिका पाहवून, कुठें नवग्रहाचा जप, कुठें

मृत्युंजयाचा जप, कुठें चंडीपाठ, कुठें कांहीं, कुठें कांहीं, हर-तऱ्हेनीं आह्मालोकांस चार पैसे पोंचवितात.

**वा०जो०**—तर काय. ते आपल्या गांवांत आल्यापासून आपणास चांगलाच आश्रय झाला आहे.

( **सदा० वैद्य, हरीहरपंत खमे** आणि **हरीरहपंतार्चे** जांवई **कृष्णराव फाटके** येतात. )

**वा०जो०**—यांव यांव **वैद्यराज**, नमस्कार ! तुमचीच वाट पहात बसलों आहोंत केव्हांचे.

**न०पु०**—या **हरीहरपंत** असे इकडे या. ( **स० वै०** कडे वळून आणि **कृष्णरावा**कडे हात दाखवून ) हेच गृहस्थ काय, ज्यांच्याविषयीं आपण काल सांगितलें ते ?

**स०वै०**—होय. हेच **हरीहरपंता**चे जामात.

**न०पु०पाध्येबुवा**ची वाट पहाण्याची गरज दिसत नाहीं. आणि **पेंढारे** येण्याचा काळ राहिला नाहीं.

**ग०शा०**—**पेंढारे** येत नाहींत, तें कामावर गेले असतील.

**न०पु०**—कां **वैद्यबुवा**, कसें काय, काय ठरवायचें आतां ?

**स०वै०**—ठरवायचें काय, **सूर्य** आणि **जयद्रथ** आहेतच समोरासमोर, **हरीहरपंतां**ना विचारा.

**न०पु०**—कां **हरीहरपंत** हे तुमचे जामात प्रायश्चित घेण्याला सिद्ध आहेतना ?

**हरी०**—त्या साठीं तर इतक्या लांबून आले आहेत इथें.

**रा०घ०**—हे कुठे असतात ?

**हरी०**—औरंगाबादेस यांना सरकारी काम आहे.

**रा०घ०**—( मनांत ) मग काय आज लाटश्मे करण्याला बरी संधी आहे.

**न०पु०**—प्रायश्चित्ताचा निष्कर्ष किती काय देणार हे ?

**हरी०**—आमचें सामर्थ्य आपणास देण्याचें नाहीं, तथापि ब्रह्मदंड जो

काय असेल तो भोगलाच पाहिजे. अपराध होऊं नये, परंतु झाला. ( जांवयाकडे हात करून ) त्यांच्या पोर वयाकडे अणि माझ्या ( हनवटीस हात लाऊन ) पांढऱ्या केंसाकडे पाहून आपण अनुग्रह करावा इतकीच प्रार्थना आहे.

**न०पु०**—छे: छे: अनुग्रहा विनुग्रहाचें नांव काढूं नका. हें पहा **प्रायश्चित्तेंदुशेखर**कार काय ह्मणतात ( पोथीचें पान हातांत घेऊन ) "प्रायश्चित्तं यथोक्तमेव वाच्यम् । नतुस्नेहलोभादिनानुग्रहः कार्यः । तथा सति पापं वक्तरि संक्रमेत् " प्रायश्चित्त यथार्थ असेल तेंच सांगावें, स्नेहवशात् किंवा लोभवशात् अनुग्रह करूं नये, केल्यास प्रायश्चित्त सांगणारास पाप लागतें. समजलांत?

**हरी०**—जशी सर्वांची मर्जी. आह्मी तर ब्रह्मवृंदास शरण आहोंत. ( जांवयास ) **जांवइबा**! घाला ब्राह्मणांस साष्टांग नमस्कार आणि नाक घासा, सर्वस्वी तेच तारणार समर्थ आहेत.

**रा०घ०**—त्यांच्याकडेस दोष तरी कोणता आहे?

**स०वै०**—दोष काय, थोडा पुनर्विवाहपक्षाचा संसर्ग झाला आहे त्यांना.

**रा०घ०**—हरे राम राम! पुनर्विवाहपक्षाचा संसर्ग! शिव शिव शिव!! यांनीं तर महत् पाप केलें. यांना चांगलेंच प्रायश्चित्त दिलें पाहिजे.

( **कृष्णराव** मान खालीं घालतात )

**हरी०**—त्यांना प्रत्यक्ष **वेखंड्याचा** संसर्ग घडला नाहीं.

**स० वै०**—त्यांचें कुटुंब लग्नास गेलें होतें. आणि त्यांच्या गांवीं असलेल्या पुनर्विवाहपक्षाकडील लोकांशीं पंक्तिव्यवहार झाला आहे.

**रा०घ०**—मग ह्यापेक्षां अधिक अपराध तो कोणता?

**क०फा०**—तसा संसर्ग मलाच काय, पुष्कळांस झाला आहे. आमच्या गांवीं **विसोबा अण्गा** मामलतदार, **विनोबा** दाते, **जनोबा लटपटे**, आणखीं पुष्कळ मंडळी पुनर्विवाहपक्षा कडील लोकांकडे जेवलेली आहे. त्यांनां कोणी प्रायश्चित देत नाहींत. आणि मलाच—

रा०घ०—दुसऱ्याच्या उखाळ्या पाखाळ्या काढायला आला आहांत किंवा आपली शुद्धता करून घ्यायला? अगोदर झकमारावी शेण खावें, आणि मग रडत बसावें.

क०फा०—( संतापून आणि हरीहरपंता कडे पाहून ) मामा साहेब! तुह्मी येथें आणून, माझी चांगली शोभा मांडली आहे. या लठ्ठ भटा पुढें मला साष्टांग नमस्कार घालून नाक घासायाला सांगतां काय? मी मोठ्या मोठ्या बदमाशांची कोरड्यांनीं पाठ कोडीत असतों. मी अशा हलकट लोकांस शरण जावें, त्या पेक्षां विषच प्राशन करणें बरें नाहीं काय?

रा०घ०—नाक तर घासावें लागेलच, परंतु दाढी मीशी देखील द्यावी लागेल. हें तुमचें मोठ मोठाले कल्ले बिल्ले सर्व साफ होतील. ब्राह्मणास लठ्ठ बिठ्ठ जर ह्मटलें तर स्मरण ठेवा, रावसाहेब आज आमच्या लोकांशीं गांठी आहेत. हें ब्रह्मपरिषद आहे कीं कुंजड्याचा बाजार !

क०फा०—मला प्रायश्चित्त बिश्चित्त कांहीं एक घेणें नाहीं. माझी मुलगी थोडीच खोळंबली आहे लग्नाला! हा मी चाल्लों (उठूं लागतात हरीहर पंत त्यांना हात धरून बशिवतात. )

हरी०—तुमची मुलगी नाहीं खोळंबली पण आमची मुलगी अडकली आहे ना तुमच्या जवळ! असा पोरपणा करूं नये. कांहीं समज धरावी. ( सर्वांस हात जोडून) आपण माझ्या गरीबीकडे पहावें. मी आपणास वारंवार शरण आहें. यांच्या बोलण्यावर लक्ष पुरवूं नये. आमचे जांवई नव्हत आपलेच जांवई समजून त्यांवर क्षमा करावी आणि पदरीं घ्यावें.

रा०घ०—जांवई मोठे दिग्विजयीच कीं नाहीं !

स०वै०—असूंद्या आतां, पोर वय आहे, क्षमाकरा, ( न. पु. स.) पुराणिक बुवा सांगा काय प्रायश्चित्त असेल तें. आणि तोडा प्रकरण एकदाचें.

बा०जो०—यांनीं प्रायश्चित्त औरंगाबादेसच कां केलें नाहीं?
रा०घ०—तुह्मी तरी बरेच जोशीबुवा? अमच्या इथेंला मुद्दा तिथले लोक काय ह्मणून उचलतील? तिथें प्रायश्चित्त झालें असतें तर तुह्माला ते दक्षणा पाठिवते हुंडी करून. तुमची तिथें सासुरवाडच तर आहे!
बा०जो०तुह्मी ह्मणतां तें खरेंच. आमची खरोखरच सासुरवाड आहे औरंगाबादेस. पण तिकडचें अतां सर्व वाटोळे झालें.
स०वै०—अस्तु. पुराणिकबुवा काय सांगतात तें ऐका.
न०पु०—मी आज सकाळ पासून याच विवचनेंत आहें. पुष्कळ धुंडलें परंतु पुनर्विवाह संसर्गाबद्दल प्रायश्चित्त कोठें आढळलें नाहीं. कदाचित् शास्त्रीबुवा काढतील तर काढतील धुंडून ( गजा. शा. पुढें पोथ्या ठेऊन, मनांत ) आज पाहूं राजेश्रीची विद्वत्ता. फार "शास्त्रीबुवा शास्त्रीबुवा" ह्मणवितात!
ग०शा०—ह्या पोथ्या पाहण्याची कांहीं गरज नाहीं. नारायण स्मृतीच्या टीकेंत प्रायश्चित्त प्रकरणीं असें लिहिलें आहे कीं.

रौप्याणां द्वेशतेसार्धे प्रथमः साहसः स्मृतः ।
मध्यमः पंच विज्ञेयः सहस्रंत्वेव चोत्तमम् ॥

कनिष्ट पक्ष अडीचशें रुपये, नाहीं तर पांचशें व हजार रुपये, असें प्रायश्चित्त आहे. यांतून कोणचें प्रायश्चित्त हे करण्यास सिद्ध असतील तें सांगावें.
न०पु०—(मनांत) हा महा धूर्त मनुष्य दिसतो. यानीं प्रायश्चित्त—द्रव्याची रकम मात्र सांगितली. पुनर्विवाहसंसर्गाला प्रायश्चित्त आहे असें कोठें सांगितलें नाहीं. अस्तु. काम झालें ह्मणजे झालें, आपण कशाला उगीच विचका करावा?
रा०घ०—( मनांत अतिशय हर्ष पावून ) किमानपक्ष अडीचशें रुपये तर आपले आणि आपल्या बापाचे तयार आहेत, त्यांत कमी होत नाहींच.
हरी० अडीचशे रुपये देण्याचें आमचें सामर्थ्य नाहीं वैद्यबुवा सर्व

हकिकत जाणतच आहेत. अह्मी त्यांना आपलें मनोगत अगोदरच सांगून ठेविलें आहे.

स०वै०–( मनांत ) मोठी पंचाइतच झाली बेटी ही. दोन्हीकडे संभाळावें तरीं कसें? (उघड) हें पहा **पुराणिकबुवा** ! **हरीहरपंत** आमचे परम स्नेही आहेत, त्यांकडे पाहून आपण दया करावी इतकेंच सुचिवणें आहे. ( एक बोट दाखऊन ) इतक्या पर्यंत सिद्धता आहे.

रा०घ०–( मनांत ) हें काय केलें यांनीं. अडीचशांचें एकदम शंभरावर आणून टाकिलें !

ग०शा०–वैद्यबुवा! खुलासा सांगावा तो बरा, असा भ्रमाचा भोपळा नको. अंगुली निर्देश अह्मीं काय समजावा? एक पयसा किं एक रुपया, किं एक शेकडां, किं एक हजार, समजावें तरी काय?

स०वै०–एक सुवर्ण मुद्रा.

रा०घ०–वाः शाबास ! हें प्रायश्चित नव्हे, पोरखेळ मांडळा आहे वाटतें? निकृष्ट दर अडीचशें असून, शे पन्नास तरी ठरवायचे होते; सोळा रुपड्यानीं बरें काय होणार, अणि यांना शिक्षा कशी होणार अणि दुसऱ्यावर जरब तरी कशी बसेल. छेः इतकी मुरवत उपयोगाची नाहीं बोवा !

स०वै–( मनांत ) मी कोणजाणें कोणीकडून ह्या प्रकरणांत पुढारीपणा घेतला. मी कांहीं ह्या गांवचा स्थाइक रहिवाशी नव्हे. परंतु ह्मण आहे "संगती संग दोषेण सतीच्च मति विभ्रमा". **जोशीबुवा**, **पुराणिकबुवा** आणि **रामभटजी**, या तिघांच्या नादीं लागून, **वेखंड्यांकडचें** उपाधपण बुडवून घेतलें, आप्तवर्गांशीं वाईट पणाकरून घेतला, या लोकांना शेटजी कडे हमेश अनुष्टानें, जपजाप, होमहवन करवून प्राप्ती करवून देतच असतों, तथापि हे लोक उपकार विसरून ह्या **हरीहरपंताच्या** प्रकरणांत माझ्या वचनाला मान देत नाहींत. महा कृतघ्न लोकहे!

**नागे०**—सोळा रुपयांत ब्राह्मणाच्या वाऱ्यांत एक एक शुभ्रया देखी-ल तर पुरता येत नाहीं. **वेखंड्याच्या** लग्नांत एक एक रुपाय भुरशी वाटली, आणि उपाधपण चालिवणारास पन्नास रुपये रोख दक्षिणा दिली. त्यांच्या संसर्गास ह्यापेक्षां दसपट नाहीं तर दुप्पट तिप्पट तर दंड खरा?

**स०वै०**—दुप्पट तिप्पट तें कांहींनाहीं. मी **हरीहरपंतास** वचन देऊन चुकलों आहे. त्याचा अभिमान आपण सर्वांनी बाळगिला पा-हिजे. यांत जरी आपलें थोडें नुकसान असलें, तरी तें अवंतर भरून येईल. त्या **रतनमल्ल** शेटाकडे कालच माझें औषध सुरू झालें आहे, दोन चार दिवसांत सहा ब्राह्मणांचें अनुष्टान बशिवण्याची तजवीज करतों.

(सर्व समाधान पावतात.)

**रा०घ०**—आपल्या वचनाचा अभिमान तर आहेच अह्मांला. आणि अपल्या योगानें अह्मांस हमेश प्राप्ती होतच. असते, त्या विषयीं अतांच, आपण येण्यापूर्वी, आह्मीं येथें अपले उपकार स्मरत होतों. परंतु शिरस्ता बिघडतो ह्मणून ह्मणतों किं निदान शंभर, नाहीं तर पन्नास तरी करवावे.

**ग०शा०**—शिरस्ता न बिघडण्याची एक युक्ती आहे जर **हरीहरपंत,** त्यांचें जामात, व येथें असलेली सर्व मंडळी मान्य करील तर.

**वा०जो०**—काय युक्ती आहे, सांगा?

**ग०शा०**—लोकांत शंभर रुपये प्रायश्चित्त लागले ह्मणून प्रसिद्ध करावें ह्मणजे झालें.

**हरी०**—अह्मांस अपली आज्ञा सर्वस्वी मान्य आहे.

**न०पु०**—ठीक आहे. (**कृष्णरावास**) मंडळीला साष्टांग नमस्कार घा-ला आणि उद्या **नर्मदे**वर जाऊन प्रायश्चित्त करून टाका. **रा-मभटजी** जातील तुमच्या बरोबर संकल्प सांगायला.

**कृष्ण०**—क्षौर वगैरे मी कांहीं करणार नाहीं. आतांच साफ सांगतो. नाहीं तर मागून गडबड कराल.

**स॰वै॰**–तुमचे तीर्थरूप जिवंत आहेत. त्या अर्थी क्षौरीची गरज नाहीं. स्नान मात्र करा ह्मणजे झालें.

**हरी॰**–उठा जांवइबुवा, लौकर करा नमस्कार आणि चला घरीं, मला कचेरीस जायला उशीर होतो.

**कृष्ण॰**–( हळूच उठून डाकिडव्यांनीं नमस्कार करतात. )

**रा॰घ॰**–छेः असा बायकांसारखा नमस्कार करून कसें चालेल? साष्टांग दंडवत घाला.

**कृष्ण॰**–( तोंड वाईट करून स्तब्ध उभे राहतात. )

**स॰वै॰**–आतां विचार कसला करतां? घाला साष्टांग नमस्कार एकदाचा आणि व्हा मोकळे. तुमच्यावर मंडळीनीं फार कृपा केली असें समजा.

**कृष्ण॰**–( मनांत ) बोडक्याची कृपा केली. फक्त मामाच्या मर्जीस्तव ही सर्व अप्रतिष्टा सोसणें भाग पडलें. अस्तु, या भटांपैकीं येऊं तर द्या कोणाला माझ्या तडाक्यांत, ह्मणजे सांगेन. रोज आठ पायल्या गहूं दळवीन नाहीं तर तेलाच्या घाण्याला लावीन. ह्या **रामभटानीं** तर भारी त्रास दिला आहे. ( साष्टांग नमस्कार घालतात. )

**रा॰घ॰**–ह्मणा, "पुनर्विवाह पक्षास अनुकूल झालों तें शेण खाल्लें अतःपर पुनः असें करणार नाहीं."

**कृष्ण॰**–( मनांत ) खा तुह्मीच शेण. आतां जे कांहीं करूं तें तुह्माला विचारूनच तर करूं. द्वाड भट कुठचा !

**स॰जो॰**–चला जाऊंद्या आतां. शेणच खाणें तर झालें, तुह्माला शरण येऊन साष्टांग नमस्कर घातला, हें शेण खाण्या पेक्षांही जास्त झालें.

**हरी॰**–तर मग मी येतों आतां, उद्यां सकाळींच यांना **नर्मदेवर** पाठऊन देईन; **रामभटजी** जातीलच.

**रा॰घ॰**–**राम भटजींचें** खोळंबलें आहे पांइ पांइ जायला. तुह्माला गरज असेल तर गाडी घेऊन या माझ्या घरीं प्रातःकाळीं. आणि फराळा करितां सवाशेर पेढे नाहीं तर चांगली बर्फी घेऊन च-

ला बरोबर. इतक्या दूर जाऊन पुनः उपाशीं परत येणें कोणाच्यानें होणार आहे? बारा वाजतील घरीं परत यायला.

**हरी०**—तीसर्व तजवीज मी करीन, आपण चिंता करूंनये.

**ग०शा**—आणि हे पहा **हरीहरपंत!** तुमच्या जांवयांना आह्मी ओळखीत नाहीं. प्रायश्चित जें ठरलें आहे त्याचा जिम्मा तुमचा. मागाऊन किट किट होईल नाहीं तर.

**हरी०**—छे:छे:, हरे राम! असें कसें होईल? ब्रह्मस्व मीकधीं ठेवणार नाहीं. आठ बारा दिवसांत पगार आला ह्मणजे अगोदर आपली दक्षणा मग मुला बाळांच्या पोटाची तजवीज. मंडळीनीं मजवर आज मोठेच उपकार केले. आमचे हरपलेले जांवई आपल्या कृपेनें आह्मास सांपडले.

**स०वै०**—ठीक आहे तुह्मी जावें अतां तुह्माला कचेरीस जायला उशीर होत असेल.

( **हरीहरपंत** आणि **कृष्णराव** मंडळीस नमस्कार करून जातात. )

**रा०घ०**—आजची शिकार बरीच साधली ह्मणायची. किंचित **वैद्यराजानीं** घाण केली.

**स०वै०**—ठीक आहे! अपेशाचें खापर **वैद्यराजावर**! चांगलें झालें तर मग यश मात्र **वैद्यराजास** नको.

**न०पु०**—बरें पण उद्यां प्रायश्चित द्यायला जाणार कोण?

**रा०घ०**—पाठऊन द्या **नागेश्वर भटजीला.** फारसें कांहीं कृत्य आहे असें नाहीं.

**नागे०**—मला संकल्प वगैरे कांहीं येतनाहीं बोवा, मी जाऊन करूं काय! आज सहा महिन्यांत "अद्य पूर्वो च्चरित" तोंडांतून काढण्याचा प्रसंग आला नाहीं, त्यामुळें संकल्प मलिन झाला आहे जरासा; तसा ह्मणाल तर मीतुमच्या बरोबर येईन.

**रा०घ०**—तसे रिकामें येऊन काय करणार. उपटून भारे बांधणार! शेरणील वांटेकरी व्हाल अणिक काय?

**न०पु०**—(**रामभटजीस**) बरें तर तुह्मीच जा झालें..

रा०घ०—मीतर आहेंच तयार. पर काहो संकल्प कसा काय ह्मणायचा?

न०पु०—संकल्प काय रोजचाच, फक्त "श्रुतिस्मृति पुराणोक्तफल प्राप्त्यर्थं नर्मदास्नान महं करिष्ये," असें जिथें ह्मणायचें, त्या ठिकाणीं "पुनर्विवाहपक्ष संसर्गजनित महद्दोषपरिहारार्थं नर्मदास्नान महं करिष्ये," असें ह्मणावें ह्मणजे झालें.

ग०शा०—काहो **पुराणिकबुवा**, तुह्मी तर बरेच लांब लांब समासांत शद्ब घातले हो?

न०पु०—हा विषयच महत्वाचा आहे. मी तर "निंद्यतम पुनर्विवाहपक्ष संसर्गजनित महत्तमास्तिगतदोषानिः शेषपरिहारार्थं नर्मदास्नान महं करिष्ये." असा पाठ सांगणार होतों, परंतु **रामभटजींला** वेळेवर ह्मणतां येणार नाहीं ह्मणून लहानच वाक्य सांगितलें.

रा०घ०—तें पहिलेंच वाक्य बरें आहे. तें देखील मला कांहीवेळ घोकून पाठ केलें पाहिजे.

वा०जो०—आजचें काम तर अटपलें. अतां चला घरीं.

रा०घ०—घरीं तर जायचेंच आहे. परंतु एक विचार मला सुचला आहे त्याविषयीं कांहीं ठराव करून मग चला.

स०वै०—**रामभटजींला** भारी विचार सुचत असतात. ब्राह्मण बुद्धिवान खरा.

रा०घ०—त्या पक्षाचा एक ग्रहस्थ तर फुटला, आणि ह्माबद्दल यश **वैद्यराजास** दिलें पाहिजे. आपणांपैकीं प्रत्येकानीं निश्चय करून एक एक दोन दोन आसामी फोडले ह्मणजे तो पक्ष दुर्बल व्हायला उशीर लागणार नाहीं. एका ग्रहस्था विषयीं मी खटपट करून ठेवली आहे, बहुधा सफळ होईल असें वाटतें.

वा०जो—कशी काय युक्ती केलीबोवा? आह्माला देखील कळूंद्या.

रा०घ—एका तरूण ग्रहस्थाची ह्मातारी आई मजकडे येऊन विचारूं लागली कीं "माझा मुलगा पुनर्विवाहपक्षाकडे मिळाला आहे तो माझी क्रिया व सपिंडी वगैरे करण्याच्या कामास पडेल किंवा नाहीं?" त्यावर मी तिला स्पष्ट सांगितलें कीं "तो तुमची उत्तर क्रिया वगैरे करण्यास उपयोगी पडणार

नाहीं, आणि तुमचा मुलगा त्या पक्षांत असतांना जर तुमचा देहांत झाला तर तुह्मी अघोर नरकांत जाल. तर कसेंही करून त्याला तुह्मी त्या पक्षांतून इकडे ओढून घ्या, ह्मणजे आह्मी प्रायश्चित वगैरे देऊन त्याला शुद्ध करून घेऊं ".

**वा०जो०**—(अत्यंत हर्ष पावून ) मग ?

**रा०घ०**—मग काय. सांगतों तें ऐकाल पुरतें कि मध्येंच गडबड् करतां. माझें उत्तर ऐकतांच ती बाई घाबरली आणि रडली. नंतर ह्मणाली कीं " पुत्र असूनही मी निपुत्री झालें. आणि उलट मला नर्कवास! या परता मी वांझोटीच राहिलें असतें तरी बरें झालें असतें. " मी तिला समजाऊन सांगितलें आणि तिणेंही आपल्या मुलाला फोडण्याचा यत्न करीन ह्मणून अभिवचन दिलें आहे.

**ग०शा०**—मी देखील एका बाईला अशीच थाप देऊन तिच्या मुला विषयीं तिच्या मनांत दुराग्रह उत्पन्न केला आहे. बहुधाकाम फत्ते होईलसे वाटतें.

**वा०जो०**—( मोठ्या हुरूपाने ) माझ्या कडेसही कोणी बाया दशमी द्वादशी विचारण्यास आल्या तर मीही त्याना वळिवण्याचा यत्न करीन.( **ग०शा०**स )काहो शास्त्रीबुवा, एकादें वचन बिचन सांपडेल काय त्यासंबन्धाचें ?

**ग०शा०**—वचन काय नवीनतयार करायचें थोडेच आहे? **भास्कराचार्य** कृत **ग्रहलाघवांत** स्पष्ट ह्मटलेंच आहे कीं. "**पुनार्विवाह-पक्षस्य संसर्गो कुरुते नरः विनश्यति कुलं तस्य रवि शुक्रशनिभयात्**" ज्यास पुनर्विवाह पक्षाचा संसर्ग घडतो त्याचें कुल **सूर्य शुक्र** आणि **शनी** या तीनग्रहांच्या भयें करून नाश पावतें.

**वा०जो०**( आनंद पावून )हो हो.आहे खरें **ग्रहलाघवांत** हें वचन, मला विस्मृति झाली होती.

**न०पु०**—आमच्या कडेस पुराणाला बऱ्याच ह्मातारीऱ्या कोताऱ्या बाया येत असतात. त्यांना आदिपर्वांतील **द्रुपद** आणि **धर्मराजाचा**

संवाद चांगला समजाऊन सांगितला ह्मणजे पुनर्विवाह पक्षांविषयीं त्याच्या मनांत दुराग्रह तेंव्हांच उत्पन्न होईल.

स०वै०—ठीक आहे, **रामभटजी** चे "**सपिंडी प्रकरण**" **शास्त्रीबुवाचें** "**रूढितंत्र**" **जोशीबुवाचा** "**ग्रहलाघव**" आणि आमच्या **पुराणिकबुवाचें** "**आदिपर्व**" जेंव्हा सफल होईल तेंव्हां होवो. सध्या आमच्या "**रसराजांतील**" मात्रातर लागू झाली आहे, आणि तिच्यायोगानें पुनर्विवाहपक्ष संसर्ग रूपीं विष प्राशन करून एक हतभागी ग्रहस्थ मृतप्राय झाला होता, तो पुनः सजीव झाला, ही एक आपल्या पक्षास अत्यंत समाधान कारक गोष्ट झाली.

ग०शा०—समाधान कारक काय अत्यंत भूषणास्पद गोष्ट झाली. पुनर्विवाह पक्षाचें आज अह्मीं नांक उतरलें असें समजा. **खडा** येथें "**अन्याय गरल**" ह्मणून जें एक वर्तमान पत्र निघत असतें त्यांत आपल्या लोकांची अन्योक्तीनें बरीच निंदा केलेली असते, अणि विशेषें करून माझ्या नांवानें तर अतिशयच त्वंपुरा असतो, आतां करा ह्मणा पांचजन्य बेत्यांनीं !

रा०घ—आपण देखील ही सर्व हकीकत छापून प्रसिद्ध करावी ह्मणजे प्रतिपक्षाचीं नांकें चांगलीं ठेंचलीं जातील.

ग०शा०—ही तजवीज आहे बरी, परंतु छापण्यास खर्च लागतो त्याची वाट काय?

स०वै०—खर्चाची सोय मला वाटतें **दादासा**हेबांकडून सहज होईल, कारण त्यांना आपल्या पक्षाचा अभिमान आहेच.

न०पु०—शुष्क अभिमान पाहिजे तो हवा तितका बाळगतो. उभ्या वर्षांत स्मश्रूला एक पैसा ज्या ग्रहस्थाकडून ब्राह्मणांना मिळत नाहीं तो तुह्माला ग्रंथ छापण्याचा खर्च देणार, नांव कशाला !

वा०जो०—आपण वर्गणी करूं. **हरीहर**पंताकडले रूपये येतील ते सर्व ह्यांतच खर्च करावे ह्मणजें झालें.

रा०घ०—छेः छेः, ती मसलत उपयोगाची नाहीं. प्रायश्चित्त द्रव्य सर्व

ब्राह्मणासच वांटलें पाहिजे. छापण्याच्या खर्चाची दुसरी कांहीं सोय करा नाहीं तर तो नाद सोडा.

**ग०शा०**—तर मग असें करा. ते आपले **रामकृष्णभट स्पष्टवक्ते** ह्या कामांत बरीच मदत करूं शकतील. कारण त्यांचें जाणें येणें **पुण्यास मुंबईस** हमेश असतें, त्यांच्या परिचयाचे कोणी छापखानेवाले असतील, त्यांच्या मारफत हें काम सहज होईल.

**न०पु०**—हो, आहे खरी ही युक्ती चांगली. परंतु **रामकृष्णभट** सध्या गांवीं नाहींत, ते गेले आहेत **पंढरीस** अशाढीकरितां. ते यात्रेहून परत आले ह्मणजे त्यांनाच हें काम सांगावें, असें मला वाटतें.

**बा०जो०**—ठीक आहे. ह्या पुनर्विवाहाच्या संबंधानें जो आपण आज पर्यंत दिग्विजय केला आहे त्याची साद्यंत हकीकत सर्व छापून प्रसिद्ध झाली ह्मणजे पुनर्विवाहपक्षाची चांगली फजीती होईल. चला आतां उशीर झाला. ( सर्व उठतात.)

**स०वै०**—फजीती पण कशी ?

**रा०घ०**—( **वैद्यबावाच्या** हातावर हात मारून ) कशी काय, पूर्ण **सोळा आणे** फजीती.

( सर्व "हा हा हा हा; ही ही ही ही; हो हो हो हो;"
करीत निघून जातात.)

---

## प्रवेश १० वा.

### स्थळ—रुढिदेवीचें मंदिर.

अव्यवस्थारूपी झोंझ्या जिच्या मस्तकापासून पायांपर्यंत अस्ताव्यस्त पडल्या आहेत; कापट्य कंचुकी आणि अन्यायांबर जिनें परिधान केलें आहे; **मनु, नारद, वसिष्ठ, पाराशर** इत्यादि ऋषींच्या शिरकमलांची माळ जिनें आपल्या गळ्यांत घातली आहे; अनाथ अबलांस वैधव्य चरकांत पिळून त्यांच्या रक्ताचा लाल भडक भव्य मळवट जिनें आपल्या कपाळीं लाविला आहे. एका हातांत बहिष्कारास्त्र, दुसऱ्या हातांत

मोहपाश, तिसऱ्यांत क्रौर्यखड्ग, आणि चौथ्यांत औधत्यगदा जिनें धारण केली आहे; अशी अक्राळ विक्राळ **वृद्ध रूढि देवी,** मूढजनहृदूकमलासनारूढ होत्साती मोठ्यानें ओरडतेः—कायरे ए **भडव्यानों!** आज माझी भक्त मंडळी अजून दर्शनास आली नाहीं, ह्याचें कारण काय? कोणी दुसऱ्या देवतेच्या तर नादीं लागली नाहींना?

( **जनार्दन** भट व **लक्ष्मण** भट बडवे पुढें येतात व साष्टांग नमस्कार करून हात जोडून स्तब्ध उभे राहतात त्यांस पाहून )

**रूढि**—कायरे **भडव्यानों** तुह्मी उगेच कां उभे, भक्त मंडळी आज कोठें आहे, बोलत कां नाहीं?

**बडवे**—मातुःश्री! आह्मीं मंदिर सोडून आज गांवांत कोठें गेलों नाहीं, नकळे भक्त मंडळी अजून दर्शनास कां आली नाहीं, आज्ञा असल्यास जाऊन सर्वांस बोलाऊन आणितों.

**रूढि**—ठीक आहे. लवकर घेऊन या. आज पुजेस व नैवेद्यास फार उशीर झाला, जा—चटकन परत या कसे ते.

( दोघेही बडवे जातात व **रामभट** घनपाठी, **वासुदेवभट** जोशी, **सदाशिवभट** वैद्य, **गजाननशास्त्री** घोंटे, **नरसिंह पुराणिक** विक्षिप्त, आणि **नागेश्वरभट** मुळमुळे, यांस बरोबर घेऊन परत येतात.)

**सर्व**—( साष्टांग नमस्कार करून ) मातुःश्री! तुझ्या चरणकमलांप्रत आह्मां सर्व दासानुदासांचे अनेक प्रणाम असोत!

**रूढि**—कायरे मेल्यांनों, आज दर्शनास येण्यास इतका उशीर कां? दुसऱ्या कोण्या देवाच्या नादीं लागलां वाटतें? खबरदार, स्मरण ठेवा, माझ्याशीं गांठ आहे; माझा प्रताप विसरलां वाटतें, होय?

**सर्व**—(उठून उभेराहातात व हात जोडून) नाहीं नाहीं! मातुःश्री! तुझे चरण सोडून आह्मीं दुसऱ्या देवतेच्या नादीं कदापि लागणार नाहीं. इतर क्षुल्लक देवतेची तर कथा काय, प्रत्यक्ष ब्रह्मदेवास देखील ही तुझी भक्त मंडळी शरण जाणारी नव्हे!

**रूढि**—( संतोष पावून ) तर मग आज विलंब होण्याचें कारण काय, सत्य सत्य कथन करा.

ग॰शा॰—मातुःश्री ! तुझ्या राज्यांत शत्रु उद्भवले आहेत, त्यांनीं आमच्या पवित्र कळपांतील कांही लोकांस फितवून आपणाकडेस करून घेतले आहेत व तुझ्या धर्म राज्यांत बंडावा करीत आहेत, त्यांचा पराभव जेणें करून होईल अशा उपायांची योजना आह्मी तुझे सेवक करण्यांत गुंतलों आहोंत; आमच्या कळपांतील जे लोक शत्रुपक्षास जाऊन मिळाले आहेत त्यांपैकी एका ग्रहस्थास आज आह्मीं आपल्या कडेस परत ओढून घेतला व शत्रुपक्षास जाऊन मिळाल्या बद्दल त्यास योग्य दंड काय झाला पाहिजे हें ठरविण्या करितां आज सभा झाली तिकडेस मंडळी गुंतली होती. ह्मणुन तुझ्या दर्शनास येण्यास विलंब झाला त्या बद्दल कृपावंत होऊन आह्मास क्षमा करावी कारण आह्मी तुझ्याच सेवेंत लागलों होतों. (सर्व लवून भुईस डोकें टेकून नमस्कार करितात.)

रुढि—(आश्चर्य पावून व क्रुद्ध होऊन) काय—माझ्या राज्यांत शत्रु उत्पन्न झाले आणि त्यांनी बंडावा मांडिला आहे? ह्मणतोस तरी काय तूं?

ग॰शा॰—मातुः श्रीच्याच चरणाची शपथ, मी सत्य सांगतों.

रुढि—ते मेले शत्रु आहेत तरी कोण, व त्यांनी बंडावा तरी कसा आरंभिला आहे कळूंतर देशील मला; माझ्या एक छत्री राज्यांत शत्रु उत्पन्न होणें ह्मणजे मोठें आश्चर्यच होय!

ग॰शा॰—कांही वर्षां पासून ह्या आपल्या पुण्य भूमींत ताम्र मुखे सैतान वसत आहेत, त्यांच्याच सहवासानें व त्यांची भाषा शिकून कित्येक लोकांची मति भ्रष्ट होऊन ते त्वां स्थापित केलेले नियम मोडून मनस्वी आचरण करूं लागले आहेत. तुझा प्रतिबन्ध किती उत्तम आहे व ह्या कलियुगा करितां सर्व मनुष्यांस व विशेषें करून ब्राह्मणांस त्वां कसा सर्वोत्कृष्ट वर्तन क्रम घालून दिला आहे पहा—

दंभाचार दुराचारा स्तातमातृ विहिंसकाः ।
वेदहीना द्विजा दीनाः शूद्रसेवापराः सदा ॥ १ ॥

कुतर्कवाद बहुला धर्म्म विक्रयिणोऽ धमाः ।
वेदविक्रयिणो व्रात्या रसविक्रयिणस्तथा ॥ २ ॥
मांसविक्रयिणः क्रूराः शिश्नोदरपरायणाः ।
परदाररतामत्ता वर्णसंकर कारकाः ॥ ३ ॥
ऱ्हस्वाकाराः पापसाराः शठामठ निवासिनः ।
षोडशाद्वायुषः श्यालबांधवा नीचसंगमाः ॥ ४ ॥
विवादकलहक्षुब्धाः केशवेशविभूषणाः ।
कलौ कुलीना धनिनः पूज्या वार्द्धुषिका द्विजाः ॥ ५ ॥
संन्यासिनो गृहासक्ता गृहस्थास्त्वविवेकिनः ।
गुरुनिंदापरा धर्म्म ध्वजिनः साधुवंचकाः ॥ ६ ॥
प्रतिग्रहरताः शून्द्राः परस्व हरणादराः ।
द्वयोः स्वीकार मुद्वाहः शठे मैत्री वदान्यता ॥ ७ ॥
प्रतिदाने क्षमाशक्तौ विरक्ति करणाक्षमे ।
वाचालत्वंच पांडित्ये यशोऽर्थे धर्म्मसेवनम् ॥ ८ ॥
धनाढ्यत्वंच साधुत्वे दूरेनीरेच तीर्थता ।
सूत्रमात्रेण विप्रत्वं दंडमात्रेण मस्करी ॥ ९ ॥
परान्नलोलुपा विप्राश्चांडालगृहयाजकाः ।
स्त्रियो वैधव्यहीनाश्च स्वच्छंदाचरणप्रियाः ॥ १० ॥

परंतु तुझे शत्रु सैतानांच्या रीती भाती स्वीकारून तुझ्या आज्ञा मान्य करीत नाहींत आणि ते नाना प्रकारचीं बंडें उपस्थित करितात व धार्मिक लोकांस धर्मपथा पासून भ्रष्ट करून अधर्म कूपांत लोटितात, तेणें कडून लोकांची ऐहिक व पारलौकिक हानी होऊन तुझ्या बंधू **यमाजी भास्कराचा** सर्व मुलुक ओसाड होत चालला आहे. तुझ्या **वैधव्य** नामक कारागृहांतील बंदिवानांस या बंडखोर लोकांनी बंधमुक्त करण्याचा क्रम चालिवला आहे त्यामुळें जो अनर्थ व जी तुझ्या राज्यांत अव्यवस्था झाली आहे ती कांहीं सांगतां पुरवत नाहीं—व्यभिचाराची वात्र ते अगदींच बुडऊं पहात आहेत.

**रुढि**—काय ह्मणतोस! त्या मेल्या लाल तोंड्या सैतानांच्या संगतीनें माझे आवडते भक्त नीति भ्रष्ट होत आहेत व त्यांनीं माझ्या **विधवा** बंदिशाळेवर घाला घातला काय? त्यांनां पाठबळ आहे तरी कोणाचें?

**न०पु**—मातुःश्री! त्यांनां पाठबळ कसलें? कोणाचेंच पाठबळ नाहीं. ते केवळ मूर्ख व दांडू लोक आहेत. तुझ्या अज्ञान प्रकाशा पुढें ते आपली ज्ञान दिवटी मिरवितात व त्वां रद्द केलेलीं जुनीं व निरूपयोगी शास्त्रें खांकेंत घेऊन वटवट करीत फिरतात. आणि "आह्मी **मनु, नारद पराशर** इत्यादि ऋषींचे अनुयायी आहोंत," असें बकत फिरतात.

**रुढि**—अरे मेल्यानों! जळलें तुमचें कपाळ. माझ्या भक्तांस थापा देऊन तुह्मी खाड्यांत घालतां होय? **मनु, नारद, पराशर**. हे आहेत तरी कोण? त्यांची आतां माझ्या पुढें प्रौढी मिरविणारा मूर्ख आहे तरी कोण? त्यांचा शिरच्छेद करून ही पहा मी आपल्या गळयांत रुंडमाळ घातली आहे. मला मोठेंच नवल वाटतें कीं त्या थेरड्यांचे शास्त्र मी सर्व जाळून टाकिलेले पुनः या बंडखोर लोकांस प्राप्त तरी कसें झालें! इतका सर्व बंडावा माझ्या राज्यांत चालला असून तुमच्यानीं त्याचा कांहींच प्रतिकार होत नाहीं हें कसें? माझे **अविवेक** प्रधान व **शंकरभारथी** उपप्रधान झोंपा घेत आहेत कीं काय? वीरानों! कंबरा बांधा, धैर्य धरा, हें घ्या **बहिष्कारास्त्र**, आणि मी जी तुमची कुलदेवता तिचें स्मरण करून शत्रूवर स्वारी करून त्या मेल्यांच्या ह्या क्षणींच पराभव करा. जा निघा लवकर कसे ते; निघा निघा, उभे कां?

**सर्व** -( मोठा हर्ष पावून व कंबरा बांधून ) जय! जय!!

**रुढि** मातेची जय!!! ( आणि स्तोत्र ह्मणतात. )—

प्रातर्नमाम्यधिदैवत रूढि देवीं ।
ज्ञानदयाविनयसत्यविनाशदक्षाम् ॥
ब्रह्मेंद्ररुद्रमुनिमोहनशीललोलां ।

रुद्री समस्त सूरमूर्तिमनेकरूपाम् ॥ १ ॥
प्रातर्भजामि भजतामखिलार्थदात्रीं ।
धात्रीं समस्तजगतां दुरितापहंत्रीम् ॥
संसार बंधनविमोचन हेतु भूतां ।
मायां परां समधिगम्य परस्य विष्णोः ॥ २ ॥
अतीतः पंथानं तवच महिमा वांङ् मनसयो ।
रतद्व्या वृत्त्यायं चकितमभिधत्ते श्रुतिरपि ॥
सकस्यस्तोतव्यः कातविधगुणः कस्यविषयः ।
पदेत्वर्वाचीने पततिन मनः कस्यनवचः ॥ ३ ॥
त्रयींसांख्यंयोगः पशुपतिमतं वैष्णवमिति ।
प्रभिन्ने प्रस्थाने परमिदमदः पथ्यमितिच ॥
रूचीनांवैचित्र्यादृजु कुटिलनानापथजुषां ।
नृणामेका गम्या त्वमसिपयसार्णव इव ॥ ४ ॥
नमामि रूद्री तवपाद पंकजं ।
सुरासुरैर्वंदित दिव्यरूपं ॥
भक्तिंच मुक्तिंच ददासिनित्यं ।
भावानुसारेण सदानराणां ॥ ५ ॥
दर्शनात्सर्वपापघ्नीं । वंदनान्मोक्षदायिनीम् ॥
ध्यानेन मुक्तिदां पुण्यां । रुद्री देवींनमाम्यहम् ॥ ६ ॥
गतं दुःखं गतं पापं । गतं दारिद्र्यमेवच ॥
आगता सुख संपत्ति । पुंण्योहं तव दर्शनात् ॥ ७ ॥
अन्यथा शरणं नास्ति । त्वमेव शरणं मम ॥
तस्मात्कारूण्य भावेन । पाहिमां परमेश्वरी ॥ ८ ॥
आवाहनं नजानामि । नजानामि तवार्चनं ॥
पूजां चैव न जानामि ।क्षम्यतां परमेश्वरी ॥ ९ ॥

( सर्व टाळया वाजवून नाचतात )

दासोऽहं तव दासोऽहं । दासोऽहं तव दासोऽहं ॥
दासोऽहं तव दासोऽहं । दासोऽहं तव दासोऽहं ॥ १० ॥

( सर्व साष्टांग नमस्कार करून कांही वेळ जमीनीवर स्तब्ध
पडले राहतात नंतर ऊठून उभे राहून उच्च
स्वरानें फलश्रुति ह्मणतात. )

येश्शृण्वंति वदांति रुढिस्तवनं सौख्यप्रदं सादरात् ।
लोकाः शोकहरं सदाशुभकरं भक्तिप्रदं माधवे ॥
तेषामेव पुनर्न जन्ममरणं सर्वार्थ सम्पत्करं ।
मायामोहविनाशनं प्रतिदिनं संसारतापच्छिदम् ॥ ११ ॥

य इदं स्तोत्रमयाचितं ब्राह्मणाय दद्यात् । वीरहत्यांवा एतेघ्नंति । ये ब्राह्मणाः रुढि स्तोत्रं पठांते । ते सोमं प्राप्नुवंति । आसहस्रा-पंक्ति पुनांति

( सर्व हात जोडून स्तब्ध उभे राहतात )

रुढि–( प्रसन्नहोत्साती )

त्वयाकृतमिदं स्तोत्रं ये पठांते जना भुवि ।
तेषां सर्वार्थ सिद्धिः स्यादिह लोके परत्र च ॥
विद्यार्थी चाप्नुयाद्विद्यां धर्मार्थी धर्ममाप्नुयात् ।
कामानवाप्नुयात् कामो पठनात् श्रवणादपि ॥

( सर्व पुनः साष्टांग नमस्कार करून उठतात
व टाळ्यावाजवून आरती ह्मणतात. )

जयदेवी ! जयदेवी ! जय **रूढी** माते !
अगाध शक्ती तूझी, नकळे कवणातें ॥ पालीपद ॥
लहान मोठे, तूझ्या चरणींचे दास ।
होउनि, अवघे करिती नित्यहिं तव आस ॥
शास्त्री, पंडित, वैदिक, भिक्षुक, हरिदास, ।
पौराणिक अणि जोशी, यां सर्वां फांस ॥
लाउनि, त्वां वश केलें, दळती ते जातें, ।
डोळे झांकुनि जाती, जिकडे तू नेते ॥ १ ॥ जयदेवी० ॥
विद्या भूषित तरूणाहि, पाय तुझे धरती, ।
लत्ता प्रहार सोसुनि, फारच चुरमुरती. ॥
**बी. ए.** "ब्या ! ब्या !" **एम. ए.** "म्या ! म्या !" ची करती,

धैर्या त्यागुनि, तूझ्या आघातें मरती ॥
सदसद्विवेक शक्ती सोडुनि त्यां जाते, ।
जनलज्जा मनलज्जा त्यांना बहु खाते ॥ २ ॥ जय० ॥
**पुनर्विवाहोत्तेजक मंडळि** स्वर्गास ।
गेली, **गाडगिळानीं** गिळिला मुगग्रास, ॥ *
**मोडक** मोडुनि † काडी, सोडुनिया आस ।
स्वस्थाचे बसले, कांहि न करती आयास; ॥
**रानड्यांचें** घोडें थकूनिया बसतें; ।
**देशमुखांचें** श्रीमुख म्लान बहू दिसतें ॥ ३ ॥ जय० ॥
देशसुधारक सर्वहि वटवट बहु करती;
प्रसंग आल्यावरि ते मार्गेची सरती;
ऐसा अपमानाचा मार्ग कसा वरती?
त्यांची कळकळ केवळ दिसते वरवरती;
"अचाट करणी तूझी!" ह्मणताती ज्ञाते,

आह्मी आहों तूझ्या कीर्तीचे गाते ॥ ४ ॥ जय० ॥

**रूढि** (संतुष्ट होऊन आशिर्वाद देते) शाबास वत्सानो! मी तुमची भक्ती पाहून फार फार संतुष्ट झालें. माझ्या दास्यत्वा पासून तुह्मांस अखंडित ऐहिक सुखेंतर प्राप्त आहेतच, परंतु प्राणोत्क्रमणानंतरही माझ्या बंधु **यमाजी भास्कराच्या** राज्यांत अक्षय सुख प्राप्त होऊन तुह्मांस **विष्णु दूताची** यत्किंचित्‌ही पीडा होणार नाहीं असा माझा पुर्ण आशिर्वाद आहे. आतां जा आणि माझ्या शत्रूवर जय मिळवा!

**सर्व**—तथास्तु! ( सर्व **रूढीस** साष्टांग नमस्कार करून आनंद व वीरश्री भरित होत्साते निघून जाऊ लागतात, इतक्यांत **कुशाबा जालवणकर** पुनर्विवाह पक्षा कडील कांही बाटे लोकांस समागमे घेऊन मंदिरांत शिरतात व मोठ्यानें पांचजन्य करितात)

---

* मुगाचाधांस, ह्मणजे "मूगखाल्ले" अर्थात् स्तब्ध बसले.
† काडीमोडणे ह्मणजे संबंध तोडणे.

रूढी झाली बूढी,* हिचे पडले सारे दांत ।
आलीं पाडुन मुसकुट फोडा, मारा कमरेंत लात ॥
गड्यानों! धैर्य धरारे । विधवादुःखहरारे ॥
त्यांना मुक्त करारे । सोज्वल कीर्ति वरा रे ॥
( हें ऐकून रूढी "खाव" करून कुशाबा आणि त्यांच्या सोबत्यांच्या आंगावर धाऊन जाते आणि तिचे भडवे आणि भक्त मंडळी त्यांना धक्के बुक्के देऊन बाहेर घालऊन देतात व सर्व जातात )

श्रीरूढिदेव्यार्पणमस्तु!

---

* बूढी=म्हातारी.

समाप्त.